# साहित्य

एप्रिल, मे, जून २०२६



ज्येष्ठ साहित्यिक

**व्यंकटेश माडगूळकर**

विशेषांक

# साहित्य

**मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक**

स्थापना : जानेवारी १९४७

## जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२६

**संपादक मंडळ**

प्रा. प्रतिभा बिस्वास, श्री. एकनाथ आव्हाड, श्री. चंद्रशेखर गोखले

**या अंकाचे संपादक**

प्रा. प्रतिभा बिस्वास

**प्रकाशक**

प्रा. प्रतिभा सराफ

मुखपृष्ठ : अनीश दाते
अक्षरजुळणी : ग्रंथाली
मुद्रितशोधन : अनिल दाभाडे
आतील मांडणी : अनिरुद्ध गद्रे
छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई ४०००३१

- मूल्य तीस रुपये, वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/–
  द्वैवार्षिक वर्गणी रु. ४००/–
- धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाने असावा.
- NEFT S/B A/C No. 002200100046717
  IFSC : SRCB0000002
  Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum
  (वर्गणी पाठवल्यावर साहित्य संघाच्या भ्रमणध्वनीवर कळवावे)

**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४. भ्रमणध्वनी : ७३०४३६९३९६
इ–मेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in
वेबसाईट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** प्रा. प्रतिभा बिस्वास, ३०३ ए, माऊंट एव्हरेस्ट भक्तीपार्क, वडाळा, वडाळा, मुंबई ४०००३७ भ्रमणध्वनी : ९८२०७२७६२४
इ–मेल : pratibhabiswas67@gmail.com

या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.
या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रम


- संपादकीय / २
- **लेख** – व्यंकटेश माडगूळकर यांचे देशीकार लेणे / ३
  डॉ. मोना चिमोटे
- **लेख** – द मॅन हू मर्डर्ड मोरॅलिटी / १५
  डॉ. अनंत देशमुख
- **लेख** – स्त्रीजीवनाची कालानुरूप काही मन्वंतरे! / २५
  भास्कर कदम (नांदगाव) /
- **लेख** – पुष्पोपचार / ३०
  सुहासिनी कीर्तिकर
- **लेख** – आठवण / ३२
  नीता शरद माडगूळकर
- **लेख** – ज्यांच्या साहित्यात मानवी जीवनाचे स्पंदनं;
  तेच खरे साहित्यिक / ३३
  प्रशांत गौतम
- **लेख** – 'चार नगरांतले माझे विश्व'
  एका शास्त्रज्ञाच्या जडणघडणीतील शैक्षणिक संदर्भ / ३६
  किरण डोंगरदिवे
- **लेख** – हायकूपूर्व जपानी कविता / ४३
  विजय पाडळकर /
- **लेख** – लेन्यामंदी लेनं / ५६
  विद्या प्रभू
- **कविता** – श्रद्धा गायकवाड, अशोक गुप्ते२
, अरविंद बुधकर, प्रशांत पनवेलकर – ६३ ते ६६
- **पुस्तक परिचय** – चंद्रशेखर गोखले
  संवादातून...! – प्रतिभा सराफ, आउसी गोस्ट – गजानन म्हात्रे, एमिली डिकिन्सनच्या कविता – जीवन आनंदगावकर, उद्याचा दहशतगर्द अंधार – कविता मोरवणकर – ६७ ते ७३
- **कार्यवृत्तांत** – प्रा. प्रतिभा सराफ (साहित्य शाखा) / ७४
- **अहवाल** – चंद्रशेखर केशव गोखले (संघ मंदिर समिती) / ७८
- **अहवाल** – प्रा. डॉ. मिलिंद जोग (नाट्यशाखा) / ८०

# संपादकीय

नमस्कार रसिक वाचक हो,

एप्रिल–मे–जून या साहित्य त्रैमासिक अंकातून आम्ही आपल्या हाती एक अशी साहित्यसंपदा सुपुर्द करीत आहोत, जी केवळ वाचनाचा आनंद देणारी नाही, तर चिंतनाला प्रवृत्त करणारी, संवेदनांना स्पर्श करणारी आणि विचारविश्व अधिक समृद्ध करणारी आहे. यंदाचा अंक विशेष ठरतो, तो ज्येष्ठ साहित्यिक श्री. व्यंकटेश माडगूळकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त साकारलेल्या या स्मरणांजलीमुळे. मराठी साहित्यविश्वात त्यांच्या लेखणीने उभा केलेला जीवनरस, ग्रामीण वास्तवाची जिवंत जाण आणि मानवी भावनांचे सूक्ष्म चित्रण यांचा मागोवा घेणारा प्रा. डॉ. मोना चिमोटे यांचा अभ्यासपूर्ण लेख या अंकाचा आत्मा ठरतो.

या अंकातील लेखन म्हणजे विविध विचारधारांचा, अनुभूतींचा आणि अभिव्यक्तींचा एक बहुरंगी पटच जणू! सिद्धहस्त लेखक अनंत देशमुख यांनी 'The Man Who Murdered Morality' या ग्रंथाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि र.धों. कर्वे यांसारख्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वांचा वेध घेतला आहे. पत्रकार भास्कर कदम यांचा स्त्रीजीवनातील परिवर्तनाची दिशा अधोरेखित करणारा लेख वर्तमानकाळाशी संवाद साधतो. तसेच सुप्रसिद्ध समीक्षिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या 'पुष्पोपचार' लेखातून विविध फुलांच्या वर्णनाने जणू सुगंध दरवळतो.

नीता शरद माडगूळकर यांच्या लेखणीतून उमटलेल्या आठवणी म्हणजे केवळ स्मरणरंजन नाही, तर एका साहित्यपुरुषाच्या जीवनातील जिव्हाळ्याच्या क्षणांचे भावपूर्ण चित्रण आहे. 'ज्यांच्या साहित्यात मानवी जीवनाचे स्पंदन, तेच खरे साहित्यिक' या विषयावर पत्रकार प्रशांत गौतम यांनी मांडलेले विचार साहित्याच्या मर्मस्थानी पोहोचणारे आहेत. किरण डोंगरदिवे यांनी ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या आत्मचरित्राचा घेतलेला शैक्षणिक परामर्श हा ज्ञान आणि विवेक यांचा सुंदर संगम घडवतो.

विजय पाडळकर यांनी जपानी हायकू कवितेच्या पूर्वपरंपरेचा घेतलेला मागोवा वाचकांना वैश्विक साहित्यदृष्टीची नवी दालने उघडून देतो. 'लेन्यामंदी लेनं'मध्ये विद्या प्रभू यांच्या ओवी साहित्याची वैशिष्ट्ये अधोरेखित करणारा आणि स्त्रीजीवनाचे हृद्य चित्रण करणारा सुंदर लेख वाचायला मिळतो.

कवितांचा विभाग म्हणजे भावनांचा, अनुभूतींचा आणि कल्पनाशक्तीचा साजिरा उत्सवच! श्रद्धा गायकवाड, अशोक गुप्ते, अरविंद बुधकर, प्रशांत पनवेलकर यांच्या कविता वाचकांच्या अंतःकरणाला नवे स्पंदन देतात. यासोबतच नियमित सदरे, पुस्तकपरीक्षणे आणि विविध शाखांचे अहवाल या अंकाची समग्रता अधिक दृढ करतात. साहित्यशाखेचा अहवाल प्रतिभा सराफ, नाट्यशाखेचा अहवाल डॉ. मिलिंद जोग, तसेच संघमंदिर समितीचा अहवाल व समीक्षालेखन चंद्रशेखर गोखले यांनी सादर करून या अंकाच्या आशयवैविध्याला नवी परिमाणे दिली आहेत.

अशा या बहुआयामी, बहुरंगी आणि बहुस्पर्शी साहित्यप्रवासात प्रत्येक वाचकाला काहीतरी आपलेसे, काहीतरी नवीन आणि काहीतरी विचारप्रवर्तक सापडेल, याची आम्हाला खात्री आहे.

लेखकांच्या सृजनशीलतेचा, विचारांच्या प्रगल्भतेचा आणि वाचकांच्या प्रेमळ सहवासाचा हा संगमच या अंकाला खऱ्या अर्थाने परिपूर्ण बनवतो.

आपण या साहित्यसफरीचा आस्वाद मनापासून घ्याल, हीच अपेक्षा.

या अंकांचे सुबक मुखपृष्ठ चित्रकार दाते यांनी अल्पावधीत साकारले.

या अंकासाठी अनेकांचे सहकार्य लाभले, सर्वांचे आभार...

**– प्रा. प्रतिभा बिस्वास**
संपादिका

# व्यंकटेश माडगूळकर यांचे देशीकार लेणे

डॉ. मोना चिमोटे

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील वय वर्षे ४ ते १६ हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असतो. या वयात त्याने घेतलेले अनुभव, जगलेला परिसर, केलेले पाठांतर त्याच्या स्मरणात चिरकाल जपून असते. पुढील आयुष्य कितीही संपन्न, यशस्वी आणि बहुविध असलं तरी बालमनात कायम ठसा उमटवून गेलेल्या बाबी त्याला पुसता येत नाहीत. या आठवणींमधील काही क्षण त्याचा आयुष्यभर पाठलाग करतात. त्यातही हव्याहव्याशा वाटणाऱ्या क्षणांना तो सतत गोंजारत राहतो. कुणाला या आठवांना सुरेख शब्दरूप देता येतं, तर कुणाला फक्त नॉस्टेल्जिक होऊन स्मरणातच रमता येतं.

व्यंकटेश माडगूळकर असे लेखक आहेत, की त्यांनी बाल-किशोरवयात जो काळ जगला, तो आपली प्रतिभा आणि संवेदनक्षमता ह्या रसायनातून साहित्यनिर्मिती करून जिवंत केला. आपल्या स्वतःसह अनेकांच्या स्मृतींचे ते प्रातिनिधिक शब्दरूप ठरले.

व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म ५ एप्रिल, १९२७ आणि स्मृतिदिन २८ ऑगस्ट, २००१ रोजीचा. कथाकार, कादंबरीकार, नाटककार, पटकथालेखक, संवादलेखक, अनुवादक, ललितगद्य लेखक, प्रवासवर्णनकार, लोकनाट्य, कविता, आत्मचरित्रात्मक व्यक्तिचित्रे, संकलित ग्रंथ, तमाशासाठी लेखन, रेडिओसाठी लेखन असे विविधांगी लेखन करणारे आणि रेखाटनकार असलेल्या माडगूळकरांनी मराठी साहित्याला समृद्ध केले. त्यांच्या कथांचे हिंदी, इंग्रजी, उर्दू, डॅनिश, जर्मन, जपानी, कन्नड, रशियन अशा देशीविदेशी भाषांतून भाषांतर झाले आहे. १९८३ साली अंबेजोगाई येथे भरलेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'चे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या विलक्षण प्रतिभेने भारलेल्या साहित्याचा आढावा घेण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न होय. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील माडगूळ/आटपाडी या लहानशा खेड्यात झाला. त्यांचे वडील औंध संस्थानाचा कारभार सांभाळत होते. लहानाचे मोठे होईपर्यंतची १८ वर्षे त्यांनी याच परिसरात घालवली. त्यांचे औपचारिक शिक्षण फारसे झाले नसतानाही ते निसर्गाच्या पाठशाळेत समृद्ध झाले. थंडी-ऊन-वारा यांच्याशी मैत्री करत ओढ्या-ओघळींच्या हिरव्यागार काठावर, विस्तृत माळरानात नि काटवने, टेकड्या, खडी आणि ताली यांतून मित्रांसोबत हिंडता-फिरता ते कळते-सवरते झाले.

गावगाड्यातील रामोशी, फासेपारधी, धनगर, वैदू अशा रानोमाळ हिंडणाऱ्या अठरापगड जातिजमातींची पोरं त्यांचे खेळगडी होते. त्यांच्या सोबत शेतात-मळ्यात हिंडताना सरूड, फरूड, घोरपडी, सापसुरळीसारखे सरपटणारे प्राणी, चितूर, भूरगुंज्या, भोरड्या, पकुर्ड्या, कांडाकरकोचा, धनचिडी, पोरचाळवणी यांसारख्या प्राणी-पाखरांच्या मागे ते धावत. झिंगे, डोकरा, मरळ, बामसारखे मासे, खेकडा, बिरोळा, पाननिवळी यांसारखे जलचर आणि मालठिसकी, लांडगा, खोकड, मुंगूस, खारी यांसारख्या अठरापगड प्राण्यांना ते सोबत करत.

माणदेशातील पाखरं-प्राणी-कीटक जो रानमेवा खात असत, तोच माडगूळकरही खात. निवडुंगाची तांबडी-भडक बोंडे, मधाळ गोंदणे, रानबोरे, लेंडी जांभळे, उंबरे, टेंबरे, कवठे, बेलफळे, बाभळीचा डिंक, चिंचेचा मोहर, पिकलेल्या निंबोळ्या, कांगुण्या, शेंदण्या, निळुंब्या, अळुंब्या, नेपतीची फळे इत्यादी रानमेव्याची मेजवानी त्यांनी चाखली होती. त्यासोबतच ज्वारीचा-गव्हाचा हुरडा, ओल्या भुईमुगाच्या व वाटाण्याच्या शेंगा, मक्याची कणसं, हरबक्षवयाचा हावळा असे इष्टमित्रांसह 'चवीचे उत्सव' त्यांनी साजरे केले होते.

माडगूळकरांच्या घरातील सण-उत्सवांच्या निमित्ताने ते आदित्य-राणूबाईच्या कहाण्या ऐकत, गावातील देवळात हरिकथा ऐकत. गावातील पटांगणात गोंधळ, जागर, सोंगी, भारुडं, भेदिके, तमाशा, ललित ऐकत. फिरस्ते, वासुदेव, बाळसंतोष, भराडी, वाघ्ये, काशीकापडे, भोरपी यांचेकडून साधुसंतांचे नि संतमहात्म्याचे बोल त्यांच्या मनात बिंबले जात. अत्यंत संस्कारक्षम वयात बहुश्रुत होण्याचं भाग्य त्यांना लाभलं होतं.

माडगूळकरांना चित्रकलेत चांगली गती होती. घरात कुणी चित्रकार नव्हते; पण चित्रकलेतील पहिली गुरू ते आपल्या आईला मानत. वर्षभर विविध व्रतवैकल्यांच्या निमित्ताने आईची चित्रकला माडगूळकर निरखित असत. त्यांची आई नागपंचमीला नागाची चित्रं, वटपौर्णिमेला वटवृक्षाचे चित्र, रथसप्तमीला सूर्याचा



व्यंकटेश माडगूळकर

रथ, दाराच्या चौकटीवरच्या सटवाया, हत्ती अशी चित्रे रेखाटत असे. शिवाय व्रताचाच भाग म्हणून आईची शिल्पाकृती माडगूळकर न्याहाळीत. दिवाळीत शेणाचे पाच पांडव आणि बळीराम, पोळ्याला चिकणमातीचे बैल, गणेशचतुर्थीला शाडूचा गणपती इत्यादी कलाकुसर ते घरात वर्षानुवर्षे बघत होते आणि स्वतःही त्यात सहभागी होत होते. आईच्या बोटांनी वळलेल्या विविध काडवाती, फुलवाती, गेजमाळा, रांगोळ्या, संक्रातीचे सजलेले घट आणि चैत्रगौरीची आरास... अशा नानाविध आकृत्या, रंग, रेषा यांची सुंदर रूपं त्यांच्या मनात साठलेली होती.

इयत्ता पाचवीत असताना चित्रकलेच्या शिक्षकांच्या प्रेरणेने त्यांनी चित्रकलेच्या प्राथमिक परीक्षा पास केल्या. काही काळ त्यांनी कलाल मास्तरांच्या हाताखाली बोर्ड व रस्त्यावरचे दगड रंगवण्याचे कामही केले. पुढे 'पेंटिंग'चे शिक्षण घेण्यासाठी ते कोल्हापूर येथे गेले. 'दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूट' या संस्थेत शिक्षण घेत असतानाच ते स्वातंत्र्यचळवळीत पडले. आणि पुढील चार वर्षे त्यांना पळापळीत, धामधुमीत घालवावी लागली. आंदोलनात भटकताना जीवनाचे अत्यंत दाहक अनुभव त्यांनी घेतले. त्यांच्यापुढे जीवनाचे वेगळेच ग्रंथालय खुले झाले... जे आयुष्यभर उघडेच राहिले. त्या काळात त्यांना चित्रकलेत चांगले शिक्षण घेता आले असते तर त्यांची

वाट शब्दांकडे न जाता रंगरेषांकडेच वळली असती, असं त्यांनीच लिहून ठेवले आहे.

गावी होणाऱ्या वार्षिक शिकारसणातून त्यांना शिकारीचे वेड लागले. रामोशी जातीतल्या पोरांना शिकार केल्याशिवाय मांस खायला मिळत नसे. त्यांच्याकडूनच माडगूळकरांनी शिकारीचे धडे गिरवले. शिकारीच्या नादापायी ते बंदूक पाठीशी टाकून खूप हिंडले. बरंच बघितलं नि निसर्गाची बाराखडी शिकले. ओढे, तळी, डोंगर, झाडं, कुरणं, पक्षी-प्राणी यांच्याशी जसा त्यांचा घनिष्ठ संबंध आला, तसाच वैदू, फासेपारधी, लमाणी, रामोशी, मांग, कातकरी, बैगा ह्या वन्य जमातींशीही आला. त्यांची भाषा, त्यांचं जीवन यांचा थोडाफार परिचय त्यांना झाला होता. हे लोक जसं आपलं जीवन रानात आणि जंगलात घालवतात, निसर्गाची निरागसता नि प्रसन्नता घेत निसर्गाचाच भाग होतात, तसंच आयुष्य आपण घालवावं, असं माडगूळकरांना सतत वाटत असे. असं जीवन जगण्याची असोशी माडगूळकरांना आयुष्यभर व्यापून होती.

निसर्गाच्या कुशीत माडगूळकरांचे बालपण गेले. पुढे कामधंदा, व्यवसाय नि नोकरी यांसाठी ते पुणे-मुंबई येथे वास्तव्याला राहिले. तनाने जरी ते या महानगरांमध्ये राहत असले, तरी मनाने मात्र ते निसर्गाच्या भव्यतेत अडकून पडले होते. रानावनातील अद्भुत जगाविषयीचे त्यांचे अपार कुतूहल कायम होते. आणि म्हणूनच त्यांच्या वाचनातील पुस्तके बहुतकरून प्रवास, निसर्ग, राने-वने, पशु-पक्षी, कीटक यांच्याविषयी लिहिलेल्या पुस्तकांचेच होते.

माडगूळकरांच्या कथालेखनाची सुरुवात एका मुक्या जनावराप्रती वाटणाऱ्या कणवेतून झाली. प्रत्यक्ष घडलेली ती घटना होती. एके दिवशी रस्त्यावरचे कुत्र्याचे पिल्लू त्यांनी घरी आणले होते. घरातील सर्वजणांनी त्यास लळा लावला. परंतु पुढे त्याचे तोंड काळ्या रंगाचे असल्याने ते अपशकुनी ठरवले गेले. दरम्यान घरात योगायोगाने दुर्दैवी प्रसंग ओढवले. आणि काळ्या तोंडाच्या त्या पिल्लाची उपेक्षा सुरू झाली. सर्वांकडून दुर्लक्ष होत गेलेलं पिल्लू एक दिवस आपणहूनच त्यांचे घर सोडून निघून गेले.

ह्या अभागी कुत्र्यावर माडगूळकरांनी 'काळ्या तोंडाची' ही कथा लिहिली. ती १९४६ साली 'अभिरुची' मासिकात प्रसिद्ध झाली. पुढे त्यांच्याकडून सातत्याने लेखनाची मागणी होऊ लागली. माडगूळकर कथालेखन करू लागले. 'माणदेशी माणसां'चे दर्शन घडवणारी निराळीच सृष्टी आपल्या कथांमधून त्यांनी उभी केली. बालवयात किन्हई, कुंडल, माडगूळ यांसारख्या गावात भेटलेली सामान्य माणसं त्यांच्या कथांचा विषय ठरलीत. येथे भेटलेल्या सवंगड्यांकडून त्यांनी गोष्टीवेल्हाळपणा

घेतला. तोच त्यांच्या कथांना आशय-विषय पुरवू लागला. कथेच्या भाषेतील साधेपणा, निरागसता आणि जोम भरण्याची शैली त्यांना इथेच गवसली. ग्रामीण जीवनाचे अस्सल आणि जिवंत चित्रण त्यांनी आपल्या कथांमधून केले. त्यांचे 'माणदेशी माणसं' (१९४९), 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१), 'सीताराम एकनाथ' (१९५१), 'हस्ताचा पाऊस' (१९५३), 'काळी आई' (१९५४), 'उंबरठा' (१९६०), 'जांभळाचे दिवस' (१९६१), 'बारी' (१९८१) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. जवळपास दोनशेच्यावर कथा त्यांनी लिहिल्यात.

त्यांच्या कथा ह्या एकेका व्यक्तिचित्रणाच्या कथा होत. म्हणूनच या कथा आत्मचरित्रात्मक होतात. नवकथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असलेले व्यक्तिदर्शन माडगूळकरांनी आपल्या कथेतून विलक्षण प्रत्ययकारितेने रेखाटले आहे. घटनेपेक्षा व्यक्तिचित्रणाला महत्त्व देत, रोजच्या वापरातील भाषा आणि भावनांचा एकात्म परिणाम साधणाऱ्या कथा लिहून ग्रामीण नवकथेचे अग्रदूत म्हणून त्यांनी मराठी साहित्यात लौकिक प्राप्त केला.

माडगूळकरांच्या कथांमधील गाव हे केवळ पार्श्वभूमी म्हणून येत नाही, तर गाव स्वतः एक जिवंत पात्र बनते. त्यांनी या गावातील कोरड्या मातीसह सामान्य माणसांच्या जगण्यातील ओलावा टिपला आहे. तेथील दुष्काळ, गरिबी, संघर्ष, सामाजिक संबंध, नातेसंबंध आणि लोकजीवन यांचे अत्यंत प्रभावी चित्रण आपल्या कथांमधून केले. त्यांनी केलेले हे चित्रण केवळ वर्णनात्मक नाही, तर मानवी अस्तित्वाच्या मुळाशी जाणारे आहे. म्हणून त्यांच्या कथा केवळ मनोरंजन घडवत नाहीत, तर त्या वाचकाला अंतर्मुख करतात.

माडगूळकर यांच्या कथांचा केंद्रबिंदू माणूस आहे. माणसाच्या स्वभावाचे स्थायिभाव ते लीलया रंगवितात. प्रेम, माया, भीती, लोभ, मत्सर, करुणा, स्वाभिमान आणि संघर्ष यांचे अत्यंत सूक्ष्म पदर ते आपल्या कथांच्या पात्रांद्वारे उलगडतात. बकऱ्यावानी पाला-पाचोळा खाऊन जगणारा धर्मा रामोशी, ''जलमभर असंच दळिंद्री राहून आम्ही मसनवटाला जायचं'' असे आर्ततेचे उद्गार काढून देवाला जाब विचारणारा रामा मैलाकुली, ''मी वेडा हाय काय?'' असं दीनपणे विचारणारा मुलाण्याचा बकस, चांगली विंग्रजी बुकं पढलेली पोरं तुम्ही! काय रं सांगायचं तुम्हाला? दिवसाराती बासरी वाजवीत बसता! बोडक्या बायकांनी ऐकू नये बासरी!' असा सामाजिक संकेत स्वतः पाळत इतरांना पाळायला लावणारी खाला तांबोळीण, ''मी खोटं सांगत अशीन, तर माझी जीभ झडंल, हिरीचं पानी खारं न्हाई, गोडं हाय!'' असं जीव तोडून सांगणारा महारवाड्यातील म्हातारा येताळा नाना, देखणी बायको शोभत नाही म्हणून नवऱ्याने टाकून दिलेली चमन इत्यादींची व्यक्तिचित्रे

माडगूळकरांनी आपल्या कथांमधून पात्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यांसह जिवंतपणे साकारली आहेत.

ग्रामीण माणसाचे जगणे केवळ आर्थिक चौकटीतून ते बघत नाहीत तर त्यांच्या भावविश्वाचे आंतरिक दर्शन ते आपल्या कथांमधून घडवतात. त्यांच्या कथांमध्ये आलेला परिसर हा निसर्गरम्य, फिरायला जाण्यासाठी आकृष्ट करणारा नाही, तर नदीचे आटलेले पात्र, काटेरी झुडपं, पावसाची प्रतीक्षा करणारी माळराने आणि गावातील दुष्काळ असा रणरणता हा परिसर आहे. या साऱ्यांचे अत्यंत वास्तव दर्शन त्यांच्या कथांमधून होते. माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेली गुरे-ढोरे, पक्षी त्यांच्या कथांमधून येतात. या प्राण्यांच्या माध्यमातूनही माडगूळकरांनी मानवी भावनांचा शोध घेतला असल्याचे प्रत्ययास येते.

माणदेशातील जीवन पूर्णपणे जगलेल्या माडगूळकरांच्या लेखनात कुठेही कृत्रिमपणा नाही, भावनांचे अवास्तव उदात्तीकरण नाही. त्यांच्या कथा म्हणजे ग्रामीण जीवनाचे एक सांस्कृतिक दस्तऐवजीकरण होय.

माडगूळकरांच्या कादंबऱ्यांमधूनही माणदेशातील कोरडी जमीन, दुष्काळ, संघर्षमय जीवन, माणसांची नाती, पशु-पक्षांचे सहजीवन, सामाजिक विषमता आणि माणुसकीचे विविध रंग अत्यंत प्रभावीपणे उभे राहतात. 'पुढचं पाऊल' (१९५०), 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४), 'कोवळे दिवस' (१९७९), 'सत्तांतर' (१९८८), 'करुणाष्टक' (१९८२) या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या होत.

माडगूळकरांनी 'बनगरवाडी' ही प्रादेशिक कादंबरी लिहून 'माणदेशा'ला मराठी वाङ्मयविश्वात अजरामर करून ठेवले आहे. या कादंबरीतील कथानकाची व्याप्ती जरी अल्प असली, तरी त्यातील आशयाचा अवकाश मोठा आहे. मानवी जीवन आणि निसर्ग यांचे अतूट नाते या कादंबरीला संपन्नता आणते.

राजाराम हा विशी-बाविशीतील मास्तर बनगरवाडीत येतो. मुलं नसलेल्या शाळेत हजर होतो. वाडीच्या धनगरांच्या सोबत-समवेत राहून त्यांच्या सहकार्याने शाळा सुरू करतो. त्यांच्याच मुलांना शिकवितो. दुष्काळ पडल्यावर बनगरवाडी उजाड होते आणि मास्तरची बदली होते. एवढेच या कादंबरीचे कथानक आहे. मात्र मास्तरच्या दृष्टीतून टिपलेली 'बनगरवाडी' माडगूळकर चित्रमय रूपात साकारतात. तेथील माणसांचे, प्राण्यांचे, निसर्गाचे एक साजिवंत विश्वच ते उभे करतात. येथल्या मेंढपाळांचे जग अभावग्रस्त, अनागर नि गबाळे असले तरी त्यांची पाय रोवून उभं राहण्याची इच्छाशक्ती मात्र विलक्षण असल्याचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे त्यांनी या कादंबरीत केले आहे. या गावातील लोकांबद्दल मास्तरला माया वाटते. त्यांच्या

दुःखाने त्याला पाझर फुटतो. गावातील ही माणसं कुठल्याही कृत्रिम आदर्शवादाने भारलेली नसल्याने तो त्यांना सर्वतोपरी मदत करतो. त्यांच्या स्वभावातील निरागसतेला व वाट्याला आलेल्या संघर्षाला माडगूळकरांनी उजागर केले आहे. कारभारी, आयबू, शेकू, अडाणी धनगर, अंजी, रामोशी या पात्रांच्या माध्यमातून ग्रामीण वास्तव माडगूळकर रेखाटतात. या कादंबरीची भाषा अत्यंत साधी, सरळ आणि येथल्या माणसांच्या भावविश्वाला साकारणारी आहे.

माडगूळकरांनी 'वावटळ' या कादंबरीत शीर्षकाप्रमाणेच सामाजिक बदलांचा सामान्य माणसाच्या जीवनावर झालेल्या परिणामांचे चित्रण केले आहे. महात्मा गांधी यांची हत्या झाल्यावर पुण्यात ब्राह्मणांची घरे पेटविली गेली. आजूबाजूच्या खेड्यापाड्यातही भयाण जाळपोळ झाली. खरं म्हणजे जातिपातीचा फारसा अभिमान न बाळगणाऱ्या गाव-खेड्यात मूठभर लोक एकमेकांत वैरभावाने वागू लागले. जणू माणुसकीचा दुष्काळ पडला होता. बदलत्या परिस्थितीत माणूस स्वतःची ओळख टिकवून ठेवण्यासाठी जीवाचा आटापिटा करतो. कधी तो आशेवर जगतो, तर कधी खचून जातो, कधी पुन्हा उभा राहतो. माडगूळकरांनी या कादंबरीत अशा मानसिक संघर्षांचे चित्रण अत्यंत सूक्ष्मपणे केले आहे, म्हणूनच यातील पात्रे ही वास्तववादी वाटतात. खरं म्हणजे ही कादंबरी नाहीच, तर तो इतिहास आहे.

'वावटळ' या कादंबरीचे इंग्रजी, रशियन अशा अनेक भाषांत भाषांतर झाले. रशियन भाषेत एक लाख प्रतींमध्ये ही कादंबरी छापली गेली. आधुनिक भारतातील समस्यांची व्याप्ती, गुंतागुंत, त्यातील विरोधाभास यांची वाचकाला उकल व्हावी, या उद्देशाने 'चारी दिशांकडून' या पुस्तकाच्या हार्ड बाउंड प्रतीत चार भारतीय लेखकांच्या साहित्यात माडगूळकरांच्या 'वावटळ' या कादंबरीचा समावेश केला गेला. भारतातील प्रातिनिधिक वाङ्मयाच्या स्वरूपाचे दर्शन घडविण्याचा हेतू या भाषांतरामागे होता.

माडगूळकरांची 'सत्तांतर' ही कादंबरी विलक्षण गाजली. १९८३ मध्ये या कादंबरीला 'साहित्य अकादमी' पुरस्कार प्राप्त झाला. मानवी संस्कृतीच्या आदिमकाळापासून अस्तित्वात असलेल्या सत्तासंघर्षाचे औपरोधिक चित्रण माडगूळकरांनी या कादंबरीत केले आहे. मानवी जीवनाइतकेच प्राणिजीवनात रमणाऱ्या माडगूळकरांनी ही कादंबरी वानरांच्या विश्वासंबंधी साकारली आहे. वानरांच्या तीन प्रकारच्या कळपांमधल्या सत्तास्पर्धेचे चित्रण त्यात आहे. वानरांचा दैनंदिन जीवनव्यवहार, वागण्याच्या तऱ्हा, सवयी, दुसऱ्यांच्या सीमेवर आक्रमणाची वृत्ती, माद्यांची निवड करण्याची पद्धती आणि आपसातील संघर्ष यांचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण त्यांनी या कादंबरीतून पुढे केले आहे. मुडा, मोगा, लालबुड्या, थोटी,

लांडी, बोथरी इत्यादी वानरे या कादंबरीतील पात्रे आहेत. त्यांच्या शरीरवैशिष्ट्यांनुसार लेखकाने ही नावे त्यांना दिली आहेत. ही नावं केवळ ओळख म्हणून नसून त्या पात्रांच्या स्वभावांचे, त्यांच्या स्थितीचे प्रतीक आहे. त्यामुळे वाचक त्या वानरांकडे प्राणी म्हणून बघत नाहीत तर स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेले सजीव पात्र म्हणून बघू लागतात. या पात्रांमधील परस्परांबरचे प्रेम, द्वेष, तिरस्कार यांचे हुबेहूब चित्रण माडगूळकर करतात. त्यांना इतर प्राण्यांचे वाटणारे भय, आपापसांतील कमालीची स्पर्धा, बदल्याची भावना आणि एक संपला तरी नवा शत्रू समोर उभा होण्याचा संभव, असे सत्तास्पर्धेचे चित्र अत्यंत सूक्ष्म निरीक्षण त्यांनी वर्णित केले आहे. मानवामध्ये दडलेली सत्तेची लालसा, शौर्य, हिंसा आणि वासना या आदिम प्रेरणांचे प्रातिनिधिक दर्शन त्यांनी या कादंबरीतून घडवले आहे.

माडगूळकरांची 'पुढचं पाऊल' ही कादंबरी शोषित-वंचित-पीडित महार यांच्या समाजजीवनातील वास्तवाला कलात्मक आकार देणारी कलाकृती आहे. या कलाकृतीमध्ये महार समाजाचा प्रतिनिधी असलेला नायक कृष्णा आणि त्याचा विपरीत परिस्थितीशी सुरू असणारा संघर्ष केंद्रस्थानी आहे. स्वतंत्र, स्वायत्त आणि प्रतिष्ठित माणूसपणाचे जीवन जगण्यासाठी धडपडणारा कृष्णा आणि त्याच्या मार्गात येणारी बहुविध संकटं, यांचं दर्शन या कादंबरीतून घडते. पारंपरिक शोषण व्यवस्थेला झिडकारून स्वतःचे भविष्य घडवायला बाहेर पडणाऱ्या तरुणाची ही संघर्ष गाथा आहे. ही कादंबरी ग्रामीण आणि महानगरीय पातळीवर नायकाच्या संघर्षाला उजागर करते. 'कृष्णा' हा तत्कालीन कालखंडातील शोषितांचा प्रतिनिधी आहे. परिवर्तनाच्या ईर्ष्येने तो भविष्याकडे पाऊल टाकतो. नवे जीवनभान, आत्मजागृती आणि अस्मिता यांतून त्याच्या जीवनाचा झालेला विकास माडगूळकरांनी अधोरेखित केला आहे. दलित-शोषित-कष्टकरांप्रती असलेल्या कळवळ्यातून व त्यांच्या उत्थानाच्या प्रबळ तळमळीतून ही कादंबरी आकार घेते.

माडगूळकरांची 'करुणाष्टक' ही कादंबरी म्हणजे त्यांच्या कुटुंबाची कहाणीच. त्यातून पुढे येणारं आईचं चित्रण म्हणजे जणू तिचे चरित्रच होय! आठ मुलांना वाढवणाऱ्या आईची ही कथा वाचताना अनेकदा डोळे भरून येतात. या आठ मुलांच्या रूपानं आईपुढे येणाऱ्या ज्या समस्या उभ्या राहतात, त्या जणू नियतीने आईला घालून दिलेली आठ कोडी होत! हेच तिचे करुणाष्टक होय! जे लेखकाने अत्यंत हळुवारपणे आणि हळवेपणाने रेखाटले आहे. या पुस्तकात आलेला काळ हा दुसऱ्या महायुद्धाचा आहे. भारतीय स्वातंत्र्य, गांधी हत्या हे प्रसंग यात आले आहेत. या पुस्तकातील रेखाटने माडगूळकरांनी स्वतः रेखली आहेत.

माहेरी संपन्नता पाहिलेली आई सासरी आल्यावर खाऊन-पिऊन सुखी

असलेला संसार चालवीत असते. मात्र पुढे सासऱ्यांच्या मृत्यूमुळे आणि नवऱ्याच्या नोकरीनिमित्त बेगवेगळ्या ठिकाणी कराव्या लागणाऱ्या फिरस्तीमुळे संसाराचा गाडा रेटणे तिला अवघड होते. प्लेगच्या साथीत रानात झोपडे बांधून त्यात राहण्याची वेळ या कुटुंबावर येते. दरम्यान मुलांची प्रचंड दुखणी आईला काढावी लागतात. आठ भावंडांची चिंता वाहताना आईला अनेक भोग भोगावे लागतात. वडील प्रसंगी खचून जात असत; पण आई मात्र खंबीरपणे शून्यातून संसार सावरित राही. माडगूळकर लिहितात, माझ्या आईचा जीवनप्रवास हा परिस्थितीच्या वाळवंटातून केलेला खडतर आणि लांबलचक प्रवास आहे. त्यात डोक्यावर आग ओतणारा सूर्य आहे. अचानक आडवं येऊन मार्ग खुंटविणारी वाळूची टेकाडं आहेत. धुळीची वादळं आहेत. तहानतहान आहे. हिरवळ आहे आणि पाणी आहे, पुष्कळ काहीबाही आहे. ('करुणाष्टक', माडगूळकर व्यंकटेश, मेहता पब्लिशिंग हाउस, पुनर्मुद्रण-२०२३, (पृ.क्र.५५) अशा शब्दांत लेखकाने या पुस्तकाच्या लेखनाचे सार आणि आईची महती सांगितली आहे.

माडगूळकरांची 'छोटा जवान' ही कादंबरी जाणीवपूर्वक शालेय विद्यार्थ्यांसाठी लिहिलेली असून राष्ट्रउभारणीच्या कार्यात त्यांनी आत्मीयतेने सहभाग घ्यावा व त्यांच्यावर राष्ट्रप्रेमाचा मूल्य संस्कार प्रभावीपणे उमटावा, या उद्देशाने ही कादंबरी लिहिली असल्याचे जाणवते. त्यांच्या इतर कादंबरी लेखनाप्रमाणे ही कादंबरी मात्र वास्तवाच्या अंगभूत अंतःप्रवाहाला पुरेशा सामर्थ्याने स्पर्श करीत नसल्याने, काहीशी ती क्षीण जाणवते.

माडगूळकरांची 'कोवळे दिवस' ही कादंबरी प्रथमपुरुषी निवेदनातून साकार झाली असून राजा नावाच्या एका उमलत्या तारुण्याची अनुभवगाथा यात आविष्कृत झाली आहे. कादंबरीतील नायक राजा याची भूमिगत क्रांतिकारकांशी गाठ पडते. वडिलांसाठी एक चिठ्ठी ठेवून राजा घरातून चळवळीत सामील होण्यासाठी बाहेर पडतो. ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर उभा असलेला मुलगा घरातून निघून गेल्याने आईवडील काळजीत पडतात. दोन वर्षे, पाच महिने राजा चळवळीत काम करतो. घरी आल्यावरही तो भूमिगत जीवन जगत चळवळीचे काम करीत राहतो. शेवटी कंटाळून पोलिसांना शरण जायचं ठरवतो. पण सुदैवाने सगळ्यांची सार्वत्रिक मुक्तता होते. देवालयावर दरोडा घातल्याबद्दलच्या या खटल्यातून राजा मुक्त होतो. साधारण १९४२ ते १९४७चा कालखंड या कादंबरीत आला आहे. या काळात राजाचे व्यक्तिमत्त्व कसे फुलत गेले, याचा कलात्मक आलेख प्रस्तुत कादंबरीत चित्रित झाला आहे. माडगूळकरांनी अत्यंत संवेदनक्षम मनाने जे आयुष्य अनुभवले होते, त्या आठवणींचे सुसंगत असे निवेदन 'कोवळे दिवस' यात केले आहे, असे

सूचकपणे अनेक समीक्षकांनी नोंदवले आहे. वि.रा. जोशी म्हणतात, रंग-रेषांच्या मागे लागणारा एक कोवळा मुलगा जीवनातील जन्म, मृत्यू, भूक, उपासमार इत्यादी विविध प्रकारच्या अनुभवांनी सुन्न होतो. रंगरेषांच्या साहाय्याने हे अनुभव सांगता येणार नाहीत म्हणून तो शब्दांकडे येतो. ('व्यंकटेश माडगूळकर यांचे कल्पविश्व', माधव निरंजन, श्री रेणुका प्रकाशन, नागपूर, प्र.आ.२०१३,पृ.क्र.३२४)

खरं म्हणजे 'वावटळ', 'कोवळे दिवस', 'करुणाष्टक' आणि 'चित्रकथी' यांसारख्या कादंबऱ्यांमधून माडगूळकर आत्मप्रत्ययात्मक वास्तवाला आविष्कृत करण्याचा प्रयत्न करतात. या सगळ्याच आत्मचरित्रप्रधान रचनाबंधाच्या निर्मितीची प्रेरणा मुळात अत्यंत संवेदनशील वयात घेतलेल्या अनुभवांच्या उत्कट स्मरणांचे स्वाभाविक लयीत केलेले चित्रांकन होय, असे आवर्जून जाणवते.

माडगूळकरांच्या कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखा जिवंत आहेत. त्या दीर्घकाळ वाचकांच्या मनात रेंगाळत राहतात. त्यांच्या कादंबऱ्या वाचताना आपण केवळ कथा वाचत नाही, तर एका संपूर्ण जीवनसंस्कृतीचा अनुभव घेतो आहोत, असे जाणवते. त्यांच्या कादंबऱ्या हे केवळ साहित्य नाही, तर माणुसकीच्या शोधाची जिवंत गाथा आहेत. त्यांच्या पात्रांमध्ये मानवी ऊब अनुभवयास मिळते. त्यांच्या कादंबऱ्यांची भाषा ही त्यांच्या साहित्याची मोठी ताकद आहे. ग्रामीण बोली भाषेचा अत्यंत नैसर्गिक वापर ते आपल्या कथा-कादंबऱ्यामध्ये लीलया करतात.

माडगूळकरांनी 'पती गेले गं काठेवाडी', 'तू वेडा कुंभार', 'सती', 'बिन बियांचे झाड' अशी काही नाटके लिहिली. 'तू वेडा कुंभार' हे नाटकही ग्रामीण जीवनाचा मातकट रंग दाखविणारे आहे.

माडगूळकरांसमोर चरितार्थ चालवण्यासाठी खरं म्हणजे दोन पर्याय पुढे होते. चित्रकार म्हणून कारकिर्द सुरू करूनही पुढे त्यांनी लेखन करण्याचा मार्ग स्वीकारला. कथालेखन बहरत असताना त्यांना अनेक कामांच्या संधी येत गेल्या. त्यांच्या 'गावाकडं' आणि 'देवा सखा महार' ह्या लघुकथा चित्रपटासाठी घेतल्या गेल्या. मराठी चित्रपटासाठी कथा, पटकथा, संवाद इत्यादी लेखन करण्याची संधी त्यांना मिळू लागली. त्यातून त्यांना पैसाही मिळत होता. 'वंशाचा दिवा' (कथा), 'जशास तसे' (कथा), 'सांगत्ये ऐका' (पटकथा-संवाद), 'रंगपंचमी' (पटकथा-संवाद) यांद्वारे त्यांनी चित्रपटसृष्टीत आपला ठसा उमटविला. परंतु चित्रपट क्षेत्रात ते रमले नाहीत. पुढे १९५५ साली त्यांना पुणे आकाशवाणी येथे ग्रामीण कार्यक्रमांचा संयोजक म्हणून नोकरी मिळाली. ते केंद्र सरकारच्या सेवेत रूजू झाले आणि तब्बल चाळीस वर्षे त्यांनी तेथील ग्रामीण विभाग सांभाळला. यादरम्यान त्यांनी विपुल लेखन केले. भरपूर प्रवास केला. त्यांनी आपल्या वाचनाच्या व्यासंगातून इंग्रजी शिकून घेतले आणि

पाश्चिमात्य साहित्याचे विपूल वाचन केले. जॉन स्टाइनबेक, जॉर्ज ऑरवेल आणि लिनय ओ फ्लाहर्टी या लेखकांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता.

माडगूळकरांना १९५९ साली ग्रामीण कार्यक्रमाच्या प्रशिक्षणसंदर्भात शासना-कडून ऑस्ट्रेलिया येथे पाठविण्यात आले होते. तेथील अनुभवांवर आधारित त्यांनी 'पांढरी मेंढरे, हिरवी कुरणे' हे प्रवासवर्णन लिहिले. ऑस्ट्रेलियातील महानगरांपासून ते ग्रामीण परिसरातील जीवन, संस्कृती, उद्योग आणि निसर्ग यांचे दृक्प्रत्यय देणारे हे प्रवासवर्णन असून विलक्षण प्रवाही आहे. याच अनुषंगाने १९६९ मध्ये त्यांना फ्रान्स आणि स्वित्झर्लंड या देशांनाही भेट देण्याची संधी मिळाली.

कालमानाप्रमाणे माडगूळकरांचा जसजसा भौगोलिक परिसर वाढू लागला, तसतशी त्यांच्या लेखनातील भौगोलिक परिसराची व्याप्ती वाढू लागली. प्रथम तो परिसर देशव्यापी झाला आणि नंतर विश्वव्यापी झाला. त्यांनी अनुभवलेल्या जीवनाचा कलापूर्ण प्रत्यय आपल्या ललितलेखनातून वाचकांना दिला. आपली ज्ञानलालसा, बहुश्रुतपणा आणि विद्वत्ता कलानिर्मितीच्या आड येऊ दिली नाही. ग्रामजीवन, लोकसंस्कृती, लोकभाषा, प्राणी आणि पक्षी जीवन, निसर्गसृष्टी या साऱ्यांचेच त्यांनी अभ्यासूवृत्तीने आकलन करून घेतले. 'जनअरण्या'पेक्षा 'वनअरण्य' त्यांना अधिक भावले. 'पांढऱ्यावर काळे' (१९७१), 'रानमेवा' (१९७८), 'नागझिरा' (१९७९), 'चित्रे आणि चरित्रे', 'चरित्ररंग' ही त्यांची ललित गद्य प्रकारातील पुस्तकं विलक्षण लोकप्रिय ठरली.

माडगूळकरांचा 'चरित्ररंग' हा संग्रह देश-विदेशांतील लेखक, चित्रकार आणि कलावंत यांना अवगत करून देणाऱ्या व्यक्तिचित्रे आणि चित्रस्मरणे यांवर लिहिलेला आहे. लिमाय ओ फ्लाहर्टी, जॉन स्टाइनबेक, गोविंद घाणेकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार इत्यादी लेखक आणि देऊसकर, व्हॉन गॉग, द.ग. गोडसे यांसारखे चित्रकार यांच्यातील लढाऊवृत्तीचे प्रेरणादायी चित्रण या संग्रहात आले आहे. माडगूळकरांना अमेरिकेत गेल्यावर अत्यंत आवडीच्या लेखकाच्या म्हणजेच जॉन स्टाइनबेक याच्या 'सालिनास' या जन्मगावी जाण्याचा योग आला. 'कॅनरी रो' ही जगविख्यात कादंबरी याच गावावरून त्याने लिहिली होती. ज्या भूमीवरून हा लेखक बावरला, त्या भूमीतून माडगूळकरांना स्टाइनबेकच्या अगदी जवळ आल्यासारखं वाटलं. दक्षिण फ्रान्सला गेल्यावर चित्रकार व्हॉन गॉगच्या आर्ल या कर्मभूमीचे दर्शन त्यांनी घेतले. पंढरीला गेल्यावर प्रसाद-बुक्का घ्यावा, तसे माडगूळकरांनी चित्रकलेचे साहित्य आर्ल या गावी विकत घेतले. फ्रान्समधल्या 'फाक्तर आ शवाल' या नावाने ओळखणाऱ्या रूलॉ या पोस्टमनच्या ओतरिव्ह या गावी ते मुद्दाम गेले. व्हॉन गॉगने त्याचे पोर्टेट काढून त्याला अजरामर केले आहे.

या संग्रहातील जगविख्यात लेखक आणि चित्रकार यांबद्दल आत्यंतिक जिव्हाळ्याचे लेखन वाचून वाचकांना तृप्त अनुभव येतो. 'प्रवास एका लेखकाचा' (१९९४) या पुस्तकांतून माडगूळकरांचा चित्र-रेषा-शब्द यांतून घडत गेलेला साहित्यिक प्रवास विस्मित करणारा आहे.

माडगूळकर यांनी वयाच्या आठव्या वर्षापासून ते म्हातारपणापर्यंत अगणित रेखाटने केलीत. वृत्तपत्रांना आणि मासिकांना त्यांनी खूप रेखाटने दिली. काही लोकांना वाटून दिलीत. त्यातील उरलेल्या रेखाटनांचा संग्रह 'शब्द' प्रकाशनाच्या सोहनी यांनी रसिकांसमोर आणला. 'जनावनातील रेखाटणे' (१९९९) या नावाने हा संग्रह प्रसिद्ध आहे. घरातील आप्त-सोयरे, देश-विदेशातील अनेक नामवंत लेखक, चित्रकार यांच्या रेखाटनांसह विविध अरण्य-वनातील पशु-पक्षी यांची अत्यंत बोलकी रेखाटने या संग्रहात बघावयास मिळतात. प्रत्येक रेखाटनाखाली त्यांनी लिहिलेली टीप त्या चित्राला अधिकच बोलतं करते.

माडगूळकरांचे जगणे आणि लेखनातून व्यक्त होणे, हे आरशाइतके पारदर्शक आहे. यात अजिबात फारकत नाही. कलावंताला आवश्यक असणारी अलिप्तता त्यांच्याकडे असली तरी त्यांच्या लेखनात मात्र रसरशीत व्यापकता आहे. जीवनानुभवांना सहजपणे व्यक्त करण्याची किमया त्यांना सहज साधली होती. त्यांच्या सर्वच लेखनाला माणदेशी मातीचा गंध आणि मानवतेचा ओलावा भारून आहे. त्याअर्थी त्यांचे लेखन हे 'देशीकार लेणे' ठरते.

माडगूळकरांच्या अशा विपुल साहित्याचा आढावा घेणे, ही अत्यंत दमछाक करणारी बाब आहे. विस्मयचकित करणाऱ्या या प्रतिभावंत कलावंताचे आयुष्य समजून घेत त्याचे साहित्यवाचन करणे, ही आजच्या काळातील लेखकांची खरी प्रेरणा असणार आहे.

साहित्यिक हा मुळातच असावा लागतो, तो घडवता येत नाही. जमिनीचं कवच फोडून वर उसळून येणाऱ्या बीच्या रसरशीत कोंभात जसं फळाचं आश्वासन असतं, त्याचप्रमाणे मुळातच प्रतिभा आणि शब्दावर हुकमत असली की आजूबाजूच्या वातावरणाला साहित्यिक कोंदण देणं शक्य होतं, जे व्यंकटेश माडगूळकर यांना सहज देता आलं. आपल्या अनुभवांना आणि सभोवतालाला साहित्यात गुंफता येण्याची दैवी देणगी त्यांना लाभली होती. प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि कलात्मकता या त्रयींमुळे माडगूळकरांचे मराठी साहित्यातील स्थान अढळ आहे.

**– डॉ. मोना चिमोटे**

भ्रमणध्वनी : ९४२२१५५०८८

# द मॅन हू मर्डर्ड मोरॅलिटी

डॉ. अनंत देशमुख

अमेरिकेत आल्यावर मी गुगलवर र.धो. कर्वे यांच्याविषयी कोणती नवनवीन माहिती उपलब्ध होते याचा शोध घेत राहतो. त्यामागे माझा हेतू रघुनाथरावांच्या संदर्भातील सारं उपलब्ध वाङ्मय मी पाहिलं आहे हे समाधान मिळावं, हा असतो. असा प्रयत्न करीत असताना डॉ. भावेश भोयर यांनी लिहिलेल्या 'द मॅन हू मर्डर्ड मोरॅलिटी' ही र.धो. कर्वे यांच्या जीवनावर लिहिलेली कादंबरी पाहण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्व्यांच्या दुसऱ्या खटल्यात वकीलपत्र घेऊन ती केस चालवली होती. डॉ. आंबेडकर यांच्याविषयी आपणा सर्वांच्या मनात असतो तसा असीम आदर आणि कृतज्ञतेचा भाव डॉ. भावेश भोयर यांच्या मनातही आहे आणि तो या लेखनात ठायी-ठायी व्यक्त झाला आहे.

रघुनाथरावांवर यापूर्वी चित्रपटाखेरीज साहित्यात चरित्रलेखन, कादंबरीलेखन आणि नाट्यलेखन झाले आहे. मराठीत आणि इंग्रजीतही त्यांच्या कार्याचा यथार्थ परामर्श घेणारे लेखन उपलब्ध आहे. हे लक्षात घेता, याच विषयावर आणखी एक कलाकृती लिहावी असा विचार डॉ. भोयर यांच्या मनात आला आणि त्यांनी त्या विषयाचा ध्यास घेऊन कादंबरीच्या रूपात तो आविष्कृत केला, म्हणून ते निस्संशय धन्यवादाला पात्र आहेत.

'द मॅन हू मर्डर्ड मोरॅलिटी' असं या लेखनकृतीचं शीर्षक असून 'forgotten Trial' असं उपशीर्षकही दिलं आहे. २०२५ साली ती (किंडल आवृत्ती) (Book on demand) प्रकाशित झाली आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ही कादंबरी अर्पण केलेली आहे.

या संदर्भात परिशिष्टमध्ये डॉ. भोयर यांनी पुढील विधाने केली आहेत :

ही कादंबरी, भारतीय कायदेशीर आणि सामाजिक इतिहासातील एका विस्मृत,

परंतु महत्त्वपूर्ण क्षणापासून प्रेरित असलेले एक काल्पनिक कथन आहे – तो क्षण म्हणजे प्राध्यापक आर.डी. कर्वे यांच्यावरील १९३४ सालचा अश्लीलतेचा खटला.

वैज्ञानिक लैंगिक शिक्षणाचे पुरस्कर्ते आणि एक अग्रगण्य सुधारक प्रा. कर्वे यांच्यावर त्यांच्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकात 'अश्लील' मानली जाणारी सामग्री प्रकाशित केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला होता. त्यांचे कार्य, जे त्या काळासाठी पुरोगामी होते, त्याने खोलवर रुजलेल्या रूढीवादी विचारांना आणि सामाजिक बंधनांना आव्हान दिले. डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी न्यायालयात कर्वे यांचा बचाव केला.

जरी तो खटला हरला गेला, तरी त्याने एका स्वतंत्र समाजात नैतिकता, सेन्सॉरशिप आणि अप्रिय सत्ये मांडण्याच्या अधिकाराबद्दल एक प्रभावी चर्चा सुरू केली. ही कादंबरी तथ्य आणि कल्पनेचे मिश्रण करून, एका नवीन स्वरूपात तीच चर्चा पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न करते.

याशिवाय (मी) डॉ. बी.आर. आंबेडकर यांचे मनःपूर्वक आभार मानतो, ज्यांचे जीवन समाजाच्या अंधाऱ्या कोपऱ्यांमध्ये आजही ज्योत प्रज्वलित करत आहे. त्यांच्या धैर्यामुळेच ही कथा शक्य झाली. असेही त्यांनी लिहिले आहे.

ही कादंबरी १०८ छापील पानांच्या, पुढील प्रकरणांमध्ये प्रवाहशील होते (१) अलिखित सत्य, (२) आग पसरली, (३) खटल्याच्या आदल्या रात्री, (४) चाचणी, (५) नैतिकता किंवा स्वातंत्र्याची हत्या, (६) निर्णय, (७) फाइल्स–वरील धूळ ही आहेत.

तथ्य आणि कल्पनेचे मिश्रण तिच्यात असल्याने 'तथ्य' कोणते ते एकदा पाहुया. प्रत्यक्षात र.धों. कर्वे यांच्यावरील खटल्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

**खटला : १**

१९३० ते १९४० या दशकात 'समाजस्वास्थ्य' मासिकावर अश्लीलतेसंबंधी तीन खटले झाले. पहिला खटला 'व्यभिचाराचा प्रश्न' या लेखावरून झाला. तो त्या मासिकाच्या सप्टेंबर, १९३१च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. पुण्याच्या यजुर्वेदीय माध्यंदिन सभेच्या वतीने अध्यक्ष सरदार जगन्नाथ महाराज पंडित यांच्या सहीने एक ठराव पास करून 'समाजस्वास्थ्य' हे अश्लील मासिक असून सरकारने त्यावर खटला भरावा असे म्हटले होते. या संस्थेचे चिटणीस विश्वनाथ बळवंत डावरे होते. तर संपूर्ण ठरावामागे अहिताग्नी शंकर रामचंद्र राजवाडे होते. २९ डिसेंबर १९३१ रोजी पोलीस इन्स्पेक्टर आचरेकर यांनी 'व्याभिचाराचा प्रश्न' ज्या अंकात प्रसिद्ध

झाला, त्या अंकाच्या सर्व प्रती जप्त करून रघुनाथरावांना कैद केली. ते २००० रुपयांच्या जामिनावर सुटले. इंद्रवदन मेहता या न्यायाधीशांसमोर तो खटला चालला. ४ एप्रिल १९३२ रोजी खटल्याचा निकाल लागून १०० रुपये दंड त्यांनी केला.

**खटला : २**

'समाजस्वास्थ्य'वर अश्लीलतेच्या आरोपावरून खटल्यांची मालिका सुरू झाली. मराठीतील एक पत्रकार का.न. निमकर हे त्यांच्या व्यवसायातील गुजराती मित्राच्या साहाय्याने गुजरातीत 'समाजस्वास्थ्य' काढीत असत. त्यात मराठी 'समाजस्वास्थ्य' मधला मजकूर प्रायः अनुवादून प्रसिद्ध करीत असत. तेव्हा 'समाजस्वास्थ'च्या डिसेंबर १९३३च्या गुजराती आवृत्तीतील पत्रक्रमांक ३, ४, १२ ही अश्लील ठरवून त्यावर खटला भरण्यात आला. ८ फेब्रुवारी १९३५ रोजी पोलीस इन्स्पेक्टर आचरेकर यांनी रघुनाथरावांना पुन्हा पकडून नेले, तेव्हा बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सहकारी असईकर हे रघुनाथरावांचे वकील होते. २८ फेब्रुवारी रोजी तो पुन्हा इंद्रवदन मेहता यांच्यासमोर चालवला गेला. त्यावेळी २४ एप्रिल १९३४ रोजी रघुनाथरावांना २०० रुपये दंडाची शिक्षा झाली.

**खटला : ३**

'समाजस्वास्थ्य'च्या सप्टेंबर १९३८च्या अंकातील 'कामकला' पुस्तकाच्या जाहिरातीवरून खटला झाला. वस्तुतः ती जाहिरात त्याआधीही प्रसिद्ध झाली होती, परंतु सप्टेंबरच्या अंकात जाहिरातीत 'अप्राकृतिक संभोग' शब्द घालण्यात आल्याने हा खटला झाला. ५ एप्रिल १९३९ रोजी रघुनाथरावांना पोलिसांनी पकडून नेले व त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली. २४ जून १९४० रोजी न्यायाधीश बाबरेकर यांनी निर्णय दिला. हा खटला रघुनाथरावांनी स्वतः चालवला. न्यायमूर्तींनी संशयाचा फायदा देऊन निर्णय दिला व रघुनाथरावांची त्यातून सुटका झाली.

अश्लीलतेच्या आरोपावरून रघुनाथराव कर्वे यांच्यावर झालेल्या खटल्याविषयीची वस्तुस्थिती अशी आहे. कर्वे-आंबेडकर हे दोन पुरुष दुसऱ्या खटल्याच्या वेळी एकत्र आले होते.

कलावंत म्हणून डॉ. भावेश भोयर यांनी या वास्तवातील घटितांचा वापर अत्यंत कल्पकतापूर्वक केला आहे, कथासौष्ठवाच्या उपयोगासाठी त्यांनी काही तपशील स्वीकारले, काही नाकारले. (प्रा. कर्मेकर यांना मुलगा असल्याचे दाखवले गेले आहे आणि प्रत्यक्षातील पॉप्युलर प्रिंटिंग प्रेसचे (छापखाना) व्यवस्थापक श्री.

गंडभीर यांच्यावर बेतलेल्या जयंत काळे यांना तुरुंगवास होतो हे दाखवले गेले आहे.) तर काही पुढेमागे केले. त्यांनी तिन्ही खटल्यांतील तथ्ये स्वीकारली, गुजराती 'समाजस्वास्थ्य' वगैरे संदर्भ गाळले आणि या तिन्ही खटल्यांमधील महत्त्वाच्या आणि मूलभूत गाभ्यालाच म्हणजेच आरोग्यविषयक, वैज्ञानिक ज्ञान मिळवण्याचा अधिकार, विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती याला त्यांनी प्राधान्य दिले. कादंबरीत प्रकरण क्र. ४/५/६ मध्ये खटल्यासंबंधीचे चित्रण येते.

र.धों. कर्वे यांच्यावरून प्रा. कर्मेकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरून डॉ. अद्वैत राव या दोन व्यक्तिरेखा त्यांनी निर्माण केल्या आहेत. त्यांच्यामधील साधर्म्याचा-वैधर्म्याचा लेखकाने कलात्मक पातळीवर अचूकपणे घेतलेला वेध आणि त्याचे केलेले चित्रण हा या कादंबरीचा आकर्षक भाग आहे.

राजारामशास्त्री भागवत, रियासतकार सरदेसाई, मामा वरेरकर, समतानंद अ.ह. गद्रे, रँग्लर र.पु. परांजपे, शकुंतला परांजपे ही र.धों. कर्वे यांच्या आजूबाजूची प्रख्यात मंडळी असताना, त्याचं चित्रण न करता जयंत काळे... अशी काही प्रमाणात कल्पनेवर विसंबून, पण आपल्या कथावस्तूच्या विकासाला पूरक व पोषक व्यक्तिचित्रं रंगवण्याची कल्पकता लेखकाने दाखवली आहे. लेखकाचे संपूर्ण लक्ष दोन लोकोत्तर व्यक्तींचं व्यक्तिमत्त्व, त्यांच्या मूल्यनिष्ठा आणि नैतिकता, व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य ह्यावरील त्यांची असीम निष्ठा आणि त्यांनी दिलेला चिवट लढा चित्रित करण्यावर आहे. चरित्रात्मक कादंबरी यातील 'चरित्र' यातून वास्तवाकडे केलेला निर्देश आणि 'कादंबरी' शब्दातून व्यक्त होणारा कल्पनियतेचा अवकाश याविषयीचे लेखकाचे कौतुकास्पद भान दिसून येते.

प्रथम प्रा. कर्मेकर यांची प्रवाहाच्या विरुद्ध पोहून जाण्याची वृत्ती आणि तसं धडाडीचं लेखन करण्याचा स्वभाव हे वाचकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

एकमेकांना जाणून घेणं हा राव-कर्मेकर यांचा व्यक्तित्वविशेष सुंदर पद्धतीनं आविष्कृत होतो. स्वतः डॉ. राव प्रा. कर्मेकर यांच्याकडे जातात. त्यांची चर्चा होते, तेव्हाचा हा प्रसंग-

''मला ते केलंच पाहिजे,'' कर्मेकर जराही न डगमगता उत्तर देतात, ''प्रत्येक माध्यमाने पाठ फिरवली तरीही. आम्ही घाण विकत नाही आहोत, आम्ही समज देत आहोत. जर समाजाला याची भीती वाटत असेल, तर समाजाला सुधारायची गरज आहे.''

एक शांतता आहे. आदरयुक्त. बौद्धिकदृष्ट्या भारलेली.

''मी तुमचं प्रकरण घेईन,'' राव म्हणतात. ''कोणतेही शुल्क नाही. कोणतीही

घासाघीस नाही.'' (पृ.४०)

व्यवस्थेकडून नाकारले गेलेले म्हणून अपमानित झालेले कर्वे आणि आंबेडकर समानधर्मा हे हेरून कादंबरीची केलेली रचना चातुर्यपूर्ण वाटते. 'अनेक वर्षांपासून त्यांच्या मनात धगधगत असलेली आग आता या खटल्यात एकवटली आहे.' असे वर्णन.




'तुमचं काम... त्याने माझ्या मनात काहीतरी ओळखीचं जागवलं.' असं डॉ. राव म्हणतात तेव्हा परस्परांच्या समानवृत्तीची ओळख पटते, हे जाणवते.

'स्वास्थ्य-बोध' मासिकातील मजकुराच्या अश्लीलतेसंबंधी डॉ. राव यांनी केलेला युक्तिवाद, त्याची सूक्ष्मता स्पष्ट करताना लेखकाने आपल्या बुद्धिमत्तेचा करून दिलेला प्रत्यय देतो. शिवाय त्याने हा विषय मूळातून कसा समजून घेतला आहे, याचं दर्शन घडवतो. (पृ.८७-८८) यातून दोन्ही पुरुषांच्या पक्क्या वैचारिक भूमिका ठसठशीतपणे अधोरेखित केल्या गेल्या आहेत.

जिथे 'स्वास्थ्य-बोध' नियतकालिक छापले जायचे, त्या छापखान्याचे व्यवस्थापक जयंत काळे, लोकतेज पत्रकार भवनमधील नारायण बेंद्रे यांचं (पृ.२३) favourable appreciaton, सुधारकी विचारांच्या Shikshan Vidhyapeeth's boardroom - principal Gupte यांचं निवेदन (पृ.२७) या व्यक्ती कर्मेकरला समजून घेणाऱ्या. उलट पंडित दामोदर जोशी (पृ.२१), महादेवराव जोशी (पृ.२५) (मेमोरियल रीडिंगरूममध्ये प्रा. कर्मेकरने दिलेल्या व्याख्यानावरील) प्राध्यापकांच्या प्रतिकूल प्रतिक्रिया, शेट गोविंदराव देशमुख, मेहता यांचे विचार ही सनातनी प्रवृती म्हणायला हवी. शिवाय कर्मेकर यांचं कर्तृत्व ठसठशीतपणे व्यक्त व्हावे म्हणून सनातनी आणि सुधारक संघटनांनी कोर्टाच्या आवारात केलेली निदर्शनं आणि दोन्ही गटांच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या वृत्तपत्रांच्या भूमिकांचा पार्श्वभूमीसारखा केलेला वापर लक्षणीय म्हणता येईल. तिथं विरोधक पत्रकारांना verture गिधाडं म्हणू वापरलेली प्रतिमा लक्षणीय.

समाज या घटकाचा लेखकाने अत्यंत कल्पकतेनं वापर केला आहे. प्रत्येक

ठिकाणी मुख्य पात्रांच्या मानसिक प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात आला आहे. उदाहरणार्थ स्त्रियांसंबंधी कर्मेकार यांची प्रचलित समाजातील व्यक्तींपेक्षा वेगळी मानसिकता आणि विचारदृष्टी तयार व्हायला प्रेरक ठरलेल्या (१) देवळासभोवती केर काढणारी मुलगी, (२) एक मुलगी सॅनिटरी नॅपकिन लपवत जाते ते दृश्यं, (३) वृद्धांच्या हातांतील वृत्तपत्रात बातमी : 'शालेय मुलींमधील वाढता नैतिक ऱ्हास : यासाठी पालक जबाबदार आहेत का?' (पृ.८),

(१) प्रो. कर्मेकर यांची आठवण एकदा एका दिवाणखान्यात प्राध्यापकांसमोर 'मासिक पाळी' विषयावर केलेलं भाषण आणि त्याला मिळालेला शून्य प्रतिसाद (पृ.१०-११).

(२) 'स्वास्थ्य-बोध'ला परांजपेंच्या दुकानात गिऱ्हाइकांच्या प्रतिक्रिया आजमवण्याचा प्रयत्न (पृ.१५)

(२) हा खटला ज्यांच्यासमोर चालला त्या न्यायमूर्ती चित्रे यांची मानसिकता चित्रित करताना 'ब्रिटिश समाजसुधारक श्री. अलिस्टर मॉर्गन यांचं त्यांना स्मरण होतं (पृ.७३-७५) आणि या महत्त्वपूर्ण खटल्याचा निर्णय देण्यापूर्वी त्यांचा मॉर्गन यांच्याशी संवाद होतो असे कल्पनेनं चित्र रंगवताना, न्यायमूर्ती चित्रे यांच्या व्यक्तित्वाला गोलाई दिली आहे.

**कोर्टाच्या परिसरातील नागरिकांच्या प्रतिक्रिया...**

संध्याकाळ झाली तसे रस्त्यावरील दिवे लुकलुकू लागले आणि भिंतींवर घोषणा लिहिल्या गेल्या - काही रंगवलेल्या, तर काही घाईघाईने खरवडलेल्या.

प्रत्येक वृत्तपत्र स्टँड रणांगण बनले होते. मुखपृष्ठांवर गदारोळ माजला होता, संपादकीयांमध्ये वादविवाद सुरू होते. आणि संपादकांना लिहिलेल्या पत्रांचा पूर आला होता, काही जण 'स्वास्थ्य-बोध'ला 'नैतिक अधःपतन' म्हणून धिक्कारत होते, तर काही जण 'दीर्घकाळापासून दाबलेला आवाज' म्हणून त्याचा बचाव करत होते.

लेखकाची पतिपत्नीदरम्यानची तपशील जिवंत करण्याची शैली लाजबाब म्हटली पाहिजे. प्रा. आर. कर्मेकर लहानशा जेवणाच्या टेबलापाशी बसून, 'ला वी सेक्सुएल' नावाच्या फ्रेंच पाठ्यपुस्तकाच्या कडेवर काहीतरी लिहीत होते. ते पुस्तक उसने घेतलेले होते, पेन्सिलच्या रेषांनी खराब झालेले होते आणि त्यातून लवंग तेल व धुळीचा मंद वास येत होता. त्याच्या शेजारी एक अर्धवट खाल्लेले केळे पडले होते. विसरलेले. (पृ.७८) हीच गोष्ट डॉ. राव यांच्या घरातील दृश्यांच्या बाबत म्हणता येते. न्यायमूर्ती चित्रे यांचेही ठसठशीत चित्र काढण्यात आले आहे.

हे कायद्याचे सामान्य न्यायाधीश नव्हते. इंग्रजी सामान्य कायद्याचे शिक्षण घेतलेले आणि शाही न्यायपीठांच्या हाताखाली प्रशिक्षित झालेले असल्यामुळे त्यांच्या निकालांच्या तळटीपांमध्ये अनेकदा 'ब्लॅकस्टोन'चा संदर्भ असे, पण त्यांची नैतिक दिशा मात्र भारतीय परंपरावादात खोलवर रुजलेली होती आणि त्यांनी कर्मेकर यांच्या भूमिकेला अंशतः न्याय देत ठोठावलेला दंड. डॉ. राव यांच्या पूर्वेतिहासासंबंधी विविध पद्धतीने लेखन आढळते. स्वतः निवेदक राव यांनी न्यायालयात गिरणी कामगारांचा बचाव करण्यासाठी लढलेले पूर्वीचे खटले, दलितांच्या जमिनीच्या हक्कांसाठीचे खटले, आणि एकदा अन्यायकारक कायद्यांना विरोध केल्याबद्दल ब्रिटिशांनी दिलेले मानद पद नाकारल्याच्या घटनांचा हा एक संच आहे. अनेक वर्षांपासून त्यांच्या मनात धगधगत असलेली आग आता या खटल्यात एकवटली आहे.

चहाच्या टपरीवरील नागरिकांच्या तोंडून आलेले राव यांच्यासंबंधीचे उद्गार : १. 'राव? तोच माणूस ज्याने गेल्या वर्षी शिक्षण परिषदेवर टीका केली होती?' एक जण आपला पातळ झालेला चहा ढवळत उपहासाने म्हणाला.

'हो.' दुसरा म्हणाला. 'तोच राव, ज्याने त्या कापड कामगार संघटनेच्या नेत्याचा मोफत बचाव केला होता. कोर्टात अक्षरशः धुमाकूळ घातला होता.' (पृ.४४)

२. पुन्हा निवेदक कथन करतो : 'राव यांनी न्यायालयात गिरणी कामगारांचा बचाव करण्यासाठी लढलेले पूर्वीचे खटले, दलितांच्या जमिनीच्या हक्कांसाठीचे खटले, आणि एकदा अन्यायकारक कायद्यांना विरोध केल्याबद्दल ब्रिटिशांनी दिलेले मानद पद नाकारल्याच्या घटनांचा हा एक संच आहे.' अनेक वर्षांपासून त्यांच्या मनात धगधगत असलेली आग आता या खटल्यात एकवटली आहे. (पृ.४७)

३. नारायण बेंद्रे यांच्या लेखाने त्याचे समर्थनही केले नाही किंवा त्याला दोषीही ठरवले नाही. त्यात त्याला अशा एका माणसाच्या रूपात सादर केले होते, ज्याने पश्चिमेकडील सर्वोत्तम बुद्धिमत्ता असलेल्या लोकांकडून शिक्षण घेतले होते, जो केवळ स्वतःच्या नसलेल्या लढाया लढण्यासाठी मायदेशी परतला होता, आणि ज्याने आता असे प्रकरण निवडले होते, ज्यापासून बहुतेक लोक पळून गेले असते.' (असे वर्णन.) (पृ.४५)

४. बडील सावकाश पान खात म्हणाले, 'जो राजासारखं जगू शकला असता... पण त्याने बंडखोरासारखं जगायचं निवडलं.' (पृ.४५) हे एका सामान्य खेडुताचं निरीक्षण.

**कोर्टात होणारी प्रॉसिक्यूटरची मांडणी**

सरकारी वकील नाईक

माननीय न्यायाधीश महोदय, हे केवळ शाई आणि कागदाचे प्रकरण नाही. हे प्रकरण हेतूविषयी, शिक्षणाच्या नावाखाली लपलेल्या धोक्याविषयी आहे. 'आरोग्य' म्हणून जे मिरवले गेले, तो खरंतर सभ्यतेवरील हल्ला आहे. 'स्वास्थ्य-बोध' हे सदर मासिक एक नियतकालिक नसून, ते नैतिक अराजकतेचा एक छुपा जाहीरनामा आहे. हे प्रकाशन सार्वजनिक वितरणासाठी अयोग्य असलेल्या सामग्रीला प्रोत्साहन देते; विशेषतः अशा समाजात, जिथे कोमल मने आणि पारंपरिक मूल्ये अजूनही नागरी सुव्यवस्थेचा कणा आहेत. हे प्रकाशन लैंगिकता, गर्भनिरोधक आणि जिव्हाळ्याच्या संबंधांबद्दल इतक्या उघडपणे बोलण्याचे धाडस करते, ज्याला केवळ अश्लीलच म्हणता येईल. हे सावधगिरी बाळगत नाही; ते मोह निर्माण करते. हे शिक्षण देत नाही. ते भ्रष्ट करते.

'मी केवळ आरोपीला भारतीय दंडसंहितेच्या अश्लीलता आणि सार्वजनिक नैतिकता यांवरील कलमांखाली दोषी ठरवण्याचीच नव्हे तर त्या मासिकाच्या प्रकाशन, वितरण आणि संग्रहावर आयुष्यभरासाठी कायमस्वरूपी बंदी घालण्याचीही विनंती करतो.' (पृ.८६)

आणि डॉ. राव यांचे आश्चर्यकारक आणि अभ्यस्तपूर्ण युक्तिवाद आणि आपली प्रतिपक्षाला निरुत्तर करणारी वैचारिक भूमिका :

डॉ. राव यांचा युक्तिवाद :

'''डॉक्टरांना मारून रोग संपवता येत नाही,''

'''स्वास्थ्य-बोध' हे प्रकाशन स्वैराचाराचे पत्रक नाही, हे स्पष्टतेचे पत्रक आहे. शहाणपणाचे आवाहन आहे. समजुतीसाठी एक आर्त विनवणी आहे.'' ''हे एक शिक्षण आहे - जागृतीचे साधन, शोषणाचे नाही. तुम्हाला अश्लीलता दिसते, पण मला अज्ञानावरचा उपाय दिसतो.''

''आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की : हे मासिक स्वैराचाराचे उदात्तीकरण करत नाही. ते वासना भडकवत नाही. मानवी स्वभावाबद्दलचे साधे, निर्विवाद सत्य. आणि ते सत्य पवित्र ग्रंथांमध्ये आणि विज्ञानात, वैद्यकशास्त्रात आणि नीतिमत्तेत नेहमीच अस्तित्वात होते.''

''जगाने शरीर आणि मन यांच्यातील संबंध फार पूर्वीपासून चुकीच्या पद्धतीने समजून घेतला आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राने व्यक्तींच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी लैंगिक आरोग्याचे महत्त्व फार पूर्वीच ओळखले आहे. पण तुम्ही आम्हाला आमच्या नैतिक निर्णयांच्या अंधारात, अश्मयुगात परत ढकलू इच्छिता

आणि फायद्यांकडे दुर्लक्ष करायला लावू इच्छिता. शतकानुशतके चाललेले सर्वोत्तम वादविवाद हे सोयीसाठी लिहिले गेले नव्हते. ते आव्हान देण्यासाठी लिहिले गेले होते. आणि जर आपल्याला एक राष्ट्र म्हणून, एक समाज म्हणून प्रगती करायची असेल, तर आपण कठोर सत्यांपासून दूर पळता कामा नये. माननीय न्यायाधीश, हा विषय अश्लीलतेबद्दल नाही. हा विषय शिक्षणाबद्दल आहे. हा विषय जीव वाचवण्याबद्दल आहे. हा विषय या राष्ट्रातील लोकांना यापुढे अज्ञानाच्या खाईत लोटले जाणार नाही, हे सुनिश्चित करण्याबद्दल आहे.''

**न्यायमूर्ती चित्रे यांचे जजमेंट**

'अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे उदात्त आणि घटनात्मक संरक्षण करताना, या न्यायालयाने अशा स्वातंत्र्यांचा भारतीय दंड संहितेच्या कलम २९२ अंतर्गत परिभाषित केलेल्या सामूहिक नैतिकता आणि कायदेशीर पूर्वदृष्टांताशी असलेला संबंध विचारात घेतला पाहिजे.

हे मासिक संपूर्णपणे अश्लील नसले तरी, त्यात अशी भाषा आणि प्रतिमा होत्या, ज्या सध्याच्या कायदेशीर व्याख्येनुसार सार्वजनिक संवादात अपेक्षित असलेल्या सभ्यतेच्या मर्यादा ओलांडतात. न्यायालयाला यामागे कोणताही द्वेषपूर्ण किंवा नफ्यासाठी प्रेरित हेतू आढळला नाही, तरीही माध्यम आणि सादरीकरण सदोष होते.

समाजाला ज्याची भीती वाटते, ते बोलण्याचे तुमचे धैर्य, निषिद्ध मानल्या जाणाऱ्या विषयांना सामोरे जाण्याचा तुमचा दृढनिश्चय. पण कायदा सदोष असला तरी, तोच एक अशी चौकट राहिला पाहिजे, ज्याच्या चौकटीत राहून सुधारणांनी प्रयत्न केले पाहिजेत.'

म्हणून, प्रचलित कायद्यानुसार, तुम्हाला कलम २९२ अन्वये दोषी ठरवण्यात आले आहे. तथापि, तुमचा हेतू आणि त्यात कोणताही वैयक्तिक फायदा नसल्याचे लक्षात घेता, न्यायालय तुरुंगवासाची शिक्षा देत नाही. प्रत्येकी २०००चा आर्थिक दंड आकारण्यात येत आहे.'

असा न्यायमूर्तींनी विरोधात दिलेला निकाल मनाला स्पर्शून जातो. खरंतर कोर्टातील युक्तिवादाचा हा भाग कादंबरीकारानं इतका तपशिलानं, प्रवाही भाषेत, नेमकी नाट्यपूर्णता टिपत वर्णिलेला आहे.

डॉ. भोयर यांची चित्रमय आणि नेमका आशय टिपणारी शैली आपल्याला खिळवून ठेवले.

कादंबरीच्या रचनेच्या दृष्टीनं शेवटी जोडण्यात आलेला छोटासा विष्कंभक : एका विस्मृतीत गेलेल्या ट्रायलचा विजयनं घेतलेला शोध–

एक कोणीतरी विजय (आणि त्याची पत्नी रेश्मा) आहे. तो 'ॲड. जीवन के.' यांच्याकडे काम करतो. एकदा त्याला त्याच्या सरांचा खाजगी संग्रह पाहावासा वाटतो. 'आता इथे कोणी येत नसे. ती एक अशी खोली होती, जिला वर्तमानाने विसरले होते, पण भूतकाळाने जपले होते.

त्याला फौजदारी न्यायशास्त्रावरील दोन मोठ्या ग्रंथांच्या मध्ये अडकलेला एक सैल गठ्ठा सापडला. त्यावर अस्पष्टपणे लिहिले होते : राव विरुद्ध राज्य – अश्लीलता खटला. एकामागून एक पाने उलगडत गेली : एका वादग्रस्त पत्रिकेबद्दल, लैंगिक शिक्षणावरील चर्चा, ब्रिटिशकालीन अश्लीलतेचे कायदे, आणि विनोद, नैतिकता व आवेशाने भरलेल्या न्यायालयातील वादविवादांविषयी. पानांच्या कडेला काहीतरी खरडलेल्या नोंदी होत्या–

कदाचित जीवनसरांच्या हस्ताक्षरात. त्यांपैकी एकात लिहिले होते: 'राव हरले, पण सत्य जिवंत बाहेर पडले.' सारांश, डॉ. भावेश भोयर यांनी लिहिलेली 'द मॅन हू मर्डर्ड मॉरॅलिटी' ही चरित्रात्मक कादंबरी विचक्षण वाचकांना उच्च दर्जाचा बौद्धिक आनंद देणारी आहे, असे निःसंशय म्हणता येते.

– **अनंत देशमुख**

भ्रमणध्वनी : ८६८९९७८७४४

## 'साहित्य' त्रैमासिकासाठी साहित्य पाठवण्याबाबत सूचना

- 'साहित्य'करिता लेखन पाठवताना, टंकलिखित अथवा संगणका–द्वारे मुद्रित केलेले असावे. लिखित स्वरूपात असल्यास, सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले असावे.
- लेखन sahityasangha@gmail.com किंवा संपादकीय पत्त्यावर पाठवावे.
- सृजनात्मक, संशोधनात्मक लेखनाचे, तसेच दर्जेदार, वैचारिक, ललित लेखनाचे स्वागत आहे.

# स्त्रीजीवनाची कालानुरूप काही मन्वंतरे!

## भास्कर कदम

मानवी जीवनाचा प्रवास माकडाकडून माणसाकडे झाला आहे. नर आणि मादी अशाप्रकारची त्याची जडणघडण आहे. अंडे आधी की कोंबडी, याप्रमाणे नर आधी की मादी? असा प्रश्न आहे. समागमाशिवाय उत्पत्ती नाही; समागमासाठी भिन्नलिंगी असणे गरजेचे असते, हेही विज्ञानात खरे मानले गेले आहे. स्त्री आणि पुरुष मिळून मानवी समूह तयार झाला आहे. मातृसत्ताक आणि पितृसत्ताक पद्धतीची कालानुरूप काही मन्वंतरे झाल्याचे दिसून येते.

स्त्री आधी की पुरुष निर्माण झाला, याचे उत्तर विज्ञान आणि पुराणकथा, धर्मग्रंथ या दोन अंगांनी वेगवेगळे आहे. उत्क्रांती शास्त्रानुसार मानवाच्या उत्पत्तीवेळी स्त्री-पुरुष एकत्रच निर्माण झाले, वेगळ्या वेळी नाही. मात्र, जैवशास्त्रानुसार मानवाच्या गुणसूत्रांवर लिंग ठरते. स्त्रीकडे XX, पुरुषाकडे XY असतात. वैज्ञानिकांचे मते X हे गुणसूत्र मूलतः प्राचीन आहे, आणि Y गुणसूत्र नंतर X मधून उत्क्रांत झाले. त्यामुळे स्त्रीलिंगी गुणसूत्र आधी अस्तित्वात आले, असे मानण्यात येते.

पुराण व धार्मिक दृष्टिकोन लक्षात घेता हिंदू धर्मशास्त्रानुसार सृष्टीची उत्पत्ती आदिशक्ती(प्रकृती)पासून झाली असे मानले जाते. म्हणजेच स्त्री-शक्ती ही मूळ. याचबरोबर शिव-पार्वती यांचे अर्धनारीश्वर रूप म्हणजे स्त्री-पुरुष एकत्रच, अशीही एक मान्यता आहे. मात्र मनुस्मृतीत मनु व शतरूपा या जोडीपासून मानवजातीची उत्पत्ती मानली गेली आहे. याचबरोबर इस्लाम व ख्रिश्चन धर्मानुसार प्रथम आदम (पुरुष) निर्माण झाला. त्यानंतर स्त्री. तसेच ग्रीक तत्त्वज्ञानानुसार 'पँडोरा' ही पहिली स्त्री देवांनी मानवजातीसाठी निर्माण केली, असे म्हटले आहे. विज्ञानानुसार मात्र पुरुष व स्त्री एकाच काळी उत्क्रांत झाले; पण आनुवंशिक पुराव्यानुसार स्त्रीलिंगी X गुणसूत्र आधीचे आहे.

भारतीय परंपरेत स्त्रीची प्रतिमा शक्ती व गृहलक्ष्मी अशी होती, पण काळानुसार तिला अनेक बंधनांत अडकवले गेले असल्याचे आढळून येते. पाश्चात्त्य समाजात

स्त्रिया प्राचीनकाळी दुय्यम मानल्या गेल्या, पण हक्कांच्या चळवळींमुळे त्यांनी सामाजिक-राजकीय समानता मिळवली. आज दोन्ही परंपरांत स्त्रिया समाजनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत; तरीही दोन्ही ठिकाणी पूर्ण समानतेकडे जाण्याचा प्रवास अजून सुरू आहे. वेदकालीन स्त्री, मनुस्मृतीतील स्त्रीचे स्थान आणि आधुनिक काळातील स्त्री यात जमीन-अस्मानाचा फरक झाला आहे.

ऋग्वेदीय काळात गार्गी ही प्रसिद्ध स्त्री-ऋषी होती. गार्गी या स्त्री-तत्त्वज्ञ, विदुषी म्हणून प्रसिद्ध आहेत. बृहदारण्यक उपनिषद या ग्रंथात त्यांचा उल्लेख आहे. याचाच अर्थ वैदिक काळात स्त्रियांनाही वेदाध्ययनाचा आणि तत्त्वज्ञान-चर्चेचा अधिकार होता. गार्गीने भारतीय तत्त्वज्ञानात स्त्रियांचाही मोलाचा वाटा आहे, हे दाखवून दिले.

वैदिक काळात स्त्रीचे स्थान समान व गौरवशाली होते.

मनुस्मृतीकाळात समाज अधिक पितृसत्ताक झाला. मनुस्मृतीच्या प्रभावामुळे स्त्रीजीवन बंधनग्रस्त व कनिष्ठ बनले. मनुस्मृतीत स्त्रीला दुय्यम दर्जा दिला गेला. स्त्रीचे स्थान पुरुषांच्या अधीन झाले. '*पिता रक्षति कौमार्य, भर्ता रक्षति यौवने, पुत्रो रक्षति वार्धक्ये*' मनुस्मृतीतील या वचनानुसार बालपणी वडील, तरुणपणी पती आणि वार्धक्यात मुलगा स्त्रीचे रक्षण करतो; म्हणजेच स्त्रीला स्वातंत्र्य नसून स्त्रीने पुरुषाच्या अधीन राहावे, असाच हा स्पष्ट आदेश देण्यात आल्याने त्या काळात स्त्रीच्या शिक्षणावरही बंधने आली. स्त्रीचा मुख्य धर्म हा पतीची सेवा करणे असून संततीनिर्मितीसाठी विवाह हे स्त्रीचे मुख्य कर्तव्य मानले गेले. स्त्रीला स्वतःचा जोडीदार निवडण्याचा अधिकार नव्हता. सतीप्रथेची बीजे या काळात रुजली. पतिव्रता धर्म सर्वात मोठा मानला गेला. स्त्रीला स्वतंत्र धार्मिक, सामाजिक कार्यात भाग घेण्याची मुभा नव्हती.

आधुनिक काळात स्त्रीजीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. अनेक समाज-सुधारकांनी स्त्रियांचे शिक्षण, विधवा-विवाह, सती-प्रथाबंदी यासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरला. आज शिक्षण, रोजगार, राजकारण, विज्ञान-तंत्रज्ञान, लष्कर या सर्व क्षेत्रात स्त्रिया महत्त्वाच्या, तसेच जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहेत.

अठराव्या शतकापासून स्त्रियांच्या हक्कासाठी स्त्री-मताधिकार चळवळ सुरू झाली. औद्योगिक क्रांतीमुळे स्त्रिया रोजगारात मोठ्याप्रमाणात सहभागी झाल्या. विसाव्या शतकात मतदानाचा अधिकार, शिक्षण, रोजगार, राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढला.

स्त्रीजीवनाच्या इतिहासात शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, निर्णयक्षमता आणि

सामाजिक प्रतिष्ठा याबाबतीत बदल झाला. प्राचीन काळातील पतिव्रता, सती, परावलंबी स्त्रिया आणि आजच्या स्वावलंबी, जागरूक स्त्रिया यात मोठा फरक आहे. तरीही स्त्रीच्या पूर्ण समानतेसाठी समाजाची मानसिकता बदलणे आणि लैंगिक, आर्थिक, मानसिक शोषण दूर करणे आवश्यक आहे. स्त्रीचे लैंगिक, मानसिक व आर्थिक शोषण पूर्वापार चालत आले आहे.

स्त्रीही समाजाचा मूळ आधार असूनही तिच्या हक्कांचे सतत उल्लंघन होत आलेले आहे. प्राचीन काळापासून स्त्रियांना लैंगिक, मानसिक आणि आर्थिक शोषण सहन करावे लागले आहे. समाजाच्या पुरुषप्रधान रचनेमुळे तिच्या स्वातंत्र्यावर आणि निर्णयक्षमतेवर बंधने लादली गेली. या शोषणाचे स्वरूप काळानुसार बदलत आले, तरी मूळ मुद्दा तसाच राहिला आहे.

स्त्रीस्वातंत्र्य आणि शोषण याबाबत विचार करता वैदिक काळात स्त्रियांना काही प्रमाणात शिक्षण आणि निर्णयाचा अधिकार होता, परंतु युद्ध, परावलंबन, आणि विवाहाच्या नियमांमुळे स्त्रियांचे शोषण झाले. स्त्रीशोषणाचा विचार करता महाभारत आणि रामायणातील द्रौपदीचे वस्त्रहरण, सीतेची अग्निपरीक्षा हेसुद्धा लैंगिक व मानसिक शोषण असल्याचेही काही अभ्यासक मानतात. याचाच दुसरा अर्थ असा की, स्त्रीचे लैंगिक, मानसिक आणि आर्थिक शोषण पूर्वापार चालत आलेले आहे, फक्त त्याचे स्वरूप काळानुसार बदलले. प्राचीन काळातील उपपत्नी व दासी, मध्ययुगातील सतीप्रथा, आधुनिक काळातील घरगुती हिंसा व कार्यस्थळी छळ हे सर्व त्याचे उदाहरण आहेत.

राजघराण्यातील स्त्री व दासी यांच्याही जीवनशैलीचा विचार केला तर त्यातही स्वातंत्र्यापेक्षा शोषणच अधिक झाल्याचे आढळून येते. राणी असो की दासी या तशा स्त्रियाच. राजघराण्यातील राण्या, राजकन्या वैभवशाली, शिक्षित असत; परंतु पुरुषप्रधान समाजात त्यांची निर्णयक्षमता मर्यादितच असे. याचबरोबर दासीचे जीवन हे परावलंबी असे. घरगुती काम, नृत्य, संगीत यांत त्यांना राजाच्या लहरीप्रमाणे वागावे लागत असे. सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य नाही. अनेकदा दासी ही उपभोगाची वस्तू असे. केवळ स्त्री म्हणूनच असे जिणे तिच्या वाट्याला आलेले असे.

आधुनिक काळातील स्त्रीजीवनाचा विचार करता शिक्षण, रोजगार, राजकारण, विज्ञान, कला, क्रीडा, लष्कर इत्यादी क्षेत्रांत स्त्रियांचा सहभाग वाढला आहे. कायदेशीर समानता, मतदानाचा अधिकार, मालमत्ता व वारसाचा हक्क याबाबत स्त्रिया जागरूक झाल्या आहेत.

तरीही घरगुती हिंसा, लैंगिक छळ, आर्थिक असमानता, मानसिक दबाव

अजूनही अस्तित्वात आहे. तरीही सर्वसामान्य स्त्रीची मातृत्व, संस्कार, कुटुंबाची जपणूक, समाजातील भूमिका कायम राहिली आहे.

स्त्रीजीवनाच्या इतिहासात शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, निर्णयक्षमता आणि सामाजिक प्रतिष्ठा या बाबतीत बदल दिसतो. प्राचीन काळातील परावलंबी स्त्री आणि आजच्या स्वावलंबी, जागरूक स्त्रिया यात मोठा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिकदृष्ट्या स्पष्टपणे फरक आढळून येतो. तरीही स्त्रीच्या पूर्ण समानतेसाठी समाजाची मानसिकता बदलणे आणि लैंगिक, आर्थिक, मानसिक शोषण दूर करणे आवश्यक आहे. स्त्रीजीवन हे सर्वकालिक संघर्ष, योगदान आणि समाजनिर्मिती यांचे प्रतीक आहे.

आजही बहुतांशी स्त्रियांना आर्थिक स्वायत्तता कमी आहे. संपत्ती व वारसा पुरुषांच्या हातात अधिक आहे. याचबरोबर आर्थिकदृष्ट्या पुरुषांचे नियंत्रण आणि घरगुती अवलंबित्व कायम असल्याने स्त्री सामाजिक निर्णयात सहभाग समप्रमाणात घेऊ शकली नाही.

पुरुषांना जसे समाजात वावरण्याचे, वागण्याचे स्वातंत्र्य होते, तेवढा खुलेपणा महिलामध्ये नव्हता. अलीकडे मात्र बराचसा बदल जाणवू लागला आहे. शारीरिक आणि बौद्धिक क्षमता लक्षात घेता, आता बौद्धिक क्षमतेला अधिकचे प्राधान्य महत्वाचे ठरू लागले आहे. आधुनिकीकरण आणि तंत्रज्ञान यातील नवनवीन संशोधन लक्षात घेता आताच्या काळात शारीरिक श्रमापेक्षा बौद्धिक श्रमाला अधिकचे महत्त्व आले आहे. शारीरिक श्रमाची कामे अवजड मशिनरी करू लागली आहे. रोबटच्या म्हणजेच तंत्रज्ञानाला बौद्धिकक्षमता आवश्यक असून त्यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलाही आघाडीवर आहेत. शैक्षणिक निकालांत मुलापेक्षा मुलींनीच बाजी मारल्याचे चित्र दिसून येत आहे. एक काळ असा होता की, स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण अधिक होते. मुलगाच वंशाचा दिवा मानला जात असे. आजमात्र हे सामाजिक चित्र बदलले आहे. स्त्रीजन्माची पूर्वपीठिका ही कालानुरूप स्थित्यंतराची आहे.

वैदिककाळ, मनुस्मृती, रामायण, महाभारत या कालखंडातील स्त्रीजीवनाकडे पाहिल्यास असे आढळून येते की, वैदिककाळात स्त्रीच्या मताला किंमत होती तर मनुस्मृतीत स्त्रीजीवनाची अवहेलना केली गेली. तिला दुय्यम दर्जा नव्हे, तर हीन दर्जा दिला. याचाच दुसरा अर्थ असा की, ज्या स्त्रीपासून संसाराची उत्पत्ती झाली, तिची अवस्था कालानुरूप बदलत गेली.

रामायणातील सीतेला संशयाच्या सुईने जमिनीत गाडून घ्यावे लागले, तर त्याच कालखंडात श्रीरामाच्या पदस्पर्शाने अहिल्येचा उद्धार झाला.

तसे पाहू जाता सीता काय, अहिल्या काय, स्त्रीशोषणाचा तसाच

अन्यायपीडितेचा एक भाग मानवा लागेल. महाभारत-कालखंडात श्रीकृष्णाने सोळासहस्र नींचा उद्धार केला, याचाच दुसरा अर्थ असाही होतो की, त्या सर्व व्यवस्थेतील पीडित स्त्रियाच होत्या. ऋषींमुनींच्या कालखंडातील स्त्रीचा विचार केला तर अप्सरेमुळे विश्वामित्राचीही तपस्या भंग झाली होती. बुद्धांच्या कालखंडातील आम्रपालीला बुद्धी आणि सौंदर्यामुळे तिला नगरवधू ठरविण्यात येऊन तिच्यावर सर्वांची समान मालकी ठरविण्यात आली. नंतर ती बुद्धांच्या अनुयायींमध्ये प्रसिद्ध भिक्षुणी बनली आणि संयम, करुणा आणि त्यागाचे प्रतीक ठरली. या सर्व घटनांत त्यागापासून भोगापर्यंत स्त्रीपात्र प्रमुख ठरले आहे. बारांगना ते वीरांगना असा खऱ्याअर्थाने स्त्रीजीवनाचा प्रवास आहे.

आधुनिक काळातील स्त्रीजीवनात मोठा बदल झाला आहे. आधुनिक स्त्रिया फक्त घर चालवतात असे नाही, त्या देश पुढे नेत आहेत. त्या शिक्षक, वैज्ञानिक, क्रीडापटू, राजकारणी, कलाकार, सैनिक, अंतराळवीर, उद्योजक अशा सर्व क्षेत्रांत झळकत आहेत.

मर्दानी वीरांगना झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, उत्तम प्रशासक अहिल्यादेवी अशी देदीप्यमान, कर्तृत्ववान स्त्रियांची मोठी नामावली आहे. अलीकडच्या कालखंडातील भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधी असतील, सद्यःस्थितीत बहुचर्चित इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी असेल, या राजकारणी स्त्रियांबरोबरच भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम, डॉ. कल्पना चावला, मिसाइल वुमन डॉ. टेसी थॉमस, गानकोकिळा लता मंगेशकर, भारतात जन्मलेल्या आणि अमेरिकेत कार्यरत असलेल्या एरोस्पेस इंजिनीअर डॉ. स्वाती मोहन, क्रीडा क्षेत्रातील मेरी कोम, पी. व्ही. सिंधू अशी खूप मोठी स्त्रियांची श्रेयनामावली आहे. याचबरोबर सुधा मूर्ती यांनी टाटाच्या टेल्को कंपनीस आपल्या बौद्धिक कौशल्याच्या बळावर महिला इंजिनीयर विषयक धोरण बदलायला भाग पाडले, अशीही उदाहरणे आहेत.

आधुनिक कालखंडात महिलांची वारी आता समतेच्या दिशेने निघाली आहे. स्त्री आणि पुरुष असा भेद आता शासकीय स्थरावरही आता केला जात नाहीय. स्त्री कधीही दुर्बल नव्हती, फक्त संधीचा अभाव आणि स्त्रीदाक्षिण्याचा गैरवापर या काही दोषांमुळे स्त्रीची काही ठिकाणी पीछेहाट झाली आहे, हा अपवाद वगळता स्त्री कायमच पुरुषांच्या बरोबरीने कर्तृत्वान व सक्षम राहिली आहे. समागमापासून स्वावलंबनापर्यंतचा प्रवास अनेक खाचखळग्यांचा, तसाच कर्तृत्वाचा आहे.

– भास्कर कदम

भ्रमणध्वनी : ९४२३१२७८००

# पुष्पोपचार

## सुहासिनी कीर्तिकर

मी पहाटे-पहाटे शेजारच्या जॉगर्स पार्कमध्ये फिरायला जाते. चालायला नव्हे; फिरायला! पार्कमध्ये बहावा छान फुललेला असतो. त्याच्या पिवळ्याशार पाकळ्यांनी आकाशाच्या मांडवाला झुंबर टांगलेले असते. पायतळी सोन्याचा गालिचा अंथरलेला असतो. पिवळाशार फुलता बहावा आणि बसंताचा सांगावा! या बहाव्याच्या शेजारी काही आम्रतरू खेटून कोकिळेची वाट पाहत असतात. झाडांपलीकडे पार्कच्या शेजारी उच्चभ्रूंच्या उंचच उंच इमारती. त्यांच्या मजल्यांवर रात्रीचे दिवे जागल्याचे काम करीत असतात. पार्कच्या हिरवळीवर बसून झाडांकडे पाहिले की चमत्कार घडतो. इमारतींचे दिवे झाडांमधून, फांद्यांतूनच उजळलेले दिसतात. जणू तरुवरांची देखणी दीपमाळच! सतत तेवत राहणारी. शांत, निर्मळ उजेड देणारी.

सध्याचा शहरी ऋतू गर्मीचा. अत्यंत तापदायक उन्हाच्या काहिलीचा. पण बहावा, आंबा, पळस, बड यांसारखे वृक्ष यातूनच तावूनसुलाखून माणसांशी सलोखा करतात. या ऋतूतच सुगंधाचा मनभरा 'कोरस' असतो. त्यात प्रमुख म्हणजे बेडचासारखा फुलणारा मोगरा. इतका *'कळियासी'* येतो की त्यांना वाव देण्यासाठी त्याची पाने खुडून त्याला निष्पर्ण करावे लागते. मग काय? सुगंधाचा 'कोरस' दणाणतोच. त्याचे सुगंधी सहगायकही दमदार!... मदनबाण, फुली फुलून येणारा चाफा, जाई, जुई, सुरंगी, सायली, कुंद, चमेली, आकाशमोगरा, बकुळ... इत्यादी इत्यादी पांढरी, पिवळी, गुलबट रंग ल्यालेली ही फुले सुगंधगानाची लकेर घेत थेट नाक, डोळे, बुद्धी, मन, देह काबीज करतात. तीव्र पंचम गाठतात. प्रेम, भक्ती, भोग, समर्पण यांना *'अवस्था लावोनि'* जाणारी ही सगळी सुगंधी मंडळी. मदनबाण, बकुळ तर दुसऱ्या दिवशीही आपले सुगंधी व्रत सोडत नाही. सुरंगी तर आणखी दोन दिवसही सुगंधाने वृत्ती रोमांचित करीत असते. पिवळी, केशरी सुरंगी; तसे मजकुंदही पिवळे. वामन पंडितांच्या कुंद माकंद सुदार्डिबेमधील माकंद म्हणजे मजकुंद. ही दोन्ही फुले सुगंध टिकवणारी अन् थोडीशी केसरलेली, 'पावडरी'. पिवळ्या रंगावरून आठवण जागी झाली ती शेवंतीची. ही उन्हाळ्याआधी बहरास

येणारी. थंडीला कुरवाळणारी बटण शेवंती, राजवर्खी शेवंती ही घरगुती कुंड्यांमध्येही रुजणारी. पण ती बहार थंडीतली. सहज इथे आठवली इतकेच. मी बोलत होते ते एप्रिल-मे मधल्या सुगंधी फुलांबद्दल. हो नां? कामिनीची पांढरी फुलेही याच ऋतूतली. सुंदर दातांना पांढऱ्या शुभ्र कुंदकळ्या म्हणतात; तो कुंदाचा बेलही उन्हाळ्यातच तलखी शांतवायला फुलणार! दंतकळ्या-कुंदकळ्या ही सुंदरतेची तुलना किती छान! पण बरं का; सुंदर दात पाहताना कविमनाला मोगराही आठवतो. कवी गुलज़ारांची ओळ आठवतेय? ते म्हणतात, *'लब हिले तो मोगरे के फूल खिलतें हैं कहीं!'* ओठ हलले की आत जणू शुभ्र मोगराच फुलतो! तो फुलतो अगदी आत-आत. पाहणाऱ्याच्या मनात. ग्रेसच्या कवितेत हाच मोगरा 'घनवसंत' असतो. सुगंधाने उत्तेजित करणारा, आठवणींनी गारवा देणारा. म्हणजे एकाच वेळी सुगंधाने भगभग वाढविणारा अन् शांतवणाराही. म्हणूनच पिण्याच्या पाण्याच्या माठात शीतळतेसाठी चार-चार मोगऱ्याची फुले टाकतात ना उन्हाळ्यात! कामवासना तृप्त करायला मनगटाला मोगऱ्याचा गजरा गुंडाळतात अन् शीतळतेसाठी हाताला मोगऱ्याचे अत्तरही लावतात! किती परस्परविरुद्ध हा सुगंधधर्म!

उन्हाळ्यात ही प्रेमाची आग वाढतच असावी कदाचित!! म्हणून निसर्गही 'फुली फुलून' येत असतो. मघाशी मजकुंदाचा उल्लेख केला, तशी रस्त्याच्या कडेने मखर तयार करणारे काही आणखीही वृक्ष आहेत. 'लॅबरनम' म्हणजे अर्जुन इत्यादी. या अर्जुनाच्या अंगाखांद्यावर उन्हाळ्यात पांढऱ्या पिवळसर रंगांचे तुरे बहरतात. सूक्ष्म गंध असतो त्यांना. आमच्या ठाण्यात घोडबंदर रोडवर त्यांनी कमान केलीय. दिमाखात धूळीला घालवणारी. रामायणातही या वृक्षाचा उल्लेख आहे म्हणे! गंमत म्हणजे फुले येतात ती पानांची, छत्री, मखरासारखी तशीच ठेवून.

या मोठ्या वृक्षांना साथ देऊन आणखी काही सुगंधी फुले फुलतातच. पाचू, दवणा यांसारखी छोटी रोपे कशी विसरायची? ही रोपे पानांशीच जवळीक साधणारी. खंडोबाच्या प्रिय भंडाऱ्यात खोबऱ्याच्या वाटीत दवणा धुंद भक्तीभावाची हळद उधळतो. *येळकोट येळकोट जय मल्हार* म्हणताना भंडाऱ्याबरोबर या दरवळत राहणाऱ्या दवण्याच्या काड्याही असतात.

काड्यांनी, परागांनी, पाकळ्यांनी, पानांनी... असे सुगंधी साम्राज्यच पसरलेले असते. या साम्राज्यात सुख, शांती, समाधान, आठवणींचा सुगंध अखंड दरवळत असतो. मनाला उत्तेजित करणारा आणि शांतवणाराही.

निसर्गाचा निसर्गदत्त पुष्पोपचारच की हा! हा सर्वांवरच अखंड होत राहणार. होत राहो!!

– सुहासिनी कीर्तिकर

भ्रमणध्वनी : ९८२०२५६९७६

# आठवण : नीता शरद माडगूळकर

१९८७ मध्ये, माझ्या पुस्तकाला 'राज्य पुरस्कार' मिळाला तेव्हा तीन दिवस, पुण्यात शासनातर्फे आयोजिलेल्या सोहळ्याचे मी आणि शरत् कुमार 'खास मेहमान' होतो. या समारंभाकरिता आम्ही खार, मुंबईहून पुण्याला आलो होतो.

राज्यपुरस्कार वितरण समारंभाला, 'आमचे तात्या'ही आवर्जून उपस्थित होते...

तेव्हा कविवर्य वसंत बापट यांनी, तात्यांना कोपरखळी दिली... ''एरवी सरकारदरबारच्या समारंभांना कधीही न येणारे 'तात्या' आज या सोहळ्याला कसे काय आलात बुवा...?''

मग काय, तात्यांनी त्यांचं कुतूहल तत्काळ शमवलं. जवळच उभ्या असलेल्या माझ्याकडे पाहत माझे श्वशुर, व्यंकटेश माडगूळकर उद्‌गारले,

''माझ्या सूनबाईला आज 'राज्य पुरस्कार' मिळालाय, म्हणून मी आलोय वसंता...!''

यावर ते दोघेही दिग्गज खळखळून हसले.

तेव्हा माझे डोळे मात्र पाणावले होते...

एकदा तात्यांच्या 'अक्षर' बंगल्यात कुमारसह मी गेले असतानाची गंमत–

काका–पुतण्यांच्या गप्पा ऐन रंगात आल्या असतानाच तात्या एकदम म्हणाले,

''मी तुमच्याकरिता मटन घेऊन येतो''...

तेव्हा कुमारनं त्यांना सांगितलं,

''तात्या, तुम्ही कशाला त्रास घेता उगीचच... आणि पंचवटीत ताईही (कुमारच्या आई) आमची वाट पाहत असेल...!''

पण तात्यांनी ऐकलं नाही...

''तुला हवं तर मी स्वतः वहिनींना फोन करतो पंचवटीत, मग तर झालं...!!''

तात्या स्वतः मटन घेऊन आले आणि त्यांनी घरात बाबीताईला माझी नणंद, ज्ञानदा नाईक, त्यांच्या कुकरकरवी करवून घ्यायला सांगितलं. तेदेखील खास मऱ्हाठवाडी पद्धतीचं, स्पेशल!!

आमच्या लग्नात कुमारचे पप्पा गदिमा हयात नव्हते. पण तात्यांचा प्रेमळ सहवास मला दीर्घकाळ लाभला.

आपल्या कोवळ्या वयात, 'मैलाचे दगड' रंगवता रंगवता, स्वतःच 'एक माइलस्टोन' झालेले तात्या, 'श्वशुर' म्हणून लाभणं हा माझा भाग्ययोग खराच...!

❐

# ज्यांच्या साहित्यात मानवी जीवनाचे स्पंदनं; तेच खरे साहित्यिक

**प्रशांत गौतम**

अलीकडच्या काळात साहित्यिक आणि साहित्यप्रेमी या संज्ञांभोवती अनेक प्रश्न निर्माण होताना दिसतात. साहित्यिक कोण? पुस्तक प्रकाशित झालं की तो साहित्यिक ठरतो का? पुरस्कार म्हणजे त्याचं प्रमाणपत्र आहे का? साहित्य संस्थांचे सदस्यत्व हाच निकष आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचं- वाचकांना गृहीत धरणं कधी थांबणार?

हे प्रश्न नवे नाहीत. प्रत्येक काळात ते उभे राहिले आणि त्या-त्या काळात समर्थ लेखकांनी आपल्या लेखनातून त्यांची उत्तरं दिली. आजही तेच प्रश्न नव्या रूपात समोर येत आहेत.

आजच्या काळात साधारणपणे साहित्यिकांचे दोन-तीन प्रवाह ठळकपणे दिसतात.

एक - ज्यांच्या लेखनात माणूस, माणुसकी, मानवी भावना आणि वास्तवाचं भान असतं. प्रसिद्धी, मिरवणूक, पुरस्कार यांची त्यांना हाव नसते. ते स्वतःहून पुढे येत नाहीत; पण त्यांच्या लेखनामुळे ते सर्वश्रुत होतात. त्यांची ओळख म्हणजे त्यांची निर्मिती.

दुसरा प्रवाह याच्या उलट. गटबाजी, कुरघोडी, पुरस्कारांची चढाओढ, व्यासपीठावर दिसण्याची धडपड- या सगळ्यात वेळ घालवणारा लेखकराव वर्ग. या प्रवृत्तीवर अनेकांनी वेगवेगळ्या काळात टीका केली आहे; तरीही हे चित्र आजही बदललेलं दिसत नाही.

मराठी साहित्याचा इतिहास पाहिला तर खरे साहित्यिक कोण, हे स्पष्ट दिसते. शिक्षण, पत्रकारिता, राजकारण, विज्ञान, शेती, कामगारजीवन- अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असतानाही अनेकांनी साहित्य समृद्ध केलं. सानेगुरुजी,

आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, विजय तेंडुलकर, शांताबाई शेळके यांसारख्या व्यक्तींनी आपल्या कार्यक्षेत्रासोबत साहित्यालाही मोठं केलं.

नारायण सुर्वे यांसारखा कामगार कवी, नामदेव ढसाळ यांचा विद्रोही स्वर, दया पवार, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड यांनी मांडलेलं उपेक्षित जीवन आपण वाचले असेलच.

एवढेच कशाला, ज्यांना अलीकडेच साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे, त्या आत्मकथनाचे लेखक राजू बाविस्कर यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा' यांचाही या माणूसपणाने ओथंबलेल्या अस्सल साहित्यात समावेश करावा लागेल. लेखक चित्रकार व लेखक अशा दुहेरी भूमिका आत्मकथात दिसतात. निसर्गकवी ना.धो. महानोर यांचा रानकवित्वाचा स्पर्श ही सगळी उदाहरणं सांगतात की साहित्य कोणत्याही एका चौकटीत बंदिस्त नसतं. जयंत नारळीकर यांसारख्या विज्ञान क्षेत्रातील व्यक्तींनीही साहित्याला नवी दिशा दिली.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते– क्षेत्र कोणतंही असो, ज्यांच्या लेखनात जीवनाचा प्रामाणिक अनुभव आणि मानवी स्पंदनं असतात, तेच खरे साहित्यिक. ते स्वतः बोलत नाहीत; त्यांचं लेखन वाचकांशी संवाद साधतं.

तिसरा प्रवाह– याच्या उलट चित्रही तितकंच ठळक आहे. साहित्य संस्था, समित्या, संमेलनं, या सगळ्यांत लेखक आणि कार्यकर्ते ही दोन चाकं असायला हवी होती. पण आज अनेकदा कार्यकर्ता थेट लेखकराव होण्याच्या घाईत दिसतो. स्वतःचं पुस्तक स्वतःच छापणं, ते वाटणं किंवा खपवणं, पुरस्कारांसाठी धडपडणं– या सगळ्यात साहित्याची गुणवत्ता दुय्यम ठरते.

दोन मराठी माणसं एकत्र आली की तीन संस्था तयार होतात, ही म्हण विनोदी असली तरी त्यात वास्तव दडलेलं आहे. संस्था वाढल्या, पण त्या साहित्याची उंची वाढवण्यासाठी किती कार्यरत आहेत, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

आज आणखी एक प्रवृत्ती जाणवते– एका रात्रीत मोठं होण्याची. प्रकाशक, आयोजक आणि लेखक यांची एक साखळी तयार होताना दिसते. मेहनत, अभ्यास, चिंतन यासाठी लागणारा वेळ कमी पडतो; त्याऐवजी प्रसिद्धीच्या शॉर्टकटचा मोह वाढतो. परिणामी, लेखनाची गुणवत्ता घसरते आणि खरे प्रतिभावंत मागे पडतात.

या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानाचाही विचार करावा लागतो. स्मार्टफोन, समाजमाध्यमं आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे लेखनाची साधनं सहज उपलब्ध झाली आहेत. पण साधनं सहज झाली म्हणून साहित्य सहज होत नाही. उलट, स्वतंत्र विचार, अनुभव आणि वाचनाची गरज अधिक वाढते.

जर सर्व काही तयार मिळत असेल, तर लेखकाची भूमिका काय उरते? वाचन कमी, चिंतन कमी आणि झटपट प्रसिद्धीची अपेक्षा- या सगळ्यामुळे साहित्याची पातळी खालावण्याची भीती निर्माण होते. तंत्रज्ञानाचा वापर पूल उभारण्यासाठी व्हायला हवा; भिंती निर्माण करण्यासाठी नव्हे.

म्हणूनच आज गरज आहे ती संतुलनाची. परंपरेचा गाभा आणि आधुनिकतेची साधनं यांचा समन्वय साधणाऱ्या लेखकांची. जे वास्तवाशी जोडलेले आहेत, वाचकांशी प्रामाणिक आहेत आणि साहित्याला साधना मानतात.

शेवटी प्रश्न पुन्हा तोच- खरा साहित्यिक कोण?

जो माणसाला समजून घेतो, माणुसकी जपतो आणि आपल्या लेखनातून वाचकांशी प्रामाणिक संवाद साधतो, असे साधारणतः म्हणता येईल.

**– प्रशांत गौतम**

भ्रमणध्वनी : ९९२३०८१८८१

## वाचकांचा प्रतिसाद

प्रती,

मा. संपादक मंडळ,

'साहित्य' त्रैमासिक, मुंबई

मा. प्रा. प्रतिभा बिस्वासमॅडम,

सस्नेह वंदना, बिनम्र अभिवादन, स.न.वि.वि.

आपला लोकप्रिय व दर्जेदार अंक मिळाला. धन्यवाद! 'साहित्य' हे त्रैमासिक अतिशय दर्जेदार संग्राह्य असून दुर्मिळ साहित्याचा अमुल्य ठेवा आहे. 'साहित्य' या अंकात अनेक प्रतिभासंपन्न साहित्यिकांचे दर्जेदार व दुर्मिळ साहित्य वाचनिय आहे. आपल्या 'साहित्य' या त्रैमासिक अंकाचे बीडच्या असंख्य साहित्यिकांनी स्वागत केले आहे. अंकाची ठेवण, दर्जा, उत्कृष्ट छपाई, मनमोहक मुखपृष्ठ, दर्जेदार व दुर्मिळ साहित्य यांमुळे अंकाचा दर्जा वाढला आहे व अंक दर्जेदार निपजला आहे. त्याबद्दल आपले व सर्व संपादक मंडळाचे हार्दिक अभिनंदन! सकस साहित्याने अंकाची गुणवत्ता वाढली आहे.

आपला विनम्र,

**डॉ. जगन्नाथ एस. कांबळे** (बीड)

# ‘चार नगरांतले माझे विश्व’

## एका शास्त्रज्ञाच्या जडणघडणीतील शैक्षणिक संदर्भ

**किरण डोंगरदिवे**

जयंत विष्णू नारळीकर हे भारतातील एक महत्त्वाचे शास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. असामान्य बुद्धिमत्ता लाभलेल्या शास्त्रज्ञाची आत्मकथा म्हणजे ‘चार नगरांतले माझे विश्व’ हा २०१२ मध्ये प्रकाशित झालेला आणि २०१४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झालेला ग्रंथ होय. प्रेषित, यक्षाची देणगी अशा साहित्यकृतींमुळे नारळीकर शास्त्रज्ञ या जागतिक ओळखीशिवाय साहित्यिक म्हणूनही महाराष्ट्राला परिचित होते. ‘चार नगरांतले माझे विश्व’ या आत्मकथनात बनारस, केंब्रिज, मुंबई आणि पुणे या चार शहरांमध्ये लेखकाने जे अनुभव घेतले, त्या काळात या घटना घडल्या; या सर्वांचा आढावा दिसून येतो. जागतिक कीर्तीच्या शास्त्रज्ञाच्या आत्मकथनामध्ये खरंतर पान आणि पान, शब्द आणि शब्द हा शिक्षणाचे महत्त्व सांगणारा आहे.

जयंत नारळीकर यांचे आजोबा वासुदेवशास्त्री हे संस्कृतचे पंडित आणि प्रवचनकार होते, त्याशिवाय त्यांचे आजोबा शाळेत शिक्षक होते. लेखकाचे वडील वासुदेवशास्त्री यांच्या मृत्यूनंतरही शिकत राहिले, मॅट्रिकच्या परीक्षेत चौथा नंबर मिळवून मुंबईत बी.एस्सी. परीक्षेत प्रथम आले. बनारस हिंदू युनिव्हर्सिटी प्राध्यापक आणि गणित विभागाचे प्रमुख म्हणून ते वयाच्या २४व्या वर्षी झाले. त्यांची निवड करताना ज्येष्ठ समाजसुधारक मदन मोहन मालवीय यांची शिक्षणविषयक आवड, सजग दृष्टिकोन इत्यादींवरसुद्धा लेखकाने प्रकाश टाकला आहे. मात्र त्या काळात संस्थानिक राजे शाळा आणि विद्यापीठांना देणगी देताना डीलिटसारख्या पदव्या स्वतःच्या नावापुढे मिळवून घ्यायचे. जयंत नारळीकर यांची आईसुद्धा शिक्षित घराण्यातून आलेली होती, त्यांचे सर्वच मामा स्कॉलर म्हणून ओळखले जात. त्यातही त्यांचा वसंतामामा युनिव्हर्सिटी गोल्ड मेडल मिळवणारा होता हे विशेष.

१९४२ मध्ये डॉक्टर राधाकृष्णन यांनी कुलगुरू या नात्याने विद्यापीठाच्या आवारात पोलिसांनी पाऊल ठेवू नये अशी भूमिका घेतली होती, हे सांगत असताना परीक्षेच्या वेळी हॉलमध्ये विद्यार्थी काही गडबड करतील म्हणून त्यांच्या बंदोबस्तासाठी पोलिसांची मागणी करणारे, शिवाय दीक्षांत समारंभासाठीसुद्धा पोलिसांची मदत घ्यावी लागते असे काही प्रसंग सांगून वर्तमान पिढीतील शिक्षण आणि पूर्वीचे शिक्षण यात किती तफावत निर्माण झाली आहे, ते नारळीकरांनी सांगितले आहे.




आजच्या काळात शाळेतल्या प्रत्येक सीटसाठी प्रचंड संख्येने विद्यार्थी आणि पालक लाइन लावून असतात, तसे दिवस लेखकाच्या पहिल्या वर्गाच्या प्रवेशाच्या वेळेस नक्कीच नव्हते. स्वातंत्र्यपूर्व काळात मदन मोहन मालवीय राजेरजवाडे, धनिकाकडून पैसा मागून विद्यापीठ चालवत ही जाणीव असल्यामुळे त्या काळातील शिक्षक अतिशय मर्यादित पगारावर संपूर्ण निष्ठेने काम करत असत. स्वातंत्र्य आल्यावर मात्र आपल्याला कशीही वागायची मोकळीक मिळाली या भावनेपोटी गुणवत्ता असो-नसो, स्थानिक व्यक्तींचा भरणा केला पाहिजे या वृत्तीतून गुरुजनांना आदर्श वाटणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी होत गेली आणि विद्यार्थ्यांमध्येही अभ्यासू मनोवृत्ती कमी होऊ लागली. सर्व विद्याकी राजधानी अशा प्रेरक ओळी असलेल्या विद्यापीठात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाले, काही प्राध्यापकांना विद्यापीठ सोडावे लागले. हे सांगत असताना आपली शिक्षणव्यवस्था किती भ्रष्ट झाली आहे, हे जयंत नारळीकर यांनी दाखवून दिले आहे.

१९४३ मध्ये शाळेत प्रवेश घेतल्यावर शाळेतील आंबट-गोड आठवणी लेखकाने आपल्या आत्मकथनात लिहिल्या आहेत. त्या काळातही जलपान ह्या नावाखाली शाळेतून खायला दिले जाई, आज तर महाराष्ट्रातील सरकारी व्यवस्थापनाच्या सर्व शाळा खिचडी शाळा होऊन बसल्या आहेत. त्या काळातही शिकवणी घेणारे शिक्षक होते. पहिला नंबर, दुसरा नंबर यासंदर्भात स्कॉलर तर

पुस्तकी किडा अशी विशेषण वापरण्याचा तो काळ होता. शाळेत वर्गावर्गात अंताक्षरी प्रतियोगिता होत. वेगवेगळे खेळ घेतले जातात. आठवीत असताना खेड्यातून आलेल्या शिक्षकाची टिंगल करावी असा विचार त्या काळातही विद्यार्थी करत होते म्हणजे आज एका लक्षणीय काळानंतरसुद्धा आपल्या देशातील शिक्षण–व्यवस्था जैसे थे या अवस्थेत आहे की काय, असे वाटायला लागते. इयत्ता दहावीत असताना लेखकाने पायथागोरसचे प्रमेय वेगवेगळ्या पद्धतीने सोडवून दाखवले तर त्याला शिक्षकांनी शाबासकी दिली; मात्र परीक्षेत पाठ्यपुस्तकात दिलेल्या सिद्धता लिहाव्या असे आवर्जून सांगितले. त्या तुलनेत त्यांच्या मुलींना अमेरिकेत युक्लिडचा सिद्धांत वेगवेगळ्या पद्धतीने प्रत्यक्ष अनुभूतीतून शिकवणाऱ्या शिक्षिकाबद्दल लेखक अतिशय सकारात्मक बोलतात.

आपल्या परीक्षा पद्धतीवर त्या काळापासूनही जे प्रश्नचिन्ह होते, ते आजही तसेच आहे. आज शहरातील मध्यमवर्गाला इंग्रजी शिक्षणाची भुरळ घातली जात आहे. इंग्रजी विषयामुळे पुढील करिअर करताना चांगली संधी मिळते असे त्याचे समर्थन केले जाते. मात्र ते योग्य वाटत नाही असे येणार जयंत नारळीकर आवर्जून सांगतात. केमिस्ट्री प्रॅक्टिकलमध्ये २५पैकी आठ गुण देऊन लेखकाला पहिला येऊ नये म्हणून त्यांचे हितशत्रू म्हणजे त्यांचे काही शिक्षकच प्रयत्न करत होते असा उल्लेख आहे. नारळीकरांनी अगदी स्पष्टपणे शाळेतील अनागोंदी दाखवली आहे. लेखकाची आई सौ. सुमती या संस्कृतमध्ये एम.ए. करून कोल्हापुरातील एका शाळेत शिक्षिका होत्या. लेखकाच्या वडिलांनी त्यांना गणित विषयात उत्तेजन दिले तर आईने संस्कृतची आवड जोपासायला सांगितले. आपल्या मुलांनी उन्हाळ्यात सुद्धा काही शिकावे असा त्यांचा हेतू असे. त्यात एका सुट्टीत त्यांना टायपिंग करायला शिकवण्यात आले आणि १९६२ मध्ये केंब्रिज विद्यापीठात प्रबंध टाइप करताना त्यांना टायपिंगचे शिक्षण कामी आले.

विद्यापीठाच्या नियमानुसार त्यावेळी धर्म हा विषय सर्वांना कंपल्सरी शिकवला जायचा. हा विषय शिकवणारे प्राध्यापक धर्माच्या विचारधारांची माहिती देण्याऐवजी कर्मकांडाबद्दल बोलत असत. लेखकाच्या मते, शालेय अभ्यासक्रम निदान प्राथमिक शाळेत तरी विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतून शिकायला मिळायला हवा. विद्यापीठात वेगवेगळ्या वयोगटासाठी भगवद्‌गीतेवर परीक्षा घेतल्या जात. नारळीकरांना दोन वेळा गीता पुरस्कार मिळाला. त्या काळात गणितासारखे विषय इंग्रजी व हिंदी दोन्ही माध्यमांतून बनारसमध्ये शिकवले जात. बनारस मधील आपल्या वास्तव्यात लेखकाने जे अनुभव लिहिले आहेत, त्यात त्यांचे शैक्षणिक कार्य मोठ्या प्रमाणात दिसून येते.

केंब्रिज शहरामध्ये शिक्षणासाठी गेल्यावर तेथील शैक्षणिक संदर्भ लेखकाने मोठ्या प्रमाणात आपल्या आत्मकथनात लिहिले आहेत. त्या काळात नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्या सेन संपर्कात आले. अर्थातच त्यावेळी ते विद्यार्थिदशेत होते. जयंत नारळीकर पी.एचडी. करत असताना पहिल्या वर्षासाठी पैशाची तरतूद कशी करावी याचा विचार करत. १९३० मध्ये लेखकाच्या वडिलांना मिळालेले 'टायसन' हे मेडल त्यांच्या वडिलांनंतर कोणाही भारतीयाला मिळाले नव्हते. त्यांच्यानंतर हे मेडल जयंत नारळीकर यांनाच मिळाले. विक्रम साराभाई यांचे शिक्षण केंब्रिज मध्ये झाले होते. जयंत नारळीकरांच्या वडिलांना मिळालेली न्यूटन शिष्यवृत्ती मिळण्यासाठी सुद्धा त्यांनी प्रयत्न केले. मात्र काही चुकीचे पायंडे पडू नये म्हणून त्यांनी तो अर्ज मागे घेतला. 'रॉयल ग्रीनीच ऑब्झर्वेटरी' या वेधशाळेत प्रत्येक विद्यार्थ्याला एक मार्गदर्शक खगोलशास्त्रज्ञ असे; असे जेव्हा लेखक सांगतात, तेव्हा पाश्चात्त्य शिक्षणप्रणाली आपल्यापेक्षा किती पुढे आहे, ते लक्षात येते. मात्र ब्लार्नी या किल्ल्यात असलेल्या दगडाचे चुंबन घेतले की वक्तृत्वशक्ती वाढते अशी आख्यायिका आपल्याला 'जगाच्या पाठीवर प्रत्येक कोपऱ्यात अंधश्रद्धा नांदते' असे म्हणण्यास बाध्य ठरते. जयंत नारळीकर यांनी आपल्या संशोधनाला वेळ देता यावा म्हणून काही अटी-शर्तींसह मिळणारी रक्कम सुद्धा टाळली असे उल्लेख या आत्मचरित्रात आलेले आहेत. यावरून विशिष्ट ध्येयाने झपाटल्यावर लहान थांब्यावर थांबायचे नसते अशी विचारसरणी लेखकाची होती असे दिसून येते.

भारतात अजमेर येथे गव्हर्नमेंट कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर नारळीकरांनी दिलेले भाषण, शिक्षणमंत्री छागला यांच्यासोबत त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध, लालबहादूर शास्त्री यांच्यासोबतची भेट, नोबेल विजेते सी.व्ही. रामन यांच्यासोबत भेट, अशा प्रसंगांबाबत लिहिताना त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाबाबतही त्यांनी भाष्य केलेले दिसून येते. मात्र गणित विभागातल्या जुन्या शिक्षकांना भेटल्यावर आपण स्वगृही आल्याची भावना झाल्याचे ते म्हणतात. यावरून आई-वडिलांप्रमाणेच माणसाच्या जीवनात शिक्षकाचे अनन्यसाधारण महत्त्व असते, असे ते सुचवताना दिसतात.

'दोनाचे चार हात' या भागात लेखकाचे लग्न, सौ. मंगला नारळीकर यांच्यासोबत होणे आणि त्यांच्या शिक्षणविषयक बाजूच्या संदर्भात बोलताना, मंगला नारळीकर मुंबई विद्यापीठाच्या मास्टरच्या परीक्षेत गणित विषयातून सुवर्णपदक प्राप्त होत्या असे सांगितले आहे. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग आणि जयंत नारळीकर यांना 'डम्स प्राइस'चा पुरस्कार सोबतच जाहीर झाला होता. आपल्याला मुले झाल्यावर त्या मुलांवर भारतीय संस्कार व्हावे हा विचार नारळीकर करताना

दिसतात. यावरून भारतीय संस्कृतीला आणि संस्काराला किती महत्त्व आहे, हे आपल्या लक्षात येते.

मुंबई येथे वास्तव्याला असलेल्या नारळीकरांनी मुंबईतील आपले अनुभव 'मुंबई' या भागात व्यक्त केले आहेत. केंब्रिजमध्ये असताना त्यांची मुलगी गीता इंग्रजी बोले, त्यामुळे मुंबईत आल्यावर तिला बऱ्यापैकी अडचण येऊ लागली. मात्र आपल्या मुलीने इंग्रजीप्रमाणे मराठी पण बोलावे हा नारळीकरांचा विचार ज्ञानभाषा म्हणून इंग्रजी आणि अनुभवासाठी म्हणून मातृभाषा हा विचार सांगणारा आहे. गीता आणि गिरिजा या दोन्ही मुलांना शाळेत प्रवेश घेताना नारळीकरांना बऱ्याच अडचणी आल्या.

शाळा-कॉलेज मध्ये व्याख्यानासाठी गेल्यावर जयंत नारळीकरांच्या मागे स्वाक्षरी घेणाऱ्यांची गर्दी असे. त्यावेळी, 'इथे स्वाक्षरी मिळणार नाही, एखादा प्रश्न तुम्हाला भेडसावत असेल तर तो लिहून मला पत्र पाठवा. मी त्याचे उत्तर देईन आणि त्यावर स्वाक्षरी सुद्धा असेल.' असा एक सुंदर विचार जयंत नारळीकरांनी विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना देण्यासाठी त्या काळात वापरला. वैज्ञानिक दृष्टिकोनाचे सार भगवद्गीतेत सापडते. त्यामुळे विज्ञान आणि अध्यात्म यांचा परस्पर संबंध असल्याचे चिंतनही लेखक करताना दिसतात.

मुंबईमध्ये प्रायमरी शाळेत प्रवेश घेताना नारळीकरांना आलेल्या अडचणी आणि त्या तुलनेत अमेरिकेमध्ये प्रायमरी शाळेत प्रवेशाचा काहीही प्रॉब्लेम नसतो. उलट शाळेचे मुख्याध्यापक आसपासच्या सर्व घरांत 'तुमच्या घरी पाच ते दहा वर्षे वयोगटातील मुले असतील तर त्यांना प्रवेशासाठी शाळेत आणा' असे पत्रक पाठवतात. महाराष्ट्रात अनुदान असलेल्या शाळेतील तुकडी मध्ये मुले ७० ते ८० मध्ये असतात. त्या तुलनेत कार्डीफच्या शाळेत एका वर्गात १८ ते २० मुले असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे शिक्षकाचे लक्ष चांगले राहते. भारतातील शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, संपूर्ण भारतात अतिशय मोजक्या प्रमाणात असलेल्या शास्त्रज्ञांना त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाचा विशिष्ट कोटा उपलब्ध करून द्यावा असे पत्र त्यांनी तत्कालीन शिक्षणमंत्री नरसिंहराव यांना लिहिले. मात्र त्यांच्या दोन्ही पत्रांची दखल घेतली गेली नाही. पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार समितीवरच्या शास्त्रज्ञाच्या पत्राची अवहेलना जर शासन करत असेल, तर सामान्य माणसाच्या मागण्यांचे काय होत असेल? असे प्रश्नचिन्ह लेखकाने उपस्थित केले आहे.

विद्यापीठांचा दर्जा ढासळण्याच्या संदर्भात लेखक अतिशय परखडपणे त्या संदर्भाने म्हणतात, नेहरूंचे एक विधान आज वक्रोक्तीपूर्ण वाटते :

'विद्यापीठ हे मानवता, सहिष्णुता, तर्कशुद्ध विचारसरणी, कल्पनांच्या भराऱ्या आणि सत्याच्या शोधासाठी असते. मानवजातीची उच्चस्तर उद्दिष्टे गाठण्याच्या प्रयत्नांचे ते द्योतक आहे. जर विद्यापीठे आपली कर्तव्ये नीट बजावत असतील, तर राष्ट्राचे आणि त्याच्या नागरिकांचे कुशल आहे असे समजावे...'

वक्रोक्तीपूर्ण उद्‌गार ह्याकरता की नेहरूंच्याच पाठिंब्याने स्वायत्त संस्था उभारल्या जाऊन विद्यापीठांना शह बसला. असे म्हणता येईल, की भाभा-भटनागर यांच्या तोडीचा, पण विद्यापीठांची बाजू ठासून मांडणारा कोणी शास्त्रज्ञ नेहरूंना भेटला नाही. थोडक्यात, विद्यापीठे आपली कर्तव्ये नीट बजावू शकली नाहीत. स्वायत्त संस्था विद्यापीठाशी संलग्न ठेवता आल्या असत्या. संस्थांमधील शास्त्रज्ञांनी विद्यापीठात एक तरी कोर्स दरवर्षी द्यावा अशी सक्ती करता आली असती. तसेच विद्यापीठातल्या शिक्षकांना संशोधन आवश्यक ठेवून त्यासाठी अनुदान, श्रेय, पुरस्कार आदींनी प्रेरित करता आले असते. तसे झाले असते तर विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांना आपल्याभोवती उच्च संशोधन होताना दिसले असते आणि त्यातील काही जण स्वतः संशोधनाकडे प्रेरित झाले असते. एकंदरीत आपल्या आत्मकथनामध्ये जयंत नारळीकर यांनी वेळोवेळी भारतीय शिक्षण आणि परदेशातील शिक्षण यांचा तुलनात्मक अभ्यास करून आपले शिक्षणविषयक स्पष्ट विचार मांडले आहेत.

'आयुका' या भारतातल्या पहिल्यावहिल्या वैज्ञानिक संशोधन संस्थेमध्ये विज्ञानप्रसार करणे आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान रुजवणे हे कार्यक्रम हाती घेतले गेले. 'शाळेतल्या निरस आणि क्लिष्ट विज्ञान शिक्षण पद्धती बाहेर जाऊन विज्ञानाच्या गमतीजमती विद्यार्थ्यांपुढे मांडल्या तर वैज्ञानिक जगताकडे त्यातील काही हुशार विद्यार्थी आकर्षित होतील' असेही जयंत नारळीकर म्हणतात. राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या अनौपचारिक भेटीत आयुका पाहताना आणि शाळकरी मुलांशी संवाद साधताना राष्ट्रपतींना वेळेचे भान राहिले नाही आणि त्यांची भेट ठरल्या वेळेपेक्षा दुप्पट वेळ झाली. हे सांगत असताना शिक्षणप्रेमी असलेले अब्दुल कलाम विद्यार्थ्यांमध्ये कसे गुंतून जात आणि तशा राष्ट्रीय नेतृत्वाची भारताला गरज असल्याची जाणीव नारळीकरांनी करून दिली आहे. पु.ल. देशपांडे आणि सुनीता देशपांडे यांनी २५ लाख रुपयांची देणगी आयोगाच्या विद्यार्थिलक्षित कार्यक्रमासाठी दिली. निधीतून उभ्या राहिलेल्या इमारतीला 'पुलस्त्य' असे आकाशातील सप्तर्षी मधील कार्याचे नाव आणि पु.ल. देशपांडे यांचे नाव देऊन पु.ल. देशपांडे यांची स्मृती समोर ठेवण्यात आली.

लेखकाच्या तिन्ही मुली अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेल्या; यातूनच त्यांना मुलींच्या शिक्षणाबद्दल विशेष जाणीव होती असे दिसून येते. त्यांनी त्यांची पत्नी

मंगला नारळीकर यांच्यावरही शिक्षणाबाबत स्वतःची मते लादली नाही.

प्रसिद्ध व्यक्तीबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात हीरोवर्शिप असणे साहजिक असते आणि लेखकाच्या मनात फ्रेंडबद्दल ती होती. तो त्यांचा मित्र आणि गुरू सुद्धा होता. त्यामुळे त्यांच्यातील संवाद जास्त सोयीस्कर होत असे. आकलनावर भर देण्यासाठी शाळेचे माध्यम मातृभाषेचे असावे आणि इंग्रजी ही दुसरी भाषा म्हणून शिकवली जावी, अशा वाक्यातून त्यांनी मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

'एकंदरीत चार नगरांतले माझे विश्व' हे जयंत नारळीकर यांचे आत्मकथन त्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक शैक्षणिक संदर्भांचा उलगडा करत एका शास्त्रज्ञाच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीची प्रक्रिया सांगणारे ठरते. त्याशिवाय भारत आणि परदेश यात असलेला वावर अनुलक्षून भारत आणि परकीय शिक्षण यातील तुलनात्मक विवेचनही ते करतात. जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ असूनही सर्वसामान्य माणसाला पाल्याच्या शिक्षणासाठी या अडचणी येतात ते सांगून प्रभावी शिक्षण प्रणाली कशी वापरता येईल याबाबत सुद्धा जयंत नारळीकर भाष्य करताना दिसून येतात. माझ्या मते, स्वतःच्या, स्वतःच्या सभोवतालच्या, स्वतःच्या कुटुंबातील अशा सर्व संबंधित असलेल्या व्यक्तींच्या शिक्षणविषयक घडामोडींचे इतके सूक्ष्म वर्णन जगाच्या पाठीवरील कोणत्याही कीर्तिवंत शास्त्रज्ञाने जयंत नारळीकर यांच्याप्रमाणे सखोल आणि सविस्तरपणे केले नसेल. म्हणूनच जयंत नारळीकर यांचे 'चार नगरांतले माझे विश्व' हे आत्मकथन निव्वळ एका शास्त्रज्ञाचे आत्मकथन न राहता, एका शास्त्रज्ञाचा शिक्षणविषयक दृष्टिकोन दर्शवणारे ठरते.

– किरण डोंगरदिवे

भ्रमणध्वनी : ७५८८५६५५७६

## सूचना

'साहित्य' अंकाची वर्गणी थेट बँक-खात्यातही जमा करता येईल.
त्यासाठी साहित्य संघाचा बँक अकाउंट नंबर
तसेच IFSC Code कव्हर २ वर दिलेला आहे.
ऑनलाइन वर्गणी भरल्यास,
तुमचा पोस्टल ॲड्रेस, पिनकोडसहित
९८३३४४४३६९ या मोबाइल नंबरवर पाठवावा.

# हायकूपूर्व जपानी कविता

## विजय पाडळकर

हायकू हा जपानमधील अत्यंत लोकप्रिय काव्यप्रकार अलीकडील काळात जगभर बराच प्रसिद्ध झाला आहे. विशेषतः चार श्रेष्ठ जपानी हायकूकार, बाशो, बुसोन, इस्सा व शिकी यांच्या रचना इंग्रजीत अनुवादित झाल्यानंतर व त्यांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्यानंतर, अनेक भाषेतील साहित्यिकांत व रसिकांत त्या काव्यप्रकाराविषयी कुतूहल निर्माण झाले. मला प्रथम हायकू भेटला तो इंग्रजी भाषांतरात. हायकूंच्या एका प्रातिनिधिक संग्रहात मी वर उल्लेख केलेल्या जपानी कवींचे इंग्रजी अनुवाद वाचले आणि त्यांच्या प्रेमातच पडलो. नंतर एकदा अमेरिकेत गेल्यावर तेथील वाचनालयात हायकूंच्या इंग्रजी अनुवादाचा फार मोठा साठा मला सापडला. मात्र हायकूंचा शोध घेत असताना मी थोडा आजूबाजूलाही, जपानी कवितेच्या मुलूखात फिरत होतो. त्यावेळी जपानच्या समृद्ध काव्यपरंपरेचे विलक्षण दर्शन मला घडले.

बहुतेक साऱ्या संस्कृतींप्रमाणे सुरुवातीच्या काळात जपानमध्ये दीर्घ काव्यांची परंपरा होती. जपानी भाषेत लिहिल्या गेलेल्या 'कोजिकी' (इ.स. ७१२) आणि निहोन्शोकी (इ.स. ७२०) या पहिल्या दोन पुस्तकांत अनुक्रमे ११३ आणि १३१ कविता आढळतात. यांच्यापैकी अनेक कविता तर आठव्या शतकाच्या पूर्वी लिहिल्या गेल्या असण्याची शक्यता आहे. या कवितांचे नृत्य किंवा इतर समारंभात गायिल्या जाणाऱ्या गीतांशी बरेच साम्य आहे.

इसवी सनाच्या आठव्या शतकात कवींनी वेगळ्या प्रकारची, 'लघुकाव्ये' रचण्यास सुरुवात केली. ही एक नवी परंपरा निर्माण होते आहे हे ध्यानात आल्यावर अशा प्रकारच्या कवितांना 'तांका' हे नाव देण्यात आले. नंतरच्या दोन शतकांतच या काव्यप्रकाराची लोकप्रियता इतकी वाढली की बहुसंख्य कवी दीर्घ

काव्याला विसरूनच गेले. यापूर्वी जपानी कवितेसाठी 'वाका' हे नाव सरसकट वापरले जात होते. आता ते या 'लघु-काव्या'साठी वापरले जाऊ लागले. ही लघु कविता सर्वसाधारणपणे ५ युनिट मध्ये (विभागात) विभागून लिहिली जात असे. या युनिट मध्ये एकंदर ३१ 'ओन' उच्चारांचे एकक असून त्यांची विभागणी ५/७/५/७/७च्या रचनेत केली जाई. उदाहरणार्थ,

*'थरथरणाऱ्या फुलाचा चेहरा*
*सुकला आहे*
*मी शून्यपणे पाहत राहतो*
*जग वृद्ध होत जाते*
*पाऊस पडत राहतो'*

'ओन' ही संकल्पना मराठीत नसल्यामुळे ३१ ओन मराठीत दाखवता येत नाहीत.

नंतरच्या काळात 'तांका' या लघुरूपाचे आणखी लघु असे रूप प्रचलित झाले. त्यामध्ये एकंदर १७ ओन असून त्यांची विभागणी ५/७/५च्या रचनेत केलेली असे. या नव्या रूपाला 'हायकू' हे नाव मिळाले व पाहता पाहता या काव्यप्रकाराने इतर सर्वांना मागे टाकत अभूतपूर्व अशी लोकप्रियता मिळविली.

पण ही खूप नंतरची गोष्ट. १३व्या शतकापर्यंत तांका हाच जपान मधील सर्वांत लोकप्रिय असा काव्यप्रकार होता. इ.स.च्या सातव्या शतकात जपानमधील सुशिक्षित वर्ग हा आपल्या भावना कवितेतून व्यक्त करू लागला होता. अर्थात हा सुशिक्षित वर्ग मुख्यतः उच्चवर्णीय - राजे रजवाडे, सरदार आणि धनिक- असल्यामुळे समाजाच्या खालच्या स्तरातील लोक या कवींमध्ये सहसा आढळून येत नाहीत. हे उच्चवर्णीय लोक वेगवेगळ्या सामाजिक समारंभांच्या वेळी आपल्या कविता सादर करीत. शिवाय या काळात कवितेला उत्तम राजाश्रय देखील होता. राजाच्या दरबारात वेळोवेळी कवितांच्या स्पर्धा घेण्यात येत. राजे, राणी, त्यांचे कुटुंबीय देखील अनेकदा स्वतः कविता सादर करीत. प्राचीन भारतात देखील असे वातावरण होते आणि राजाच्या दरबारी सहसा एखादा राजकवी असे, हे आपल्याला ठाऊक आहेच. मात्र या जपानी कविता वाचल्यानंतर माझ्या ध्यानात एक फरक आला तो असा की या कवितात प्रेमभावनेचे स्पष्ट, तरीही तरल वर्णन केले जात असे.

सुरुवातीच्या काळात जपानी कवीवर चिनी काव्याचा फार मोठा प्रभाव होता. उदाहरणादाखल ओटोमो नो ताबीतो ६६५-७३१ या कवीचा हा तांका पाहू-

*'माझ्या बागेत*
*प्लमचा बहर आलेला*
*की पावसाच्या ऐवजी*
*पडला आहे बर्फच*
*आकाशातून?'*

प्लमचा बहर म्हणजे बर्फ ही चमकदार कल्पना कवीने थेट चिनी काव्यातून उचलली आहे. मात्र सुरुवातीच्या काळात असे अनुकरण थोडेफार क्षम्यही असते.

त्या काळाच्या रीतिरिवाजाप्रमाणे जपानमध्ये आपसात नाते नसलेले उच्चवर्णीय स्त्री-पुरुष एकमेकांशी मोकळेपणी बोलू शकत नसत. म्हणून ते बहुसंख्य वेळा पत्रांतून एकमेकांशी संपर्क करीत आणि 'तांका' हे त्या पत्रांचे अविभाज्य अंग असे. ही मंडळी 'सुसंस्कृत' असल्यामुळे सहसा या कवितेतून अभिरुचिहीन विचारांचे चित्रण केले जात नसे. अनेकदा प्रेमभावना स्पष्टपणे न मांडता, आडवळणाने मांडल्या जात. त्यामुळे आपोआपच योजल्या गेलेल्या प्रतिमांमुळे या पत्रांतील लेखन काव्याच्या पातळीवर जात असे. जपानी भाषाही या पद्धतीच्या लिखाणाला पूरक होती. उदाहरणार्थ, जपानी भाषेत 'मात्सु' या शब्दाचे दोन अर्थ होतात. एक, 'पाइनचा वृक्ष' आणि दुसरा 'वाट पाहणे'. त्यामुळे कवितेत पाइन वृक्षाचे वर्णन करणाऱ्या कवीला 'मी तुझी वाट पाहतो आहे' असेही सुचवायचे असे. '*समुद्र हे पर्वताला गिळून टाकू शकत नाहीत*' असे जेव्हा एखादा कवी लिही, तेव्हा त्याचा अर्थ 'कुठलीही शक्ती माझ्या प्रेमाचा नाश करू शकत नाही' असाही असे. हरिणाचे ओरडणे हे उदासीनतेची प्रतिमा मानली जात असे. की सेन हा कवी लिहितो,

*'माझी भिख्खूची झोपडी*
*शहरापासून दूर*
*सोबत फक्त एक हरीण.*
*पर्वतातील घर, माणसे*
*सोडून गेलेली'*

या कवितांपैकी बऱ्याचशा कविता ही 'निसर्गकाव्ये' असली तरी त्यापैकी अनेक कवितांत मानवी भावना, विशेषतः प्रेमभावनांचे सूचन केलेले असे. कधीकधी निसर्ग आणि मनातील प्रेमभावना यांची सांगड देखील घातली जात असे. मिबू नो तादामिने ८६०-९२०ची एक कविता आहे-

*'गारठलेली सकाळ*
*क्षीण चंद्र*
*सोबतीला कुणी नाही*
*विरहात उगवणाऱ्या दिवसाइतके*
*प्रेमहीन काहीच नाही'*

चंद्र हा या निसर्गकाव्यातील महत्त्वाचा आणि कवींचा लाडका विषय. हा चंद्र कधीकधी 'पावित्र्याचे' प्रतीक म्हणून वापरला जात असला तरी बहुसंख्य वेळा तो प्रेम आणि विरहाचा संदर्भ घेऊनच कवितेत येत असे.

*'पर्वत शिखरावर*
*निस्तेज चंद्र*
*आता तरी उगवेल का?*
*मी वाट पाहते...*
*रात्र गडद होत जाते'* – कवी अनामिक

कधी कधी निसर्गाचा संदर्भ न घेताच देखील प्रेम व्यक्त केले जात असे. निसर्गवाचक शब्द हा कवितेचा एक आवश्यक भाग नंतरच्या काळात मानला गेला. एक कवयित्री लिहिते–

*'जर तू मण्यांची माळ असतास*
*तर तुला मनगटाभोवती बांधले असते–*
*पण या ऐहिक जगात*
*तू पुरुष आहेस*
*वळविण्यासाठी अवघड'*

मात्र जसजसा 'तांका' हा काव्यप्रकार लोकप्रिय बनू लागला, तसतशी आपल्याला जे सांगायचे आहे ते वाचकांनी ओळखावे म्हणून ते धूसर ठेवण्याची प्रथाही या काळात सुरू झाली. ओटोमो नो याकामोची हा कवी लिहितो–

*'माझ्या शरीराचे हे फोलपट*
*बिनमहत्त्वाचे आहे*
*मी पाहतो आहे*
*पर्वत आणि नद्यांकडे*
*शोधतो आहे माझा मार्ग'*

हा मार्ग ऐहिक प्रवासातला मार्ग असू शकतो किंवा आत्मिक मार्गही. ही संदिग्धता काव्याला अधिक मनोरम बनविते.

ऋतूंचे वर्णन हा देखील या कवितांचा महत्त्वाचा भाग असे. हे ऋतू देखील प्रतीकात्म अर्थ घेऊनच कवितेत अवतरत. उदाहरणार्थ, हिवाळा हा एकाकीपणाचे प्रतीक म्हणून तर वसंत ऋतू हा प्रेम, तारुण्य आणि उत्साह यांचे प्रतीक बनून कवितेत येई. '*मी पहाटेचा चंद्र एकट्यानेच पाहिला*' याचा अर्थ 'माझी प्रिय व्यक्ती माझ्याजवळ नव्हती' असा असे. केव्हा-केव्हा ही भावना स्पष्टपणे देखील व्यक्त केली जाई. उदाहरणार्थ, मंक सोसेई (मृत्यू ९७०) हा कवी लिहितो,

*'लवकरच येते'*
*तू म्हणालीस*
*म्हणून मी वाट पाहतोय*
*या प्रदीर्घ रात्री*
*सकाळचा चंद्र दिसेपर्यंत'*

एक अनामिक कवी लिहितो-

*'माझे प्रेम, माझा तिरस्कार*
*किती निरर्थक...*
*शरदातल्या उत्तररात्री*
*एकट्याने*
*पावसाचा आवाज ऐकताना'*

**'कोकिन्शू'**

इ.स. ९०५च्या सुमारास जपानचा राजा दियागो याने अनेक मान्यवर व्यक्तींना बोलावून जपानी कवितांचा एक प्रातिनिधिक काव्यसंग्रह तयार करण्याची कामगिरी त्यांच्याकडे सोपविली. या संग्रहाचे नाव 'कोकिन्शू' असे ठेवले गेले. या संग्रहात सुमारे वीस पुस्तके होती आणि त्यांपैकी सात पुस्तकांचा मुख्य विषय निसर्ग हा होता तर पाच पुस्तकांत प्रेमकवितांचे संकलन होते. हे संकलन तयार करणाऱ्यांपैकी की नो त्सुरायुकी हा स्वत: एक उत्तम कवी होता. त्याने या संकलनाला सुरेख प्रस्तावना लिहिली आहे. त्यांत तो लिहितो-

'जपानमधील कवितेचे बीज हे मानवी हृदय असून शब्द ही तिची पाने आहेत. जेव्हा माणसे आजूबाजूला जे पाहतात किंवा ऐकतात, त्याने प्रभावित होतात, किंवा आपल्या आयुष्यातील घटनांबद्दलच्या आपल्या भावनांना शब्दरूप

द्यावेसे त्यांना जेव्हा वाटते, तेव्हा कविता निर्माण होते. पाखरांचे गाणी म्हणणे, तलावातील बेडकांचे आवाज करणे, आपल्याला शिकविते की पृथ्वीवरील सर्व प्राणी गाणे गाऊ शकतात. ही गाणी स्वर्ग आणि पृथ्वीलाही सहज हलवू शकतात, स्त्री आणि पुरुष यांच्या नात्यात सुसंवाद आणू शकतात आणि शूर योद्ध्यांच्या हृदयांना कोमल बनवू शकतात.'

या कविता संकलनात स्त्रियांचा सहभाग देखील लक्षणीय आहे. ओनो नो कोमाची ८३४-८८० ही त्यांपैकी एक महत्त्वाची कवयित्री. ती तिच्या कवितेइतकीच तिच्या अप्रतिम लावण्याबद्दल प्रसिद्ध होती. तिच्याविषयी अशी आख्यायिका सांगितली जाते की तिला मागणी घालणाऱ्या एका तरुणाला तिने अशी अट घातली की जर तो सलग शंभर रात्री तिच्या घरासमोर दिवस उगवेपर्यंत उभा राहिला तर ती त्याच्याशी लग्न करील. असे म्हणतात की तो नव्याण्णवाव्या दिवशी मरण पावला.

कोमाचीची एक प्रसिद्ध कविता आहे-

*'मानवी हृदयाच्या*
*फुलांचा रंग*
*फिका होत जातो*
*या जगात*
*कसल्याही बाह्य कारणाशिवाय.'*

या कवितेत तिने 'इरो' हा जो शब्द वापरला आहे, त्याचे जपानी भाषेत दोन अर्थ होतात. एक म्हणजे 'रंग' आणि दुसरा 'उत्कट भावना'. या द्वर्थी शब्दामुळे कवितेला निराळीच खुमारी आली आहे. अर्थात जपानी न येणाऱ्या वाचकांनाही हे अर्थ ध्यानात येतात, ते 'हृदयाच्या फुलांचा रंग' या शब्द समुच्चयामुळे.

कोमाचीच्या नंतरच्या पिढीतील कवयित्री लेडी ईसे ८७५-९३८ हिच्या कवितेपूर्वी तिने एक लहानशी टिपणी लिहिली आहे. त्यांत तिने लिहिले आहे की एकदा तिने कापणीनंतर शेतात उरलेले तण जाळतानाचे दृश्य पाहिले आणि तिला पुढील कविता सुचली-

*'मला जाणवते आहे*
*हिवाळ्यातील तण जळावे तसे*
*माझे शरीर जळताना-*
*तरी मला ठाऊक आहे*
*वसंत येणार आहेच'*

या कवितांमधून कधीकधी शारीरिक प्रेमाचे अनलंकृत धीट वर्णन देखील केलेले आढळते. एक अनाम कवयित्री लिहिते–

*‘जेव्हा पहाटेचा*
*प्रकाश अवतरला*
*आपण एकमेकांना मदत केली*
*आपले कपडे चढविण्यास–*
*किती दुःखद’*

पहिली जपानी कादंबरी काही जणांच्या मते जगातील पहिली, ‘The Tale of Genji’ ही लेडी मुरासाकी शिकीबू नावाच्या लेखिकेने अकराव्या शतकाच्या सुरूवातीला लिहिली असे मानले जाते. ती जपानच्या दरबारातील राणीची मुख्य मदतनीस होती. या कादंबरीचे मूळ हस्तलिखित गहाळ झालेले आहे. ती प्राचीन जपानी भाषेत लिहिली गेली असून आधुनिक जपानी भाषेत तिचे रूपांतर बिसाव्या शतकात केले गेले.

या कादंबरीचा नायक प्रिन्स गेंजी हा राजाचा, त्याच्या एका अंगवस्त्रापासून झालेला मुलगा होता. आपल्या विवेचनाच्या संदर्भात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो एक कवी होता, व त्याने लिहिलेल्या अनेक कवितांचा अंतर्भाव या कादंबरीत करण्यात आला आहे. दीर्घ गद्य लेखनात पद्याची सरमिसळ हे तंत्र जपानी साहित्यात अगदी पहिल्या कादंबरीपासून वापरले गेले ही लक्षणीय गोष्ट आहे. गेंजीची एक कविता अशी आहे–

*‘तळाशी असणाऱ्या*
*दगडाचा रंग*
*जसा दिसत नाही*
*तशा माझ्या भावना*
*दिसणार नाहीत तुम्हाला’*

कवितेद्वारा सवालजवाब हे या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. दोन माणसे, बहुधा प्रियकर–प्रेयसी एकमेकांना कविता लिहितात आणि तिचे उत्तरही त्यांना कवितेतून मिळते. या कादंबरीतील काही कवितांतून जग हे नश्वर असल्याची भावनाही व्यक्त केली गेली आहे.

फुजिवारा नो तेईका हा या परंपरेतील एक महत्त्वाचा कवी मानला जातो. तो एक उत्तम कवी तर होताच; पण याबरोबरच त्याने जपानी कवितेच्या

अभ्यासकांसाठी फार मोठे कार्य करून ठेवले आहे. इ.स. १२३७च्या सुमारास त्याने 'हायकुनीन इस्शू' या नावाचा एक काव्यसंग्रह तयार केला. या संग्रहात त्याने सातव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंतच्या निवडक १०० कवींच्या प्रत्येकी एक अशा १०० कविता एकत्रित केल्या. हे एक ऐतिहासिक कार्य होते. हा संग्रह अतिशय लोकप्रिय तर झालाच; पण आज देखील त्याच्या नव्या-नव्या आवृत्त्या निघत असतात व जपानी कवितेचा अभ्यास करणाऱ्यांसाठी तो अत्यावश्यक असा ग्रंथ मानला जातो. हा संग्रह इतका लोकप्रिय झाला की त्याच्यावरून एक नवा 'कार्ड-गेम' तयार करण्यात आला. या खेळात प्रत्येक कवितेच्या पाच ओळींची विभागणी दोन कार्डांत केली जात असे. एका कार्डावर पहिल्या तीन ओळी लिहिल्या जात व दुसऱ्यावर नंतरच्या दोन. अशी १०० कवितांची दोनशे कार्डे तयार केली जात. ही कार्डे एकमेकांत मिसळून ज्याच्या वाट्याला पहिल्या तीन ओळी येतील, त्याने शेवटच्या दोन ओळी शोधून कविता पूर्ण करायची, असा हा खेळ होता. त्यात पारंगत होण्यासाठी पाठांतर व कवितेची जाण या दोन्ही गोष्टी आवश्यक होत्या. या काळात तांका काव्य इतके लोकप्रिय झाले होते की या कवितांचे wood-block prints काढले जात. त्या कविता घर सजवटीसाठी वापरल्या जात, इतकेच नव्हे तर कपड्यांवर देखील लिहिल्या जात. आजच्या काळात टी शर्टवर चमकदार वाक्ये लिहिली जातात तशा!

या संग्रहाचा माझ्याजवळ असलेला इंग्रजी अनुवाद Frank Watson याने 'One Hundred Leaves' या नावाने केला आहे. या संग्रहात कविता त्यांच्या प्रकाशनाच्या कालक्रमानुसार संग्रहित केल्या असल्यामुळे जपानी कवितेचा इ.स. १३०० पर्यंतचा विकास अभ्यासण्यासाठी त्याची फारच मदत होते.

या पुस्तकातील पहिली कविता ही एंपरर तेंची इ.स. ६२३-६७१ याने लिहिलेले आहे.

*'कापणीचा हंगाम*
*कशीबशी शाकारलेली झोपडी*
*हिवाळ्याचा आसरा*
*माझी बाही*
*दवाने ओली'*

(ओली बाही हे दु:खी मनाचे प्रतीक मानले जाते.)

सारूमारू नो दायू (काळ अनिश्चित) हा कवी लिहितो,

*'पर्वतांच्या अंतरंगात*
*लाल काळ्या पानांना तुडवीत*
*एक हरीण ओरडते*
*एक आवाज ऐकू येतो*
*हिवाळ्याच्या उदासीत'*

काळ हातून निसटत चालला असल्याची विषण्ण करणारी भावना ओनो नो कोमाची (८२५-९००) याने त्याच्या खालील कवितेतून मांडली आहे.

*'थरथरणाऱ्या फुलाचा चेहरा*
*सुकला आहे*
*मी शून्यपणे पाहत राहतो*
*जग वृद्ध होत जाते*
*पाऊस पडत राहतो'*

ढगांच्या आकारात आपल्या मनाचे आकार शोधणे हा प्राचीन काळापासून कवींचा आणि कविमनाच्या रसिकांचा छंद आहे. हेन झौउ (काळ अनिश्चित- सुमारे आठवे शतक) याची ही कविता आधुनिक काळातील भावकवितेशी किती जवळचे नाते सांगते!-

*'वायुलहरींनो*
*ढगांना बिसकटणारे*
*तुमचे वाहणे कृपया थांबवा*
*मला दिसणारा तिचा चेहरा*
*पाहू द्या आणखी काही काळ'*

काही कवितांमधून कवीच्या मनात भळभळणारे दुःख ठळकपणे प्रकट होताना दिसते-

अरिवारा नो युकीहीरा (८१८-८९३) लिहितो-

*'दूर आहो आपण एकमेकांपासून*
*पण जर मला*
*तुझे शोकगीत ऐकू आले-*
*मी लगेच परत येईन*
*किंवा जीव देईन'*

आपल्या प्रिय व्यक्तीची वाट पाहण्याची भावना अनेक कवितांमधून व्यक्त झालेली दिसते.

सोसेइ होशी हा कवी लिहितो-

*'मी येते'*
*असे तू म्हणाली होतीस*
*म्हणून मी वाट पाहत राहिलो*
*या दीर्घ दिवसांत*
*सकाळच्या चंद्राची'*

या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्या शेवटच्या दोन ओळीत ७ ऐवजी ८ 'ओन' आहेत.

५/७/५/७/७ हा आकृतिबंध सामान्यपणे पाळला जात असला तरी क्वचित कवी तो झुगारून देत, व त्याला मान्यताही असे. अशा अधिक 'ओन'ला 'जियामारी' असे म्हटले जाई.

निसर्गावर आपल्या मनातील भावनांचे रोपण करणे, हाही पुरातन काळापासून कवींचा छंद आहे.

मिनामोतो नो मुनेयुकी (मृत्यू ९४०) हा कवी लिहितो,

*'हिवाळ्याहून अधिक एकाकी*
*हे पहाडातील खेडे*
*आठवण करते आहे*
*सोडून गेलेल्या माणसांची*
*सुकलेल्या गवताची'*

ओशिकोची नो मित्सुने (८५९-९२५) याची एक रचना आहे-

*'मन गोंधळले आहे माझे-*
*मोसमातील पहिल्या धुक्याने*
*संभ्रमाची चादर पसरली आहे*
*पांढऱ्या शेवंतीवर*
*मी फुले तोडू शकेन तर योगायोगानेच'*

हे एक सुंदर असे निसर्गदृश्य आहे. धुके, संभ्रम, पांढरी शेवंती या साऱ्यांना अर्थाचे दुहेरी पदर आहेत. प्रत्येकाने ते आपल्या मनात उलगडू पाहावेत. मनातही कदाचित संभ्रमाचे धुके साचेल, पण ते हवेहवेसे असेल यात शंका नाही.

हरूमीची नो त्सुराकी (मृत्यू ९२०)ची एक सुरेख रचना–

*‘पर्वतातील झऱ्यात*
*पूल तयार केला आहे*
*या वाऱ्याने*
*मेपलच्या पानांचा*
*प्रवाह अडवणारा’*

दऱ्याखोऱ्यातून भ्रमण करणाऱ्या वाटसरूला दिसणारे एक नेहमीचे दृश्य. पानगळीचा मोसम आहे. वाऱ्याने मेपलच्या झाडांची पाने गळून पडताहेत ती खालच्या वाहणाऱ्या झऱ्यात. प्रवाह अडला आहे. पण या पानांनी फक्त अडविण्याचे काम केलेले नाही, त्यांनी एक पूल देखील तयार केला आहे. हा पूल आहे ‘पलीकडल्या’ तीरावर जाण्यासाठी... गळून पडणारी पाने हा वाटसरूचाही ‘प्रवास’ संपण्याचा तर संकेत नसेल?

तांका कवितेतील ५ ओळींची आणि ३१ ओनची रचना नेमकी केव्हा दोन विभागांत विभागली जाऊन तिचा १७ ओनचा भाग ‘स्वतंत्र’ झाला, ते सांगता येत नसले तरी ही प्रक्रिया अकराव्या शतकात सुरू झाली असे मानले जाते. तांका कवितेतील सर्वश्रेष्ठ कवी म्हणून ज्याला ओळखले जाते, तो सायग्यो होशी (१११८–११९०) हा कवी तांका आणि हायकू यांच्यामधील पूल मानला जातो. सुमारे तीन शतकानंतर जो हायकू हा काव्यप्रकार जन्माला आला, त्याच्यावर सर्वाधिक परिणाम करणारा कवी म्हणून देखील सायग्यो ओळखला जातो. जपानचा महान हायकूकार मात्सुओ बाशो याने आपल्यापूर्वी चार शतके जन्मलेल्या सायग्योचे आपल्यावरील ऋण अनेकदा मान्य केले आहे.

सायग्योंच्या काही सुरेख कविता–

*‘जेव्हा ती म्हणते,*
*‘तुझ्या भावना मी जाणते’*
*तेव्हा वाटते, यापेक्षा*
*चांगले होते*
*तिने काहीच न म्हणणे’*

त्याची आणखी एक कविता–

*‘निरोप घेतानाचे*
*तिच्या चेहऱ्यावरचे भाव*

*मी कधीच विसरू शकणार नाही*
*तिने तिचा चेहरा*
*चंद्राला दिलाय नां...'*

सायग्योचे चेरी बहरावर आणि चंद्रावर अतिशय प्रेम होते. त्याच्या लेखी निसर्गातील सौंदर्याचा शोध आणि बुद्धाचा शोध हे एकच होते. निसर्गसौंदर्याचे वर्णन करणे म्हणजे मनाच्या एका उन्नत, भ्रममुक्त, ज्ञानी अवस्थेचे वर्णन करणे होय आणि म्हणूनच त्याच्या प्रेमात पडणे म्हणजे 'योग्य मार्गावरील' एक पाऊल आहे, अशी त्याची धारणा होती. एका ठिकाणी त्याने लिहिले आहे–

'मी संपूर्ण वसंत ऋतुत या फुलांकडे केवळ पाहत राहू इच्छितो.'

विशेषतः योशिनो पर्वतावरील चेरी बहर त्याच्या फार आवडीचा होता.

*'एकटा प्रवास करताना*
*मला जाणवत नाही*
*माझ्या हृदयाचे धडधडणे*
*ते मागेच राहिले आहे*
*जेथे मी चेरीबहर पाहिला होता'*

आणखी एका ठिकाणी त्याने लिहिले–

*'ज्याने स्वत:ला जगण्यापासून*
*पूर्णपणे अलग केले आहे*
*त्या माझ्या शरीरात*
*तेच हृदय धडधडते आहे का,*
*ज्याने एकदा चेरीबहर पाहिला होता.'*

किंवा–

*'चालता चालता थकून*
*मी झोपी जातो*
*चेरीच्या झाडाखाली*
*वसंताच्या वायुलहरी माझ्यावर*
*पसरतात पाकळ्यांची चादर'*

मात्र झोपेतही कवीला स्वप्ने पडतात ती बहराचीच–

*'मी स्वप्नात पाहिले*
*वसंतवारा झाडावरचा बहर*
*विस्कटत होता.*
*जागे झाल्यावर देखील*
*छातीत कळ जाणवते आहे'*

आयुष्य हे क्षणभंगूर आहे ही जाण सायग्योच्या मनात सतत दिसते. तरी याबद्दल त्याची तक्रार नाही, उलट ते तसेच असायला हवे, असेही त्याला वाटते. आयुष्य क्षणभंगुर असल्याची भावना, जी पुढे हायकूचा एक महत्त्वाचा भाग बनली, ती येथे बीजरूपाने आढळते.

*'क्षणात दिसले, क्षणात अदृश्य*
*फुलपाखरू उडताना*
*कुंपणाने वेढलेल्या फुलांमधून–*
*असेच आयुष्य हवे, जरी ते असेल*
*क्षणात दृश्य, क्षणात अदृश्य...'*

जपानी कालगणनेनुसार ११९० सालच्या दुसऱ्या महिन्याच्या सोळाव्या दिवशी त्याने शेवटचा श्वास घेतला. अतिशय आश्चर्याची गोष्ट म्हणजे, सुमारे वीस वर्षांपूर्वी त्याने 'आपण कधी व कोठे मरण पावू इच्छितो' या संदर्भात एक कविता लिहिली होती. त्यात लिहिले होते–

*'माझी इच्छा आहे*
*वसंत ऋतुत मला मृत्यू यावा*
*चेरीचा बहर फुललेला असताना*
*वर्षाच्या दुसऱ्या महिन्यात*
*आकाशात पूर्ण चंद्र असताना.'*

आश्चर्याची गोष्ट म्हणजे बुद्धाने त्याची ही इच्छा पूर्ण केली, फक्त एक दिवसाच्या फरकाने. पौर्णिमेच्या नव्हे तर त्यानंतरच्या दिवशी त्याचा मृत्यू झाला. कदाचित पौर्णिमेच्या चंद्राने त्याला रात्रभर न्याहळून त्याचा निरोप घेतला असेल!

**– विजय पाडळकर**
भ्रमणध्वनी : ७८२२९५४७०६

# लेन्यामंदी लेनं

## विद्या प्रभू

*अस्तुरीचा जन्म नको देऊ सख्या हरी ।*
*जल्मावेरी रात दिस परक्याची ताबेदारी ।।*

स्त्रीजातीची अगतिकता दर्शविणारी ही ओवी आहे, 'मालनगाथा' या लोकसंग्रहातील. बाईनं उभा जन्म प्रपंचाच्या घाण्याभोवती फिरत राहायचं, हे जणू तिचं प्राक्तन! मात्र, रोजचं दळण-कांडण करताना तिच्या 'हुरुताच्या गाठी' आपसूक सुटायच्या आणि सुखंदुःखं पोटातून ओठावर येत ओवीरूप होऊन जायची. अंतरीच्या या उमाळ्यातूनच लोकगीतांची निर्मिती झाली. अप्रतिम भावसौंदर्य आणि भाषेचं माधुर्य यामुळे ती मराठी भाषेची सुभग, सुंदर लेणीच ठरली आहेत.

सासर-माहेर, नातीगोती, विविध सणवार, पाऊस, शेतशिवार इ. जीवनाच्या सर्वच अंगांना या ओव्या स्पर्श करतात. त्यामध्ये स्त्रियांच्या साज-शृंगारा संबंधीच्या ओव्यांची संख्याही लक्षणीय आहे. शृंगारलेण्यात हळद-कुंकू, काकणं, मंगळसूत्र या सौभाग्यचिन्हांचं महत्त्व अनन्यसाधारण. त्यातही कुंकवाचा मान जरा अधिकच. घरी आलेल्या सुवासिनीला, ती परत जाताना कुंकू लावायचं. सवाष्णीला अहेराचं लुगडं देताना कुंकवाचं बोट लावून द्यायचं. कुंकवाची जपणूक अगदी जिवापाड करायची! कपाळीचं कुंकू विस्कटलं वा पुसलं जाऊ नये, म्हणून फार जपायचं. ते पाण्यात पाहून लावू नये, उभ्यानं लावू नये, असेही संकेत आहेत.

कपाळीचं कुंकू अक्षय राहावं, हेच बाईचं देवाकडे मागणं आणि त्यासाठी तिची भाबडी धडपडही! म्हणूनच करंड्यातलं कुंकू संपलं किंवा हातातली बांगडी फुटली, तरी तसं बोलायचं नाही; 'कुंकू अधिक झालं', 'बांगडी वाढवली' असं म्हणायचं!

कोकणात पूर्वी देवदासी प्रथा होती. देवदासी ही अखंड सौभाग्यवती, सदा सवाष्ण. म्हणूनच लग्नसमारंभात तिला मानानं बोलावणं केलं जाई. वधू सदा सुहागन राहावी म्हणून तिचं मंगळसूत्र भाविणीकडून (देवदासी) ओवून घेत. इतर सवाष्ण बायकाही तिच्या कपाळीचं कुंकू घेऊन आपल्या कपाळी लावीत.

स्त्रियांच्या, कुंकवाविषयीच्या उत्कट भावना व्यक्त करणाऱ्या या काही ओव्या पाहण्यासारख्या आहेत-

*धनसंपदेचं नग देवाला घालू कोडं ।*
*हळदकुंकवाचं राज्य असावं तेवढं ।।*

*शेरभर सोनं नाही माझ्या खातरीत ।*
*कपाळीचं कुंकू नित पाहते मी आरशीत ।।*

बाईला मरण यावं ते अहेवपणी; भरल्या कपाळानं, भरताराच्या आधी! असं मरण मोठं भाग्याचं आणि मानाचंही. बाईला अहेव मरण लाभणं म्हणजे तिनं जणू अवघड गड जिंकणं!

*अहूळी नार मेली कपाळी लाल टिळा ।*
*सुखी अहूळी मरण गड नारीनं जित्तीला ।।*

अहेव मरणाचं कसं सुंदर चित्र बाईनं मनात रंगवलंय पाहा-

*अहूळी मरण कसं भरताराच्या आधी ।*
*शेल्याच्या पदरात गुल्लाल पानामंदी ।।*

*अहेव मरणाची मला ग बाई हौस ।*
*मागनं येतं गोत, पुढे कुंकवाचा पाऊस ।।*

*गेला माहा जीव, माह्या किल्डीले साकळ्या ।*
*देर-जेठ ओझे खांदा, राम चालू द्या मोकळा ।।*

सवाष्णीची अंत्ययात्रा, म्हणून जाताना माझ्या शेल्याच्या पदरात गुलाल

बांधून दिला आहे. सगळे गणगोत अंत्ययात्रेत सामील होऊन माझ्या मागून चालले आहेत. माझ्या किल्डीला (तिरडीला) साखळ्या लावून ती छान सजवली आहे. कुंकू भरभरून उधळलं जातंय! वाटभर त्याचा जणू पाऊस पडलाय! माझे धाकटे आणि थोरले दीर माझ्या तिरडीला खांदा देतील. माझ्या बरोबर माझा राम (भ्रतार) मोकळा चालू द्या; त्याला माझं ओझं घालू नका.

बाईला कुंकवाची अशी विलक्षण असोशी, म्हणूनच ती देवाकडे कुंकवाशिवाय दुसरं काहीच मागत नाही-

*उगवला नारायेन काय मागू तेच्या पाशी ।*
*बाई ग, मागते मी हळद-कुंकवाच्या राशी ।।*

*लेन्यामंदी लेनं, हात भरून काकणं ।*
*कपाळीचं कुंकू चंद्रापरीस देखणं ।।*

कुंकवाची ही कमालीची असोशी का आली असेल, धन-दौलत, सोनं-नाणं अव्हेरून बाईनं कुंकू, चुडे यांचीच आस का धरली असेल? या प्रश्नाचं उत्तर आहे, आपल्या संस्कृतीतच दडलेलं! विवाहित स्त्रीच्या कपाळीच्या कुंकवाचं अस्तित्व असतं, तिचा पती जिवंत असेपर्यंतच! तो मरण पावला की तिचं कुंकू पुसलं जातं आणि इतर अहेवलेणीही उतरवली जातात! कुंकू पुसलं जाणं म्हणजे जगण्याचा आधारच जाणं. मग आयुष्याची परवड, विटंबना, अवहेलना आणि जिवंतपणीचं मरण! अशा विधवेनं आभूषणरहित, असाहाय्य, कोणाच्या तरी आश्रयानं कष्टाची धनी होऊन दिवस कंठायचे. तिनं धार्मिक विधीत, सण-समारंभात भाग घ्यायचा नाही. एवढंच नव्हे, तर दुसऱ्या स्त्रीच्या कपाळी कुंकू लावायचाही अधिकार तिला उरत नाही! ही सगळी विटंबना टाळायची तर कपाळीचं कुंकू अढळ हवं! म्हणूनच एखाद्या स्त्रीचा पती मोठ्या आजारपणातून मरता मरता वाचला तर 'तिचं कुंकू बळकट आहे' असं म्हटलं जातं.

पूर्वी अशा स्त्रीला चांगलं वस्त्रही परिधान करण्याचा अधिकार नव्हता. काही समाजात तर विधवेचं केशवपन करून तिला अधिकच विद्रूप केलं जाई. अशी स्त्री अशुभ म्हणून तिचं दर्शनही लोक टाळीत. त्याही पूर्वी आपल्याकडे एक काळ असा होता, की पतिनिधनानंतर त्याच्या शवाबरोबर पत्नीलाही जाळून घ्यावं लागे. मात्र, हे तिचं प्राक्तन आहे, असं संस्कृतिरक्षकांनी तिच्या मनावर बिंबवलेलं असे. निर्दयतेची परिसीमा म्हणावी, अशी सतीप्रथा सुमारे दोनशे वर्षांपूर्वी

आपल्याकडे होती.

मग भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे '*यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति...*' अशी परिस्थिती निर्माण झाली तेव्हा बंगालमध्ये राजा राममोहन राय यांच्या रूपाने जणू ईश्वरच अवतरला! सन १८२९ मध्ये त्यांनी ब्रिटिश संसदेत ही अमानुष प्रथा बंद करावी, अशी मागणी गेली. ती मान्य झाली आणि सतीप्रथा कायद्याने रद्द करण्यात आली. मात्र, त्याला आता जवळपास दोनशे वर्षे होत आली तरी त्या क्रूर प्रथेचे अवशेष म्हणावे, अशा काही गोष्टी आपल्याकडे अजूनही पाहायला मिळतात.

आता विधवा सहगमन करीत पतीच्या चितेत स्वतःला जाळून घेत नाहीत, पण त्यांचे सर्व साजशृंगार, हौसमौज, इच्छा पतीच्या चितेवर जणू सती जातात! खेडोपाडी तर विधवांच्या बाबतीतल्या या रूढी अधिकच भीषण आणि मन विदीर्ण करणाऱ्या असतात.

मात्र, दुष्ट रूढींच्या या मिट्ट काळोखातही कुठेतरी एखादी ज्योत जागतेच. सन २०२० साली आपल्याकडे 'कोरोना' या भयंकर रोगाचा प्रादुर्भाव सुरू झाला आणि कितीतरी तरुण स्त्रिया वैधव्याच्या भीषण खाईत लोटल्या जाऊ लागल्या! राज्याच्या विविध भागांतून त्यांच्या आक्रोशाच्या हृदयद्रावक कथा वर्तमानपत्रांतून लोकांपर्यंत पोहोचत होत्या. त्याने सहृदय माणसं व्यथित होत होती. त्यांची हृदयस्थ ज्योत जागली. त्यांनी संघटना तयार केल्या आणि ते असाहाय्य विधवा माता-भगिनींच्या सन्मानार्थ पुढे सरसावले.

दुष्ट रूढींच्या भीषण काळोखात पहिली ज्योत पुढे आली ती हेरवाडच्या ग्रामस्थांच्या रूपाने. कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यातील हेरवाड हे एक छोटंसं गाव, सुमारे दहा हजार वस्तीचं. तिथल्या ग्रामस्थांनी ग्रामसभेत एक ठराव संमत केला-

'यापुढे गावातील विधवांचे कुंकू पुसणे, मंगळसूत्र तोडणे, बांगड्या फोडणे, या प्रथा बंद करण्यात आल्या आहेत. विधवांना सन्मानाने जगण्याचा अधिकार असून त्यांच्या या अधिकाराची जपणूक करण्यात येईल.' अशा आशयाचा तो ठराव होता.

हेरवाडच्या या ज्योतीने आणखी एक दीप प्रज्वलित झाला. सोलापूरच्या करमाळा येथील रहिवासी प्रमोद नामदेव झिंझाडे हे चौसष्ट वर्षांचे शेतकरी गृहस्थ. त्यांनी तहसीलदारांसमोर केलेलं प्रतिज्ञापत्र लक्षणीय आहे. आपल्या प्रतिज्ञापत्रात ते म्हणतात, ''माझ्या मृत्यूनंतर माझ्या पत्नीने कुंकू पुसणे, मंगळसूत्र तोडणे, बांगड्या फोडणे यांपैकी कोणत्याच प्रथेचं पालन करू नये. तसेच त्यासाठी तिच्यावर कोणीही तशी सक्ती करू नये.''

झिंझाडे यांचा हा पुरोगामी विचार आणि तो जाहीरपणे व्यक्त करण्याची त्यांची हिंमत या गोष्टी प्रशंसार्ह आणि प्रेरणादायी अशाच आहेत. 'या दीपज्योतीने तर किमयाच केली! अशी प्रतिज्ञापत्रे आम्ही करतो' म्हणत अनेक सूज्ञ तरुण पुढे आले. दिव्याने दिवा लागत त्यांची मालिकाच तयार होत राहिली. अशा अनेक दीपमालांची आज आपल्या देशाला गरज आहे. आता एकविसाव्या शतकात ज्ञान-विज्ञानाचे दीप प्रकाशत असतानाही काही बाबतीत 'अंधार फार झाला', अशीच स्थिती अजूनही आपल्याकडे आहे!

आता स्त्रिया शिकून अर्थार्जन करू लागल्याने आत्मनिर्भरही होत आहेत. सर्व क्षेत्रांत त्या समर्थपणे वावरत आहेत. मात्र, समाजाचा त्यांच्या विषयीचा दृष्टिकोन फारसा बदललेला नाही. येथे, अलीकडेच घडलेल्या एका प्रसंगाचा उल्लेख करावासा वाटतो-

आमच्या परिचितांपैकी एका घरचा लग्नसोहळा. वधूची आई काही वर्षांपूर्वी निर्वतलेली. वधूच्या वडिलांनी दुसरं लग्न केलं, ते एका विधवेशी. हे लग्न अर्थातच कायदेशीर होतं. यजमान (वधूपिता), लग्नातले धार्मिक विधी आपल्या या द्वितीय पत्नीसह करीत होते. तेव्हा बरपक्षाकडील उपस्थितांपैकी काहींनी त्याला विरोध दर्शवला. त्यामध्ये स्त्री-पुरुष दोन्ही होते. त्यांचं म्हणणं, यजमानपत्नी आधी विधवा होती, म्हणून तिला या धार्मिक विधीत सहभागी होता येणार नाही. थोडी वादावादी झाली, मात्र, यजमान आपल्या मताशी ठाम राहिले. बराच्या आई-वडिलांनीही समजूतदारपणा दाखवला आणि पुढचे विधी नीट पार पडले.

कायदेशीर पुनर्विवाह केल्याने यजमानपत्नीचं वैधव्य जाऊन ती सधवा झाली, पण काही संकुचित विचारांच्या लोकांच्या मनातून मात्र तिचं आधीचं वैधव्य गेलं नाही! म्हणूनच वाटतं, एखाद्या गोष्टीला कायद्यानं मान्यता मिळाली, तरी लोकांनी सुज्ञपणे त्यावर विचार करून आपलं मन-मतपरिवर्तन करणं गरजेचं आहे. विधवा स्त्रीला धार्मिक विधींचा अधिकार नाकारला जातो तेव्हा वाटतं, खरंच, नवरा हयात नसलेली स्त्री एवढी अमंगळ, अपात्र ठरू शकते? का? एकीकडे तर आपल्या संस्कृतीने तिला देवीचा, गृहलक्ष्मीचा मान दिलेला आहे!

लग्नाला जेमतेम वर्ष-दोन वर्षे झालेल्या, पंचविशीतल्या मुलीचा नवरा काही कारणाने दगावतो, तेव्हा तिचं कुंकू पुसताना तिनं फोडलेला हंबरडा फत्तरालाही पाझर फुटावा असाच असतो! तरीही संस्कृतीच्या नावाखाली ते क्रूर कर्मकांड निष्ठुरपणे उरकलं जातं! तेव्हा त्या कोवळ्या मुलीच्या मनाच्या चिंध्यांना कोण आणि कसे टाके घालणार? संस्कृतीची स्तुतिस्तोत्रे गाताना तिच्यातल्या अशा क्रूर, अमंगळ प्रथांचा त्याग करायलाच हवा. त्यासाठी हेरवाड आणि करमाळा येथे

प्रज्वलित झालेल्या दीपांचे सदैव स्मरण हवे.

अलीकडे काही स्त्रिया पतिनिधनानंतर कुंकू, मंगळसूत्र इ. उतरवीत नाहीत. त्यासंबंधी एक बाई म्हणाल्या होत्या, ''माझे पती गेले तरी त्यांचं नाव मी अजूनही माझ्या नावापुढे लावते. अजूनही माझी ओळख त्यांची पत्नी अशी आहे. त्यांच्या पेन्शनवर माझा चरितार्थ चालतो; तर मग त्यांच्या नावाचं कुंकू मी का पुसावं, मंगळसूत्र का काढावं?'' हे सांगताना त्या आतून गलबलून आल्या होत्या. मग पुढे त्या म्हणाल्या,

''बाई, तुम्हाला आणखी एक अगदी मनातलं सांगते. मी बाहेर कामाला जाते. तेव्हा हे कुंकू, मंगळसूत्र मला माझं संरक्षण वाटतं! कपाळी कुंकू नाही, गळ्यात मंगळसूत्र नाही, म्हणजे हिचा कोणी त्राता, वाली नाही; अशीच बाईची ओळख राहते. मग तिच्याकडे बघण्याची लोकांची नजरच बदलते!'' अगदी साधा, सरळ आणि कोणाही सहृदय आणि सुज्ञ माणसाला पटावा, असाच हा विचार. पती हयात नसल्याची खूण बाईनं अंगावर बागवायलाच हवी? मग एखादा विधुर, त्याची पत्नी जिवंत नसल्याची कोणतीच निशाणी का धारण करीत नाही? स्त्रियांच्या नावामागे कुमारी, सौभाग्यवती, श्रीमती अशा उपाधी लावण्याची वस्तुतः काही गरज आहे?

आपला देश स्वतंत्र झाला आणि स्त्रीपुरुष या दोहोंनाही कायद्याने समान अधिकार प्राप्त झाले; तरी घरात, समाजात आणि लोकांच्या नजरेत स्त्री अजूनही दुय्यम राहिली आहे. विधवांच्या केवळ सौभाग्यलेण्यांची जपणूक एवढंच पुरेसं नाही. त्यांच्या सन्मानाने जगण्याचा हक्क मान्य करताना त्यांना कायद्याचं संरक्षणही मिळालं पाहिजे, काही सोयी-सुविधाही मिळायला हव्यात. त्यासाठी काही सुजाण कार्यकर्ते पुढे येत आहेत. त्यांनी 'कोरोना' काळात वैधव्य आलेल्या स्त्रियांसाठी 'एकल महिला पुनर्वसन समिती'ची स्थापना केली, ही अत्यंत योग्य गोष्ट आहे. त्यांच्याच प्रयत्नामुळे शासनानेही तालुकास्तरावर 'मिशन वात्सल्य समिती' तयार केल्या. विधवांना घरे, रोजगार आणि त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी साहाय्य मिळावं, असा त्यांचा उद्देश होता. परंतु 'कोरोना'ची साथ ओसरताच त्या समित्यांचं कामही मंदावल्याचं दिसून येतं.

विधवांच्या सन्मानार्थ सरकारने कायदा करावा, अशीही मागणी आता सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत. विधवांचा सन्मान आणि स्त्रीमुक्ती या दृष्टीने टाकलेले ते महत्त्वाचे पाऊल आहे, असे म्हणता येईल. असा कायदा केला जावा म्हणून सर्व स्त्रियांनी पुढे येण्याची गरज आहे. संघटितपणे प्रयत्न करीत त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा कस लावायला हवा.

येथे बहिणाबाईंचे बोल मोलाचे वाटतात – *'मसि कागज छुओ नहीं'* अशा बहिणाबाई, पण विचारवंत आणि प्रतिभावंत कवयित्री. रोजच्या प्रपंचातच त्यांना जगण्याचं सार गवसलेलं. म्हणूनच त्यांची गाणी मराठी भाषेची अक्षरलेणी ठरली. तरुण वयातच त्या विधवा झाल्या होत्या. त्यांचं सांत्वन करायला बायका घरी आल्या, तेव्हा बहिणाबाई म्हणाल्या–

*नका करू आया, बाया, नका करू माही कीव ।*
*झालं माहं समाधान, आता माहा मले जीव ।।*

आया–बहिणींनो, माझी कीव नका करू. मी आता सावरले आहे. आता माझं कर्तृत्व आणि मी!

स्वतःला समजावताना त्या म्हणतात–

*हास हास माझ्या जीवा, अरे संसारात हास ।*
*इडा–पीडा संकटाच्या, तोंडावऱ्हे कायं(काळं) फास ।।*

एक निरक्षर, ग्रामीण स्त्री; पण जीवनाची थोर भाष्यकार. शंभर वर्षांपूर्वीचं तिचं हे 'हिरिताचं देनं' आजच्या शिकल्या–सवरल्या स्त्रियांनाही जगण्याचं आणि लढण्याचं बळ देणारं आहे.

**– विद्या प्रभू**
भ्रमणध्वनी : ९५०३३६३९२१

लोकमान्य टिळक म्हणायचे, मी नरकातसुद्धा उत्तम पुस्तकांचं स्वागत करेन. कारण नरकाचा स्वर्ग करण्याची ताकद पुस्तकांमध्येच असते.

---

प्रसिद्ध विचारवंत जॉन रास्किन म्हणायचे, पुस्तक नसलेलं घर हे खिडक्या नसलेल्या खोलीप्रमाणे असते.

---

पुस्तक म्हणजे अनेक पानांचा संग्रह. पण ह्या पानांमध्ये माणसाचं आयुष्य घडवण्याची ताकद असते.

## ती समाजातील एक स्त्री

आई हा शब्द ऐकताच येते माहेरची आठवण
काय सांगून करावे तिचे सांत्वन
ती सागंत होती मला
तू शिक, तू लढ
पण तिला कसं सांगणार आता
कलियुगातही होतो या सीतेचाच छळ
द्यावी लागते अग्निपरीक्षा
चारित्र्य सिद्ध करण्यासाठी
सीतेसाठी राम लढला होता रावणाशी
कलियुगातीलही राम लढतोय समाजाशी
कुठे चुकली होती ती
कुठे गुरफटली होती ती
या समाजाने जगणं मुश्कील केलं होतं तिचं
जन्माला येणं हीच चूक झाली की तिची
आता शब्द... पुढे वाक्य आठवेना
आठवणीतही काही सुचेना
आज व्यथा मांडली आहे तिची
तरी कोणालाही तिची दया का येईना...
तिची दया का येईना...

– श्रद्धा गायकवाड
भ्रमणध्वनी : ९२२५५३३०३१

## अन्न येथे जो पिकवतो

अन्न येथे जो पिकवतो
आत्महत्या तोच करतो

श्वान येथे पीठ खातो
आंधळा अन् दळत बसतो

बांधतो जो भव्य इमले
छप्पराविण तोच जगतो

ठेवतो विश्वास ज्यावर
ऐनवेळी तोच पळतो

कोण काही बोलले की
का जनांचा तोल ढळतो

जो स्वतःला खोल खणतो
उंच येथे तोच चढतो

शब्द एखादाच जातो
काळजाला तोच डसतो

विठ्ठलाची प्रीत भारी
तो जनीचे दळण दळतो

– अशोक गुप्ते
भ्रमणध्वनी : ८२९११६२५७६

## मी रोबट नाचवला जातो

मी म्हणजे चालताबोलता रोबोट झालोय
परंपरा, यंत्रणा, संस्कृती, संस्कार,
रीतिभाती, ऑफिस, सरकारी नियम...
एका प्रोग्रॅममधून दुसऱ्या...
कळत नाही प्रत्येक ठिकाणी
चौकटीतच नाचवला जातो...

मी अंधाऱ्या गुहेत खाद्य शोधात निघालेला उंदीर
चौकटीतील भिंतीवर डोके आपटून धावत असतो
मोकळा श्वास घेऊन जगता येत नाही
रिमोट मधून सारेच फिरवत असतात...
प्रत्येकजण त्यांचा मतलब साधण्यासाठी कमांड देतो...

'नाही'ची दरी पार करता येत नाही, उडी मारता येत नाही
जगण्यासाठी स्वत्व सोडून चावी दिलेल्या खेळण्यासारखा
घाण्याला जुंपलेल्या बैलासारखा फिरत राहतो
रात्रीचा दिवस... अन् दिवसाची रात्र
ध्येय ठरवून सुद्धा
वावटळीत अडकत... फिरत... अध्येय होतो...

टाळी वाजवा वेळेला सांगितले...
वाजवली टाळी... काय होते पाहू म्हटले
टाळी वाजवत फिरलो भाकरी काही मिळत नाही...
महागाईच्या चटक्या शिवाय हाती काही लागत नाही
लोक मात्र पानाची पिचकारी थुंकून
हसून कोण किन्नर आला... भेदक नजर
दोघांत इंद्रिया शिवाय फरक काही राहिला नाही
माझ्या पाठीवर बसलेला हप्त्यांचा वेताळ आठवण देत असतो...

पैसे मात्र कमांड देणाऱ्या हाती...
इतरांची होते आशेने माती
त्यांनी सांगितले वाजवा थाळी रात्री बाहेर येऊन
जोशात वाजवली थाळी
वाटले सुटेल ग्रहण... पुढे रात्र शांत ढेकर देईल
सकाळी दुधवाला बिल बाकी दाखवत दारात उभा राहतो...

भरडले गेलो पण भेगा पडलेल्या
जमिनीत भरड धान्य आले नाही
कोसभर दूरवरून पाणी आणताना पायाला भेगा पडल्या
चपलेचा अंगठा तुटला खिशात हात घातला
आभाळ फाटलेल्या खिशात... ठिगळ कसे मारायचे विचारात
अनवाणी पाय गुपचाप चालत राहिले
पायातले रक्त पिऊन जमिनीतले, गवतावरचे
किडे मात्र तृप्त होत ढेकर देते झाले...
जिवंत चालतेबोलते किडे बिचकत त्यांचे अंगठे पाहत होतो...

त्यांनी सांगितले दीप लावून आरती ओवाळा
वेड्या श्रद्धेने घरातील सर्व ७५ दिव्यांच्या आरतीचे ताट घेऊन आले
तेलाचे दर चढलेले होते
घराघरातील विद्युतभाराने दिवे गेलेलेच होते
झोपडीत उजेड यावा म्हणून आकडा टाकण्यास जावे तर
तारेजवळ चढून जाण्याची ना उंची होती ना बळ
दिव्यांच्या तेजात 'नमोःशिवाय' प्रतिमा होती तशीच होती
निर्विकार चेहरा
तुझा तूच शिल्पकार आहेस... मी तुला घोषणा दिली
अंगात बळ यावे म्हणून... मिळवायचे तुलाच आहे
मी शेवटी ओंजळीतील हस्तरेषा बघत असतो...

**– अरविंद बुधकर**
भ्रमणध्वनी : ८६०५८९१०१९

## मोरपैठणी

पैठणीतल्या रंगांना
भुलला मयूर बाई
चाळ–बिल्लोर नादाने
त्याची कांती लाही लाही

लांडोरीची आस थोर
पैठणीची मोडे घडी
जरतार बंधनाला
झुगारून नाचे जोडी

ज्याने विणला मयूर
त्याला वश केकावली
नववधूची पैठणी
मिरविण्या आसुसली

नको वेचू मोरपिसे,
पै–पैठणीचे स्पंदने
विणकार विश्वकर्मा
मोरपंखात चांदणे

नेसून जा पैठणीला
तुऱ्याची शान वाढेल
यथावकाश लांडोर
मोराची दृष्ट काढेल

**– प्रशांत पनवेलकर**
भ्रमणध्वनी : ९९७०१०७५९१

# पुस्तक परिचय

## चंद्रशेखर गोखले




### संवादातून...!

लेखिका-कवयित्री-समीक्षक असलेल्या प्रतिभा सराफ यांनी आतापर्यंत विविध वाङ्मयप्रकार म्हणजेच कथा, कादंबरी, गझल, ललित इ. यशस्वीपणे हाताळलेले आहेत. 'संवादातून...!' त्यांचे व्यक्तिचित्रणाचे पंधरावे पुस्तक आहे. प्रतिभा सराफ मूलतः भौतिकशास्त्राच्या प्राध्यापिका होत्या. यामुळेच असेल कदाचित, त्यांना माणसे जाणून घेण्याची आणि जाणून घेऊन त्याचे विश्लेषण करायची स्वभावतः आवड आहे. या पुस्तकाद्वारे त्यांनी विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या वेळोवेळी घेतलेल्या मुलाखतीतून त्यांचे जीवनदर्शन थोडक्यात आपल्यासमोर अलगदपणे उलगडण्याचा स्तुत्य असा प्रयत्न केलेला आहे.

ही व्यक्तिमत्त्वे साधीसुधी नाहीत तर उत्तुंग आहेत आणि उत्तुंग असली तरी साधेपणाने समाजात वावरणारी आहेत. अनेक वेळा, अनेक कार्यक्रमांतून तुम्ही त्यांना ऐकले असेल, त्यांच्याबद्दल वाचले असेल किंवा त्यांनी लिहिलेले थेट वाचले असेल; पण या पुस्तकातून ते अधिक मोकळेपणाने तुम्हाला भेटतात आणि भावतातही! याचे कारण असे की प्रतिभाताईंनी त्यांच्याशी अत्यंत सहज संवाद साधला आहे. जणूकाही आपणच त्यांच्याशी थेट बोलत आहोत, इतक्या साधेपणाने आपल्या मनातले प्रश्न विचारले आहेत.

या 'संवादातून' आपल्याला ख्यातनाम मनोविकारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी भेटतात. कोरोनाकाळात सुरुवातीला त्यांनाही नकारात्मकता आली होती आणि त्यांचा मुलगा कबीर यांनी त्यातून कसा मार्ग काढला, हे वाचताना गंमत वाटली. त्यानंतर त्यांनी आधीपेक्षा अधिक जोमाने आणि ऊर्जेने लोकांचे नैराश्य घालवण्यासाठी जे काम केले, त्याला तोड नाही.

हे पुस्तक सगळ्या वयोगटातील माणसांनीच नव्हे तर विविध क्षेत्रांतील वाचकांनी वाचावे असे आहे. यात तुम्हाला पर्यटन क्षेत्रातील ईशा टूर्सचे सर्वेसर्वा आत्माराम परब

भेटतात. कस्टमची स्थिरस्थावर नोकरी सोडून ते टूर ऑपरेटरचा व्यवसाय सुरू करतात, तो केवळ भटकंतीची आवड म्हणून आणि आता ते यशस्वी टूर्स ऑपरेटर म्हणून नावारूपाला येतात, हे फारच प्रेरणादायी वाटते. विश्वकोशाच्या अध्यक्ष म्हणून काम पाहिलेल्या बालसाहित्यकार डॉ. विजया वाड यांच्याशी मारलेल्या गप्पांतून खूप काही शिकण्यासारखे आहे. अजातशत्रू कवी शिवाजी गावडे आपल्याला इथे नव्या रूपात भेटतो. त्याचे सामाजिक आणि सांस्कृतिक विश्वातील योगदान वाचून अचंबित व्हायला होते. नाट्यतपस्वी प्रेमानंद गज्वी, आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भौतिकशास्त्रज्ञ डॉ. रोहिणी गोडबोले, रहस्य कथाकार परंतु स्वभावाने सरळ आणि सालस असलेले सुनील जावळे, स्त्री-मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्या अश्विनी रानडे, भारतीय प्रशासकीय सेवेत असूनही संवेदनशीलता जपलेले ख्यातनाम लेखक समीक्षक मराठी आणि भाषेच्या आग्रहासाठी लढणारे डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, संगीतकार अतुल दिवे अशा व्यक्तिमत्त्वांची थेट-भेट या पुस्तकातून होते. आपल्या सर्वांचा लाडका सुपरस्टार आमीर खान यांची मराठी शिकण्याची धडपड आणि तळमळ आणि मराठी भाषेवर त्यांचे असणारे प्रेम, त्यांना मराठी शिकवणारे प्रगाढ पंडित भाषातज्ज्ञ सुहास लिमये यांच्याबद्दल वाटणारा आदर प्रतिभाताईंनी या मुलाखतीतून व्यक्त केला आहे.

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रतिभा सराफ यांनी या महनीय व्यक्तींशी साधलेला सहज संवाद, जो सहज असला तरी गंभीर आहे, गंभीर असला तरी कंटाळवाणा नाही. तुम्ही वाचत जाता आणि पुस्तक कधी संपते, तेच कळत नाही. या व्यक्तिमत्त्वांच्या वाचनातून आपण निश्चितपणे प्रगल्भ होत जाऊ, याबद्दल खात्री वाटते.

**संवादातून...!** - प्रतिभा सराफ
पृष्ठे - १७०; किंमत - रु. ३००/-
प्रकाशक - अनघा प्रकाशन




## आउसी गोस्ट

बोलीभाषा टिकल्या पाहिजेत आणि टिकवल्या पाहिजेत, या दृष्टीने गजानन म्हात्रे यांनी 'आउसी गोस्ट' हा आवर्जून लिहिलेला कथासंग्रह.

खाडीतील, नदीतील मासेमारी करून ते विकणे, भातशेती करणे आणि मिठागरे सांभाळणं, हा आगरी समाजाच्या लोकांचा पोटापाण्याचा व्यवसाय. वृत्तीने राकट वाटणारे, पण मनाने दिलदार आणि कमालीची स्वाभिमानी

असणारी ही माणसे. शिक्षणाचा प्रसार काहीसा उशिराने यांच्यापर्यंत पोचला असावा. हळूहळू ठाणे, डोंबिवली आणि नवी मुंबईची निर्मिती झाली तेव्हा हा समाज विस्थापित होत गेला. गावांच्या विकासामुळे त्यांच्या भाषेवर, संस्कृतीवर बाहेरून आलेल्या लोकांचे आक्रमण होत गेले. नवीन वस्तीत करणाऱ्या नागरी समाजाला इथल्या मूळ आगरी समाजाच्या विस्थापनेचे दुःख काय कळणार...? किंबहुना त्या नागर समाजाला त्याच्या दुःखाचे काही देणेघेणेही नव्हते.

या मूळ आगरी समाजातील काही सुशिक्षित लोकांनी या विस्थापनेच्या दुःखाला आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी लढे दिले, आंदोलने केली. त्याचा उपयोग त्यांना न्याय मिळण्यासाठी नक्कीच झाला. त्यानंतर त्यांच्या जमिनीला भरपूर भाव सरकार देऊ लागले. अचानक या आगरी समाजाच्या हाती भरपूर पैसा येऊ लागला. त्याची मूळ कौलारू घरे जाऊन त्या जागी आता मोठे मोठे बंगले होऊ लागले. या समाजाचे व्यवसाय बदलत गेले. मासेमारी कोणी करेनासे झाले. बैलगाड्या जाऊन घरापाशी चारचाकी गाड्या दिसू लागल्या. शेत-जमिनीचे प्लॉट पडून ही मंडळी विकू लागली. त्यामुळे शेती जाऊ लागली. मिठागरे संपून गेली. या सगळ्या बदलाची कथा म्हणजे गजानन म्हात्रे यांचा आगरी भाषेतील कथासंग्रह 'आउसी गोस्ट'. या पुस्तकाची डॉ. लबडे यांनी लिहिलेली प्रस्तावनाच खूप बोलकी आहे. प्रस्तावनाही एकप्रकारे पुस्तकाचे परीक्षणच असते. पण हे पुस्तक का वाचावे, हे मी लिहीत आहे. गजानन म्हात्रे हे स्वतः आगरी असल्याने त्यांनी हे जीवन अनुभवले आहे. या आपल्या आगरी संस्कृतीचे दैनंदिन जगणेमरणे, काबाडकष्ट, संघर्ष, सण, उत्सव, व्यवसाय सारे काही ते जगले आहेत. ही त्यांची भाषा आहे. त्यातील गोडवा, रोखठोकपणा, त्यातली गाणी, नाच, समाजातील समजुती, श्रद्धा, परंपरा, चालीरीती, स्वभावधर्म हे सगळे सहजीव त्यांनी अनुभवलेच नव्हे तर ते जगले आहेत. म्हणून त्यांच्या लेखणीत सच्चेपणा आहे. ह्या लघुकथा म्हणजे आगरी समाजजीवनाचा लघुपट आहे. त्यांची आगरी भाषा समजायला फारशी अवघड नाही. त्यांनी लघुकथांच्या खाली काही नवीन वाटणाऱ्या शब्दांचे अर्थही दिले आहेत. ते कथा आणि भाषा समजायला मदत करतात. या कथा गमतीशीर आहेत, तशाच चटका लावणाऱ्याही आहेत. काही कथा मुळातून उन्मळून जात असलेल्या आगर संस्कृतीवर परखड भाष्य करतात. आगरी समाजच पैशाच्या लोभाने आपली भाषा, संस्कृती, साधेपणा आणि सहजीवन नष्ट करीत आहे हे चित्रित करणारी खाजन म्हावरा, इवानातल या लघुकथा वाचनीय आहेत. मला शिकावाचा नाय, उवा खानारा माकड, डिगरी, बंदूक हायस्कूल या कथा फार गमतीशीर आहेत. या कथांतून त्यांची निरागसता

दिसून येते. या समाजाला जागृत करण्याचे, सुशिक्षित करण्याचे काम, याच समाजातून पुढे आलेले लोकनेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांनी केले. दिबांचा सल्ला ही लघुकथा आगरी समाजाला प्रस्थापित समाज त्यांच्या भोळ्यासमजुतीचा फायदा घेऊन कसा लुटत होता, हे वेधक चित्र डोळ्यांसमोर येते. या सगळ्याच कथा लघू आहेत. बोलीभाषेत असल्यातरी समजण्यासारख्या आहेत. भेदक वास्तव दाखवणाऱ्या आहेत, तशाच मानवी स्वभाव दर्शन घडविणाऱ्या मेस्त्री सारख्या कथा आहेत. बदलती समाजव्यवस्था, कायदे, नियम यामुळे रूढी, परंपरा यांना खीळ बसली. यामुळे विदीर्ण झालेल्या शेटची 'होलीसाठी' ही कथा आपल्याला अंतर्मुख करते. एकंदरीत आगरी बोलीभाषेला आणि आगरी समाजाला मराठी साहित्य विश्वाशी नाळ जोडणारा असा हा विलक्षण आणि वाचनीय लघुकथा संग्रह लिहिल्याबद्दल गजानन यांचे अभिनंदन. जरूर वाचा.

**आउसी गोस्ट** – गजानन म्हात्रे
पृष्ठे – १८०; किंमत – रु. २००/-
प्रकाशक – रंगधनू प्रकाशन




## एमिली डिकिन्सनच्या कविता

एमिली डिकिन्सन यांची कविता ही जीवनाच्या अनुभवावर केलेले प्रतिक्रियात्मक भाष्य नसून त्यांच्या एकांताच्या तपश्चर्येतून त्यांना गवसलेली सत्याच्या जवळ जाणारी गाथा आहे. जेव्हा कवितेला आत्म्याचा स्पर्श होतो, तेव्हा कविता ही 'ओवी' होते. एमिली यांची कविता ही आत्मानुभवाची ओवी आहे. एमिली डिकिन्सन यांच्या कवितांचा अनुवाद केला आहे जीवन आनंदगावकर यांनी. मूळ इंग्रजी कविता मी वाचल्या नाहीत. थेट अनुवाद वाचला तरीही काही फरक पडला नाही. मी अनेक अनुवादित कविता वाचल्या आहेत आणि वाचताना जाणवत राहतं ह्या अनुवादित कविता आहेत. एक प्रकारची कृत्रिमता त्यात जाणवत राहते. शरीर मिळालंय; पण आत्मा हरवल्यासारखी साहित्यकृती वाटते. पण ह्या अनुवादित कविता तशा अजिबात वाटत नाहीत. एमिली डिकिन्सन यांनी मराठीत कविता लिहिली असती तर अशीच लिहिली असती असे वाटते. अनुवादातली कृत्रिमता कुठेच जाणवत नाही. अचूक शब्द निवड आणि मूळ कविता वाटावी इतका जिवंतपणा या अनुवादित रचनेत आहे. एमिली डिकिन्सन या अमेरिकन कवयित्री, ज्यांचा जन्म १० डिसेंबर आणि १८३० सालातला. या कविता १८५०

ते १८९० या काळातल्या. आयुष्याची अनेक वर्षे त्यांनी एकांतात घालवली. या काळात त्या स्वतःशी व्यक्त होत राहिल्या, त्या कवितांच्या माध्यमातून! त्यांनी कधीही आपल्या कविता प्रसिद्धीसाठी दिल्या नाहीत. कारण हा त्यांचा स्वतःशी असलेला अगदी वैयक्तिक संवाद होता. हा एक आत्मशोध आहे. १८००च्या वर त्यांच्या रचना आहेत. त्यांच्या पश्चात त्यांच्या बहिणीने त्यांच्या कविता प्रसिद्ध केल्या तेव्हा तिच्या कवितेने वाचकांना, साहित्यकारांना, समीक्षकांना विस्मयचकित करून टाकले. एमिलीची कविता एक गूढ गारूड आहे. तिची कविता तुम्हाला केवळ अंतर्मुख करत नाहीत, तर आत्मभान येण्याला मदत करतात. त्याची एक-एक ओळ तुम्हाला विचार करायला भाग पडते. या ओळी बघा-

*नशिबाचे देखील स्वतःचे दैव असते...*
*ते सुनिश्चित असतं...*
*कधी कधी ते पार बदलतंही...*
*ते बदललं की आत्म्याला एकटेपण येतं...*

या कवितेत एक आंतरिक रेटा जाणवतो. मनस्वी चिंतनशीलता जाणवते.

किंवा या ओळी वाचा-

श्रीकृष्णाच्या विश्वरूप दर्शनाने भयभीत झालेल्या अर्जुनाच्या मनःस्थितीची आठवण करून देतात.

*सत्य हळूहळू प्रकाशमान होत असते...*
*अन्यथा, त्याच्या थेट दर्शनाने....*
*लोक ठार आंधळे होऊन जातील.*

म्हणून अंतरंगातील सत्य जाणून घ्यायचे असेल, तर आधी आपल्याला एक 'संजय' दृष्टी प्राप्त करून घ्यायला हवी. अन्यथा, आपण आपलाच चेहरा बघून भयभीत होऊ. ही तपश्चर्या एमिलीने केली. हा एक जीवन-मृत्यू, द्वेष, मत्सर, धर्म, देव, स्वर्ग-नरक, करुणा, दुःख, आनंद, सत्य-असत्य या सगळ्याचा आंतरिक संघर्ष आहे. हे वैचारिक सागरमंथन तिने एकांतात अनुभवलं. त्यातून जी रत्ने बाहेर आली, ती रत्ने म्हणजे एमिली डिकिन्सनच्या कविता. त्या आजही ताज्या टवटवीत वाटतात. कारण त्याला सत्यानुभूतीचा परीसस्पर्श झाला आहे म्हणून! त्याचा तितकाच जीवंत अनुभव देणारा अनुवाद जीवन आनंदगावकर यांनी 'एमिली

डिकिन्सनच्या कविता' या नावाने केला आहे. या कविता नक्कीच तुम्हाला आनंदाच्या गावी घेऊन जातील.

**एमिली डिकिन्सनच्या कविता** – जीवन आनंदगावकर
पृष्ठे – २८८; किंमत – रु. २५०/–
प्रकाशक – आयांश प्रकाशन



## उद्याचा दहशतगर्द अंधार

कवयित्री कविता मोरवणकर यांचा प्रभा प्रकाशन, कणकवली यांनी प्रकाशित केलेला अत्यंत ताजा 'उद्याचा दहशतगर्द अंधार' हा कवितासंग्रह वाचला आणि त्यावर लिहावे असे मनापासून वाटले. या कविता आपल्याला खडबडून जागे करतात. आतून–बाहेरून तुम्हाला धक्का देऊन उठविण्याचा प्रयत्न करतात. रोजच्या जगण्यात मोकळेपणा राहिला नाही. साधे बोलताना शब्द जपून वापरावे लागतात. कुणाच्या भावना कुठल्या गोष्टीने कधी दुखावल्या जातील, अशी अस्वस्थ करणारी एक अनामिक भीती, एक दहशत आपल्याला सतत वाटत असते. या भीतीनेच की काय कोणास ठाऊक, आपण सगळे मात्र सारे काही अवतीभोवती अलबेल आहे असा आव आणून वागत असतो. कविता मोरवणकरांच्या शब्दात सांगायचे तर –

*इथल्या कुठल्याच*
*वेदनादायी वाटेवरून*
*भिरभिरत नाही*
*माझी शोधक नजर*
*उसळत नाही*
*माझ्या रक्तातील*
*एकही थेंब*
*खूप दिवसांपासून*
*मी कोमात असल्याचा*
*भास होतोय मला*

पहिल्या वीसएक कविता मी मोठ्याने वाचल्या. त्याचे अभिवाचन व्हावे

अशाच आहेत. कारण त्या झोपलेल्या समाजाला जागृत करून पेटून उठावे म्हणून लिहिल्या आहेत असे मी मानतो. यांचे जाहीर अभिवाचन करावे. समाजाला जागृत करण्यासाठी लिहिलेले हे मुक्त छंदातील पोवाडे आहेत.

काही मनाने वाचण्यासारख्या आहेत. त्या वाचल्या की अंतःकरण भरून येते आणि ढवळूनही निघते. डोळे ओले करणाऱ्या कविता आहेत. मनाला साद घालणाऱ्या आहेत. या समाजात बाईला सोसावे लागते तेव्हा हृदय फोडून शब्दांना व्यक्त होण्यासाठी बाहेर यावे लागते. रक्तबंबाळ होऊन सृजन करणे हे बायकांचं जन्मजात दुःख असावे असे कधी कधी वाटते. निसर्गनिही बाईला सोडले नाही. ‘देह भरतीचा आवेग’ ही त्या दृष्टीने वाचण्यासारखी कविता आहे. ‘लॉकडाउनच्या कविता’ या भागातील कविताही फार अप्रतिम आहेत. एका कवितेत कवयित्री लिहितात–

पुढे मागे सुरळीत होईल सारे
पण इतके दिवस
विंचवासारखा डसणारा
हा शांततेचा भयाण आवाज
आता सवयीचा झालाय,
त्याचे काय...

या काळात अशा कवितेची गरज आहे. धोका पत्करला आहे. कवयित्रीची वृत्ती संवेदनशील आहे आणि बंडखोरही. व्यवस्थेला हे सहन नाही झाले तर असे लेखन करणाऱ्या लेखकांनाच दहशतवादी, देशद्रोही आणि नक्षलवादी ठरवतील असा भयंकर काळ आहे आजचा. या काळात हे टोकदार धाडस कविता मोरवणकरांनी केले आहे हे कौतुकास्पद आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

एक बंडखोर कवितासंग्रह. जरूर वाचा.

**उद्याचा दहशतगर्द अंधार** – कविता मोरवणकर
पृष्ठे – ८०; किंमत – रु. १६०/–
प्रकाशक – प्रभा प्रकाशन

कार्यवृत्तांत

# साहित्य शाखा

आत्तापर्यंत ठाणे, डोंबिवली, वसई इ. मुंबई लगतच्या ठिकाणी मुंबई मराठी साहित्य संघाने 'महानगर साहित्य संमेलने' घडवून आणली आहेत. या वर्षीचे आकर्षण म्हणजे संपूर्ण संमेलन हे महानगरी मुंबई, तसेच मुंबईची जीवनरेखा असलेल्या रेल्वेला समर्पित होते. डॉ. अ.ना. भालेराव नाट्यगृह, मुंबई मराठी साहित्य संघ येथील व्यासपीठावर रेल्वेच्या डब्याचे नेपथ्य साकारले होते. 'मुंबई मराठी साहित्य संघ' आणि 'स्वामीराज प्रकाशन' यांच्या संयुक्त विद्यमाने अठ्ठेचाळिसावे एक दिवसीय संमेलन ३१ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाले. यानिमित्ताने आशिया खंडातील पहिली रेल्वेचालक सुरेखा यादव यांचा सत्कार करण्यात आला.

'हास्यजत्रा फेम' प्रसिद्ध दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांनी अशा संमेलनांमधून साहित्याला तरुणांपर्यंत पोहोचवण्यासाठी वेगळे पर्याय शोधू शकतो का, यावर चिंतन होणे आवश्यक आहे, असे संमेलनाध्यक्ष पदावरून भाष्य केले. संमेलनाचे उद्घाटक राष्ट्रपती शौर्यपदक विजेते विश्वास नांगरे पाटील म्हणाले की नव्वद वर्षांची परंपरा आणि इतिहास 'मुंबई मराठी साहित्य संघा'ला आहे. अनेक दिग्गज मंडळी या व्यासपीठाने तयार केली आहेत. इथे मला बोलावलेत हा मी माझा सन्मान समजतो.

एकंदरीतच संमेलनाध्यक्ष आणि उद्घाटक यांनी 'हास्य' आणि 'शौर्य' या दोन साहित्यातील महत्त्वाच्या घटकांना आपल्या वक्तव्यातून स्पर्श करत योग्य न्याय दिला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी स्वागताध्यक्ष प्रा. उषा तांबे, कार्याध्यक्ष डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष श्री. आनंद बिर्जे, प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव-गांधी यांनी आपल्या छोटेखानी भाषणातून, या कार्यक्रमाविषयी आपापल्या भूमिका मांडल्या; तसेच श्री. रजनीश राणे यांच्या स्वामीराज प्रकाशनच्या वतीने श्रीमती तपस्या नेवे यांनी संस्थेचा आणि एकंदरीत कार्यक्रमाचा आढावा घेतला. साहित्यशाखा कार्यवाह प्रा. प्रतिभा सराफ यांनी उद्घाटनाच्या कार्यक्रमात आभार प्रदर्शन केले.

शाहीर नीलेश जाधव यांच्या मुंबईच्या पोवाड्याने संमेलनाचा प्रारंभ झाला. संकेत तांडेल लिखित 'लोकल' ही एकांकिका सादर झाली. 'आपली मुंबई खरेच बदलली आहे का?' या विषयावरील परिसंवादात महापालिका पुरातत्त्व खात्याचे माजी अधिकारी संजय सावंत आणि ज्येष्ठ अभ्यासक अरुण पुराणिक सहभागी झाले. या दोघांनी एकंदरीतच 'सिनेमा थिएटर'पासून मुंबईचे रूपरंग कसे बदलले,




याविषयी रंजक माहिती दिली. गोविंद नारायण माडगावकर लिखित 'मुंबईचे वर्णन' आणि नितीन साळुंखे लिखित यांच्या 'अज्ञात मुंबई' या पुस्तकातील उताऱ्यांचे अभिवाचन अभिनेता-दिग्दर्शक मंगेश सातपुते आणि अभिनेत्री सुप्रिया विनोद यांनी उत्तम प्रकारे केले. 'मुंबईतील खाद्य संस्कृती' यावर ज्येष्ठ संपादक संजीव साबडे आणि मुंबईतील 'वाचन संस्कृती' यावर ज्येष्ठ संपादक मुकेश माचकर यांचे गप्पाष्टक खासच रंगले. संमेलनाचा समारोप लोकलमधील रिल स्टार सानिका कणसे यांच्या 'रेल्वे भजन' या कार्यक्रमाने झाला, ज्याचा रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवत आनंद घेतला आणि काही भजनांसाठी त्यांना रसिकांकडून 'वन्स मोर'ही मिळाला.

या पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमात श्री. गणेश आचवल यांच्यासहित प्रा. प्रतिभा बिस्वास, नाट्यकर्मी चंद्रशेखर गोखले, श्रीमती मीनाक्षी जयकर, श्रीमती धनश्री



धारप, कवयित्री संगीता अरबुने, गझलकार डॉ. मनोज वराडे, श्रीमती शैला सामंत इत्यादींनी सूत्रसंचालन केले तर संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचे आभार मुंबई मराठी साहित्य संघाच्या उपाध्यक्ष श्रीमती रेखा नार्वेकर यांनी मानले.

ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर, साहित्य संघाचे उपाध्यक्ष आणि ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, श्री. अरुण जोशी, श्रीमती अपर्णा साठे, ज्येष्ठ पत्रकार देवानंद भुवड, मुखपृष्ठकार अनिश दाते, नेपथ्यकार सुनील देवळे, श्री. अशोक परब, नाटककार डॉ. स्मिता दातार, कवी कमलाकर राऊत, जयश्री संगीतराव, हेमांगी नेरकर, पुष्पा कोल्हे, गीतेश शिंदे, दूरदर्शन मालिका लेखक अजितेम जोशी आदी साहित्य, नाट्य, पत्रकारिता आणि कला क्षेत्रातील अनेक मान्यवर कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते. या साहित्य संमेलनाला सर्वांना मुक्त प्रवेश असल्यामुळे मुंबई आणि नजीकच्या शहरातील सर्व साहित्यप्रेमींनी उपस्थिती दर्शवली आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. श्री. भालचंद्र म्हात्रे यांनी उभारलेल्या रेल्वे डब्याच्या नेपथ्याचे विशेष कौतुक झाले. या रेल्वेडब्यात बसून फोटो काढण्याचाही विशेष आनंद रसिकांनी लुटला.

दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी, मुंबई मराठी साहित्य संघ येथे जागतिक मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून 'साहित्यरंग' कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंबई मराठी साहित्य संघाचे कोषाध्यक्ष श्री. आनंद बिर्जे यांनी केले. मुंबई मराठी साहित्य संघाचे मराठी भाषेसाठी असलेले 'योगदान आणि कार्य' याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच विंदा करंदीकर यांच्या अतिशय सुंदर व अर्थपूर्ण कवितेचे प्रभावी सादरीकरण केले. प्रा. प्रतिभा बिस्वास यांनी 'बोलीभाषांचे मराठी भाषेतील महत्त्व' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. 'मराठी भाषा जर देह असेल, तर बोलीभाषा त्याचा आत्मा आहे', असे सांगत त्यांनी बोलीभाषांमुळेच मराठी संस्कृती जतन होते आणि म्हणून या बोलीभाषा जपल्या, जगवल्या आणि बोलल्या पाहिजेत, असे प्रतिपादित केले. नाट्यकर्मी चंद्रशेखर गोखले यांनी 'नटसम्राट' या अजरामर नाटकातील नाट्यस्वगत अत्यंत प्रभावी अभिनयासह सादर करून रसिकांची खास दाद मिळवली. मुंबई मराठी साहित्य संघाच्या साहित्यशाखेच्या कार्यवाह प्रा. प्रतिभा सराफ यांनी 'आजची स्त्रीवादी कविता' या विषयावर भाष्य केले. त्यांनी अंतर्मनाला स्पर्श करणाऱ्या काही निवडक कवयित्रींच्या कविता सादर करून स्त्रीवादी कवितेचा इतिहास आणि वर्तमान उलगडून दाखवले. कवयित्री ज्योती कपिले यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्याचा अभ्यासपूर्ण आढावा घेत त्यांच्या, तसेच स्वत:च्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी मुकुंद टाकसाळे यांच्या विनोदी कथेचे रसपूर्ण कथाकथन करून प्रेक्षकांकडून भरभरून वाहवा मिळवली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अनिता देवधर यांनी केले. विविध साहित्य-प्रकारांच्या सादरीकरणामुळे 'साहित्यरंग' कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे संपन्न झाला.




या कार्यक्रमासाठी समीक्षक शिवाजी गावडे आणि कमलाकर राऊत, कवयित्री पुष्पा कोल्हे, श्रीमती मीनाक्षी जयकर, डॉ. मनोज वराडे, श्री. ओमकार बाकोडे, तसेच साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोरोना काळापासून म्हणजे २०२० सालापासून अमराठी भाषकांना मराठी शिकवण्याचे वर्ग ऑनलाइन पद्धतीने चालत आहेत. यावर्षी हा वर्ग २२ मार्च २०२६ पासून सुरू झाला आहे. दर रविवारी दोन तास, असा तीन महिन्यांचा अभ्यासकाळ आहे. पाच विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत.

२६ एप्रिल २०२६ रोजी मुंबई मराठी साहित्य संघ आणि तमिळ संघम, चेंबूर यांच्या परस्पर सहकार्याने 'सरस्वती विद्यालय', चेंबूर येथे तामिळ व मराठी भाषेचे शिकवणी वर्ग सुरू झाले. या वर्गासाठी सरस्वती विद्यालयाचे ट्रस्टी श्री. राजशेखर यांचे विशेष सहकार्य लाभले. वैष्णवी आहेर या साहाय्यक म्हणून या वर्गांचे काम पाहत आहेत. या वर्गाच्या कार्यवाहीसाठी प्रकल्प प्रमुख प्रा. सुहासिनी कीर्तिकर आणि प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव यांचे मार्गदर्शन लाभले, अशी माहिती या वर्गाच्या शिक्षिका श्रीमती मीनाक्षी जयकर आणि श्रीमती संध्या गोखले यांनी दिली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी 'महाराष्ट्रातील रिक्षा-टॅक्सीवाल्यांनी मराठीत बोलले पाहिजे', अशी भूमिका घेतली, त्यासाठी अमराठी भाषकांना मराठी भाषा शिकवण्यासंबंधी मुंबई मराठी साहित्य संघाकडून पूर्ण सहकार्य करू, असे कार्याध्यक्ष

उज्ज्वला मेहेंदळे यांनी त्यांना सांगितले. २३ एप्रिल २०२६ रोजी मंत्रालयात घेतलेल्या सभेला कार्याध्यक्ष डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, आणि श्रीमती मीनाक्षी जयकर उपस्थित होत्या. त्यांनी रिक्षा-टॅक्सीवाल्यांना संवादात्मक मराठी कसे शिकवता येईल यासंबंधी मते मांडली; तसेच सुलभ अभ्यासक्रम तयार करण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले.

**– प्रा. प्रतिभा सराफ**

कार्यवाह

साहित्यशाखा,

मुंबई मराठी साहित्य संघ

---

**अहवाल**

# संघ मंदिर समिती

संघ मंदिर समितीची दि. १८ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीमधे साहित्य संघाच्या कार्याध्यक्ष डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांनी माहिती दिली की संघ मंदिर समितीचे कार्यवाह श्री. सुभाष भागवत हे वैयक्तिक अडचणींमुळे ६ महिने अनुपस्थित राहणार असल्याने संघ मंदिर समितीचे काम प्रभारी कार्यवाह म्हणून श्री. चंद्रशेखर गोखले पाहतील आणि श्री. अरुण फडके, तसेच श्री. सुनील गोरे त्यांना मदत करतील. त्यानुसार संघ मंदिर समितीचे काम सुरू झाले. दिनांक १८ एप्रिल २०२६ पर्यंत संघ मंदिर समितीने केलेली ठळक कामे खालीलप्रमाणे-

संघ मंदिर इमारतीचा पाचवा मजला म्हणजे पुरंदरे सभागृह गळत आहे. त्याचे काम पावसाळ्यापूर्वी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने असे ठरले की एकूणच संघ इमारत आणि नाट्यगृहाची इमारत यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेऊन मग एकूण काय काय कामे करावी लागतील याची प्राधान्यक्रमाने यादी बनवून कामे करावीत असे ठरले आहे. सदर स्ट्रक्चरल ऑडिटचे काम ते ए.डी. शिंत्रे कन्सल्टंट यांना दिले होते. त्याचा रिपोर्ट आला असून त्याप्रमाणे कामे करण्यासाठी कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत. मे महिन्यात कामे सुरू करून पावसाळ्याआधी कामे पूर्ण केली जातील.

त्याचप्रमाणे इलेक्ट्रिकल ऑडिटही करून घ्यावे असे ठरले. आपली विद्युत उपकरणे, तसेच इलेक्ट्रिक वायरिंग व फिटिंग जुन्या पद्धतीचे असल्याने विद्युत गळती होत आहे. त्याला आळा बसावा म्हणून विद्युत ऑडिटही करून घेतले. इलेक्ट्रिकल ऑडिटचे कंत्राट ओंकार एन्टरप्राएजेस यांना दिले होते, ते त्यांनी पूर्ण करून अहवाल सादर केला आहे. त्याच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे येत्या काळात कामे सुरू होतील.

आपल्या नाट्यगृहाचे जवळजवळ ८ दरवाजे खराब झाले होते. त्यामुळे नाट्यगृहाच्या वातानुकुलित यंत्रणेवर परिणाम होत होता. म्हणून सर्व ९ दरवाजे नवीन केले. नाट्यगृहाच्या महिला व पुरुष प्रसाधनगृहात असलेली सर्व इंडियन टॉयलेटरी बदलून कमोड बसविले. त्यामध्ये एअर फ्रेशनर बसविले. मेकअप रूम मधील वातानुकुलित यंत्रणा दुरुस्त केल्या. संघ इमारतीचे सर्व वातानुकुलित यंत्रांचे सर्व्हिसिंग करून घेतले. इमारतीला पेस्ट कंट्रोल ट्रीटमेंट दिली.

दि. ११ एप्रिल रोजी डॉ. बाळ भालेराव यांच्या अर्धपुतळ्याचा अनावरण सोहळा झाला. त्यानिमित्ताने संघ मंदिर समितीने संघाची ९० वर्षांची वाटचाल दाखवणारे प्रदर्शन उभे केले होते. रसिकांनी त्याला उदंड प्रतिसाद दिला. या सोहळ्याला पानिपतकार विश्वास पाटील यांचा सत्कार पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचा हस्ते करण्यात आला. या सोहळ्याचे देखणे आयोजन आणि संयोजन संघ मंदिर समिती आणि नाट्य शाखा यांनी मिळून केले होते. तसेच साहित्य शाखेचे पदाधिकारी यांनीही सहकार्य केले.

संघ मंदिर समितीच्या कामाला सर्वश्री आनंद बिरजे (कोषाध्यक्ष), अरुण फडके, सुनील गोरे यांनी मोलाचे साहाय्य केले.

प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव गांधी आणि कार्याध्यक्ष डॉ उज्ज्वला मेहेंदळे यांचे मोलाचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत होते.

**– चंद्रशेखर केशव गोखले**
प्रभारी कार्यवाह, संघ मंदिर समिती



अहवाल

# नाट्यशाखा

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी मी नाट्यशाखेचा प्रभारी कार्यवाह म्हणून कार्यभार स्वीकारला. नाट्यशाखेतर्फे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल २०२६ या चार महिन्यांत पुढील उपक्रम राबविण्यात आले.

**नाट्यवाचन**

सुरेश जयराम लिखित, 'कृपया अहेर आणू नये' या नाटकाचे मंगळवार ६ जानेवारी २०२६ रोजी, डॉ. बाळ भालेराव सभागृहात दुपारी ३ ते ६ या वेळेत सुप्रसिद्ध दिग्दर्शक, तसेच साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्री. विजय केंकरे यांनी नाट्यवाचन केले. या प्रसंगी साहित्य संघाचे कार्यकारी मंडळातील सदस्य उपस्थित होते.

**आठवणीतील नाट्यगीते**

डॉ. राजाराम अमृत तथा बाळ भालेराव यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण ११ एप्रिल २०२६ रोजी त्यांच्या जन्मदिनी करण्यात आले.

यानिमित्ताने नाट्यशाखा विभागातर्फे त्याच दिवशी संध्याकाळी ७.०० ते ९.१५ या वेळात साहित्य संघाच्या नाट्यगृहात 'आठवणीतील नाट्यगीते' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात श्री. ज्ञानेश पेंढारकर, सौ. निलाक्षी पेंढारकर, सौ. शुचिता आठलेकर, श्री. धवल भागवत या गायक कलाकारांनी नाट्यगीते सादर केली.

ऑर्गन – श्री. मकरंद कुंडले, तबला – श्री.धनंजय पुराणिक आणि व्हायोलिन श्री. राजेंद्र भावे यांनी साथ केली. कार्यक्रमाचे संहितालेखन व सूत्रसंचालन सौ. माधुरी जोग यांनी केले.

**– प्रा. डॉ. मिलिंद जोग**

प्रभारी नाट्यशाखा कार्यवाह



# मुंबई मराठी साहित्य संघ

## डॉ. अ.ना. भालेराव मार्ग, गिरगांव, मुंबई ४०० ००४


### नियामक मंडळ २०२५-२०३०

**विश्वस्त**

श्री. अभिजित गजेंद्रगडकर • श्री. अभय भालेराव • श्री. उदय कुलकर्णी

**अध्यक्ष**

प्रा. उषा तांबे

**उपाध्यक्ष**

डॉ. अनिल बांदिवडेकर • श्री. सुदेश हिंगलासपूरकर • श्री. विजय केंकरे • श्री. अशोक कोठावळे
श्रीमती रेखा नार्वेकर • श्री. जयराज साळगांवकर • डॉ. मधुकर वर्तक

**सन्माननीय सल्लागार**

श्री. अशोक बेंडखळे • श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर

**कार्यकारी मंडळ**

कार्याध्यक्ष - डॉ. उज्ज्वला मेहेंदळे • कोषाध्यक्ष - श्री. आनंद बिर्जे
प्रमुख कार्यवाह - डॉ. अश्विनी भालेराव-गांधी

**कार्यवाह**

साहित्यशाखा- प्रा. प्रतिभा सराफ • नाट्य शाखा - श्री. ज्ञानेश पेंढारकर
संघ मंदिर समिती - श्री. सुभाष भागवत

**सदस्य**

श्री. एकनाथ आव्हाड • प्रा. प्रतिभा बिश्वास • डॉ. मिलिंद जोग
श्री. रोहिदास पांगे • श्री. अरुण फडके • श्रीमती अर्पणा साठे

**स्वीकृत सदस्य**

श्री. उमेश पडळकर • श्री. चंद्रशेखर गोखले • श्रीमती मीनाक्षी जयकर

**नियामक मंडळ सदस्य**

श्री. गणेश आचवल,
श्रीमती संगीता अरबुने,
श्री. एकनाथ आव्हाड,
श्रीमती प्रियांका बांदिवडेकर,
श्रीमती दिपाली भागवत,
श्री. सुभाष भागवत,
श्री. मनन भालेराव,
डॉ. अश्विनी भालेराव-गांधी,
प्रा. प्रतिभा बिश्वास,
श्री. दिलीप भाटवडेकर,
श्री. चंद्रकांत भोंजाळ,
श्री. विजयराज बोधनकर,
श्रीमती धनश्री धारप,
श्रीमती सावित्री हेगडे,
श्री. चंद्रशेखर गोखले,
श्री. रवींद्र गोळे,
श्रीमती मीनाक्षी जयकर,
डॉ. मिलिंद जोग,
श्री. अरुण जोशी,
श्रीमती ज्योती कपिले,
श्री. प्रकाश कामत,
प्रा. सुहासिनी कीर्तिकर,
डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,
श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर,
श्री. विकास परांजपे,
प्रा. नरेंद्र पाठक,
श्री. प्रमोद पवार,
श्री. ज्ञानेश पेंढारकर,
डॉ. अमेय पुरंदरे,
श्री. अरुण फडके,
प्रा. प्रतिभा सराफ,
श्रीमती अर्पणा साठे,
श्री. गीतेश शिंदे
डॉ. अनुपमा उजगरे,
श्री. चंद्रशेखर वझे

**स्वीकृत सदस्य**

श्री. आनंद बिर्जे • श्री. उमेश पडळकर • श्री. तनय गांधी • श्री. रोहिदास पांगे • श्री. हेमंत जोशी

मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशित

## अखिल भारतीय साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे




मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४
भ्रमणध्वनी : ७३०४३६९३९६